म. ग्रं. सं. ठाणें
विषय जिवंधा
सं. क्र. ३१९७

अभिनव लोचन

ा कुळकर्णी

REFBK-0025199


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संदर्भ नि. साहित्य

३१९७
२५१९९
३०७२८९.





अभिनवलोचन

(अभिनवगुप्तकृत ध्वन्यालोकलोचनाचा मराठी अनुवाद)

डॉ. रूपा कुळकर्णी

REFBK-0025199



अमेय प्रकाशन, नागपूर

प्रस्तुत प्रकाशनास
विद्यापीठ अनुदान मंडळ व
नागपूर विद्यापीठ यांचेकडून
रु. ७५०० चे आर्थिक सहाय्य
मिळाले आहे.

प्रकाशन क्रमांक अदुसष्ट
प्रथमावृत्ती मार्च १९८६

© डॉ. रूपा कुलकर्णी

प्रमिलाकृष्णस्मृती
तिरुपती फ्लॅट्स्
५०, गोकुळपेठ,
नागपूर ४४० ०१०

प्रकाशक
मनोहर पिंपळापुरे
अमेय प्रकाशन
८५, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपूर १०

मुद्रक
मधुसूदन पां. बनहट्टी
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर १२

मुखपृष्ठ अरुण सहारे

मूल्य तीस रुपये

'जगत: पितरौ'मधील पितरौ या पदाप्रमाणे
ज्यांच्या नावांचा समासच
साऱ्यांना माहिती होता
त्या माझ्या प्रिय
'आप्पाबाई'च्या
स्मृतीला अर्पण.

पुरस्कार

श्रीमती रूपा कुळकर्णी या एक प्रतिभाशाली आणि मूलग्राही विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणून नागपुरातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित झालेल्या आहेत. परंतु स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी त्यांचे विचार जसे मौलिक आणि तर्कसंगत आहेत तसेच ते साहित्य आणि कलाक्षेत्रातही आहेत हे कदाचित् त्याप्रमाणात पुष्कळांना माहिती नसेल. गेल्या बरेच वर्षांपासून धर्माधिकारी कुटुंबाच्या सामाजिक वर्तुळातील एक घटक या नात्याने त्यांचा माझ्याशी बराच संबंध आलेला आहे. आणि त्यांच्या विद्वत्तेचे व व्यक्तित्वाचे कित्येक पैलू माझ्या परिचयाचे झालेले आहेत.

कोणत्याही विषयाचा आज सांगोपांग अभ्यास करावयाचा असल्यास वास्तविक संस्कृत भाषेचे कामचलाऊ ज्ञान तरी आवश्यक समजले जावे. कारण त्या विषयातील संस्कृत ग्रंथांची उपेक्षा करून चालावयाचे नाही. ज्या देशामध्ये निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथसंपदा विपुल आहे आणि विचार तर्कसंगत करण्याचा प्रयत्न स्पष्ट आहे त्यांमध्ये ज्ञानाच्या ठिकठिकाणी साठलेल्या चिंध्या गोळा करून ज्ञानाचा एक पट उभारण्याचा प्रयत्न करणे हास्यास्पद आहे. कोणत्याही विषयाचे ज्ञान हे एकजिनसीच व्हावयाला पाहिजे. शास्त्र हे पाश्चात्य किंवा पौरस्त्य नसते. या दृष्टीने कोणत्याही विषयाच्या अभ्यासकांना या देशात त्या विषयाचे ज्ञान जेवढे म्हणून असेल ते आत्मसात् करणे आवश्यक ठरते. म्हणून त्या भाषांचे ज्ञान नसेल तर भाषांतरातून तरी विद्यार्थ्याला त्याचे ज्ञान मिळावयाला हवे. त्या दृष्टीने भाषांतराचेही महत्त्व आहे. साहित्यशास्त्रात ध्वन्यालोक या ग्रंथाला अतिशय महत्त्व आहे. तो एक मौलिक ग्रंथ आहे, असे मानले जाते. तसेच त्या ग्रंथावरील अभिनवगुप्तांची लोचन नावाची टीकाही मौलिकच समजली जाते. तेव्हा असल्या ग्रंथाचे भाषांतर करून त्या ग्रंथातील विचार विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे हेही महत्त्वाचे समजले गेले पाहिजे. असे भाषांतर उपलब्ध करून देऊन रूपाबाईंनी फार मोठे सामाजिक कार्य केलेले आहे.

अभिनवगुप्तांच्या मतांचा परामर्श घेणे हे ह्या पुरस्काराचे काम नव्हे. त्यांचा विद्वान मंडळी यथावकाश विचार करतीलच, परंतु त्यामुळे आपल्या समाजातील साहित्यिक विचारांना एक नवी दिशा लाभण्याचा संभव आहे.

उदाहरणार्थ—

मा निषाद प्रतिष्ठां त्वम् अगमः शाश्वतीः समाः ।
यत् क्रौञ्चमिथुनादेकम् अवधीः काममोहितम् ।।

या उद्‌गारांनी वाल्मीकीचा प्रगट झालेला व्यक्तिगत मनोविकार, हा काव्य-रूपाने परिणत होणारा मनोविकार नव्हे हे मत, तसेच 'रस' या संबंधींची त्यांची मते विचारांना चालना देणारी ठरावीत.

अशा तऱ्हेच्या एका मौलिक ग्रंथाचे भाषांतर करून रूपाबाईंनी मराठी वाङ्मयामध्ये मोलाची भर घातली आहे यात शंका नाही.

ता. ७-४-१९८५ **वामन शिवदास बारलिंगे**

प्रास्ताविक

माझ्या भूतपूर्व विद्यार्थिनी डॉ. रूपा कुळकर्णी नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर संस्कृत विभागात अध्यापनाचे कार्य करीत आहेत. संस्कृत साहित्य शास्त्राच्या अध्यापनाचा त्यांना कित्येक वर्षांचा अनुभव आहे.

संस्कृत साहित्यशास्त्राच्या अभ्यासक्रमात ध्वन्यालोक व त्या ग्रंथावरील अभिनवगुप्तांची लोचन नामक टीका याचा एम. ए. च्या विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागतो. या ग्रंथाचे अध्यापन त्या कित्येक वर्षांपासून करत आहेत. त्यांच्या परिशीलनातून 'अभिनवलोचन' नामक लोचन टीकेचा हा मराठी सलग अनुवाद उतरलेला आहे.

ध्वन्यालोकलोचनाच्या पहिल्या दोन उद्योतांचा मूळ ग्रंथासहित मराठी अनुवाद प्रो. पु. ना. वीरकर आणि प्रो. मा. वा. पटवर्धन यांनी गेल्या वर्षीच प्रसिद्ध केला आहे. असे असले तरी प्रस्तुत अनुवादाची उपयोगिता कमी होत नाही. गेल्या काही वर्षांपासून संस्कृताचे स्नातकोत्तर विद्यार्थी मराठी माध्यमातून परीक्षा देतात. त्यांना हा अनुवाद उपयोगी होईल, तसेच गेल्या काही वर्षांपासून मराठीतील समीक्षाशास्त्रविषयक लेखनात अभिनवगुप्तांची दखल घेतली जात असल्याचे दिसून येते. अभिनवगुप्तांच्या मतांची ओळख संस्कृतातून करून घेण्याइतकी ज्यांना सवड नाही अशा अभ्यासकांना हा सलग अनुवाद फार मोलाचा वाटेल असे मला वाटते.

माझे मत असे आहे की संस्कृतातील शास्त्रीय ग्रंथाचे एकाहून अधिक अनुवाद झाले तरी ते गतार्थ होत नाहीत.

प्रस्तुत पुस्तकात फक्त पहिल्या उद्योतावरील लोचनाचा अनुवाद आहे. डॉ. रूपा कुळकर्णी इतर उद्योतांचाही अनुवाद यथाकाल प्रसिद्ध करतील अशी मला आशा आहे. प्रस्तुत अनुवाद अभ्यासकांसमोर ठेवताना मला मोठा आनंद होतो.

मुक्काम–पुणे
९ मे १९८५

ग. ह्यं. देशपांडे, नागपूर

हृद्गत

नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर संस्कृत विभागातील एम्. ए. भाग २ मधील साहित्याच्या विद्यार्थ्यांना कित्येक वर्षांपासून आनंदवर्धनाचा 'ध्वन्यालोक' शिकवीत आले. काही दिवसांपूर्वी माझ्या एका पीएच्. डी. च्या विद्यार्थिनीला 'ध्वन्यालोक-लोचन टीकेचे समग्र अध्ययन' हा विषय मी दिला आणि या दोन प्रेरणांमधूनच 'अभिनवलोचन' या पुस्तकाचा जन्म झाला.

अभिनवगुप्तांची नाट्यशास्त्रावरील टीका अभिनव-भारती ही देखील या ना त्या निमित्ताने अध्ययनात येतच होती. परंतु जास्त लक्ष आकर्षित केले ते लोचनानेच. ध्वनीचा आलोक सहृदयांना पाहता यावा म्हणून अभिनवांनी या टीकेच्या रूपाने खरोखर सूक्ष्मदर्शी असे 'लोचनच' साऱ्यांना दिले आहेत.

ही टीका मराठीत शब्दशः संपूर्ण व सलग अशी काही अनुवादित झालेली नाही. संस्कृताच्याच नव्हे तर इंग्रजी, मराठी व हिंदीच्या अभ्यासकांना देखील अभिनवगुप्तांविषयी व त्यांच्या विशिष्ट साहित्यशास्त्रीय सिद्धांतांसंबंधी अतिशय उत्सुकता असते हे अनेकवेळा जाणवले होते. ध्वनिकारांनी, आनंदवर्धनांनी व नंतर अभिनवगुप्तांनी मांडलेला रसनिष्पत्तिविषयक सिद्धांत मूळातून वाचावा, अभिव्यक्तिवाद म्हणजे काय ते त्या ग्रंथातूनच समजावून घ्यावे असे अनेक अभ्यासकांना एवढेच नव्हे तर मर्मज्ञ वाचकांनाही वाटत असते. परंतु मूळ संस्कृत ग्रंथ पाहिल्यावर हा उत्साह तेथेच गारठतो.

अभिनवगुप्तांची भाषाशैली अत्यंत प्रगल्भ, पांडित्यपूर्ण, समासप्रचुर पण तरीही डौलदार अशी आहे. विवेचनाची पद्धती फार सखोल, मूळाचा ठाव घेणारी, अति सूक्ष्म पातळीपर्यंत जाऊन शब्दाशब्दाचा अर्थ पिंजून काढणारी व टोकदार आहे. त्यात पुन्हा वेदांत, सांख्य, योग, पूर्वमीमांसा, न्याय-वैशेषिक, या दर्शनांमधील तसेच व्याकरण, संगीत, निरुक्त या शास्त्रांमधील वचनांची, संदर्भांची व पारिभाषिक शब्दांची जागोजाग पखरण आहे. अभिनवगुप्त स्वतः ज्या काश्मीरी शैव मताचे उपासक होते ते प्रत्यभिज्ञा दर्शन आपल्या निवडक संज्ञांसह अनेकदा या टीकेमध्ये उतरलेले दिसते. शिवाय आनंदवर्धनाव्यतिरिक्त भरतमुनी, भामह, दंडी, वामन, रुद्रट, उद्भट, कुंतक, भट्टनायक, लोल्लट, माहिमभट्ट, शंकुक या साऱ्या पूर्वतन साहित्यशास्त्रज्ञांची मते वेळोवेळी उद्धृत केलेली आहेत. वाल्मीकी, व्यास, कालिदास, बाण, हर्ष, आदींच्या कृतींमधील उतारे, अनेक अनाम कवींची मुक्तके व प्राकृत गाथा याही विवेचनाच्या ओघात

अलंकारांची किंवा ध्वनीची किंवा अन्य एखाद्या काव्यप्रकाराची उदाहरणे म्हणून मोठ्या प्रमाणावर ध्वन्यालोक व लोचन या दोहोतही येतात. काही वेळा मूळ ध्वन्यालोकात उदाहरण नसले तर अभिनवगुप्त लोचनात ती उणीव भरून काढतात. आनंदवर्धन जसे स्वतःच्याच विषमबाणलीला या काव्यातील पद्य उदाहरणादाखल देतात तसेच अभिनवही स्वकृत कवने लोचनात देतात. अभिधा, तात्पर्य, लक्षणा व व्यंजना या चारही शब्दशक्तींची चर्चा विस्ताराने येथे येते तशीच भरताच्या 'विभावानुभाव–व्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः' या रससूत्रातील 'रस–निष्पत्ती 'विषयक भिन्नभिन्न उपपत्ती अत्यंत विस्ताराने या टीकेत येतात. ध्वनी म्हणजे काय येथपासून विवेचनाला आरंभ करीत असता, आनंदवर्धनाच्या–

स्वेच्छाकेसरिणः स्वच्छस्वच्छायायासितेन्दवः ।
त्रायन्तां वो मधुरिपोः प्रपन्नार्तिच्छिदा नखाः ।:

या पहिल्याच मंगलाचरण–पद्यावर व्याख्यान करीत जे बारकावे अभिनवगुप्तांनी आपल्या प्रतिपादनात दाखविले आहेत त्यानेच माणूस थक्क होतो. वस्तू, अलंकार व रस हे तीन्ही ध्वनी त्यांनी या दोन ओळींच्या लहानशा स्तोत्ररूप श्लोकातून काढून दाखविले आहेत ते मुळातून वाचण्यासारखे आहे. अभिनवगुप्तांच्या असामान्य प्रतिभेचे अनेक पैलू या टीकेत दिसतात. त्यांची लोकविलक्षण बुद्धिमत्ता, स्वप्रमेयावरील अपरंपार प्रेम, आणि प्रतिपादनातील सूक्ष्मेक्षिता या साऱ्या गोष्टी अनुवादात जशाच्या तशा जाणवणे शक्य नाही. परंतु विद्यार्थ्यांना, संशोधकांना व जिज्ञासूंना हे सारे मराठीत सलग उपलब्ध व्हावे ही इच्छा असल्यामुळे लोचनाच्या अनुवादाला सुरुवात केली. त्यापैकी पहिला उद्योत आज प्रसिद्ध करताना समाधान वाटते आहे. लवकरच क्रमाने उरलेल्या तीन्ही उद्योतांचा अनुवाद प्रसिद्ध करण्याचा मानस आहे.

माझ्या या पुस्तकाला भारतीय साहित्यशास्त्राचे लेखक, माझे गुरुवर्य आदरणीय डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांची प्रस्तावना लाभली हा मी माझा मोठाच गौरव समजते. सरांनी नुसती प्रस्तावनाच दिली नाही तर, ग्रथ परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने, त्यांच्या पुणे मुक्कामी मी त्यांना भेटण्यास गेले असता, महत्त्वाची सूचनाही केली. ती तावडतोब अंमलात आणली आहे. त्यांचे हे मार्गदर्शन व आत्मीयता आम्हाला पुढेही अनेक वर्षे लाभावी असे मनोमन वाटते. त्यांच्याविषयी नितांत कृतज्ञता व्यक्त करते.

तसेच संस्कृताचे एक थोर अभ्यासक व संस्कृतप्रेमी असे नागपुरातील एक ज्येष्ठ नागरिक, माननीय दादासाहेब बारलिंगे यांनी पुस्तकाला पुरस्कार लिहून दिला व त्याचे मोल वाढविले याबद्दल त्यांचीही मी अतिशय ऋणी आहे.

हे पुस्तक निघण्यामागे ज्यांची ज्यांची मदत कारणीभूत ठरली आहे त्यां सर्वांचे म्हणजे हस्तलिखिताचे टंकलेखन करून देणाऱ्या माझ्या मित्र प्रा. विजया भोळे, अमेय प्रकाशनाचे श्री. मनोहर पिंपळापुरे, नारायण मुद्रणालयाचे श्री. मधुसूदन बनहट्टी, मुखपृष्ठ तयार करणारे श्री. अरुण सहारे व माझी विद्यार्थिनी छाया औरंगाबादकर या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानते. पुस्तकाच्या निर्मितीत ज्या इतरही काही अडचणी आल्या त्या दूर करण्यात आपआपल्यापरीने हातभार लावणारे माझे दोन्ही बंधू व त्यांच्या पत्नी–दीपक व मेहेर, डॉ. विवेक व डॉ. किशोरी–या चौघांनाही कशी विसरू ? एकूणच संशोधनकार्याला मिळणारे प्रा. डॉ. के. रा. जोशी यांचे प्रोत्साहन याही पुस्तकाच्या वेळी माझ्या उपयोगी पडले. तीच गोष्ट डॉ. द. भि. कुलकर्णी यांची आहे. दोघांच्याहीबद्दल कृतज्ञता.


विद्यापीठ अनुदान मंडळाच्या प्रबंध व विद्वद्ग्रंथ प्रकाशित करण्यास आर्थिक साहाय्य देण्याच्या योजनांतर्गत प्रस्तुत ग्रंथाला नागपूर विद्यापीठाने रु. ७५०० चे अनुदान मंजूर केले त्याबद्दल विद्यापीठ अनुदान मंडळ व नागपूर विद्यापीठ यांच्या प्रती मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करते. वस्तुतः ही टीका अभिनवांनी ध्वनिकारिका व त्यावरील आनंदवर्धनकृत वृत्ती म्हणजेच ध्वन्यालोक या दोन्हीवर मिळून लिहिली आहे, परंतु भाषांतरात आनंदवर्धनांच्या वृत्तीचा अनुवाद दिलेला नाही, ध्वनिकारिका मात्र दिलेल्या आहेत. त्या एवढ्याचसाठी की, भाषांतर वाचताना संदर्भ लक्षात यावा. प्रत्येक कारिका हा ध्वनिविवेचनातील एक–एक खंड कल्पून हे भाषांतर बघावे.

ज्यांना अधिक विस्तृत संदर्भाची अपेक्षा आहे अशा जिज्ञासूंसाठी ग्रंथारंभी ध्वन्यालोकाचा पहिला उद्योत म्हणजेच आनंदवर्धनाचा वृत्तिग्रंथ देखील मूळ संस्कृतात पूर्ण दिलेला आहे. जेणेकरून लोचनातील वृत्तीचे संदर्भ ताबडतोब बघता येतील. लोचनाच्या भाषांतरात कोणतेही व्यवधान नको म्हणूनच तेथे वृत्तिग्रंथाचे भाषांतर किंवा मूळ वृत्तिग्रंथ देण्याचे टाळले हे कृपया वाचकांनी लक्षात घ्यावे.

अभिनवलोचनाचे अभ्यासक चांगले स्वागत करतील ही आशा करते व हे हृद्गत पूर्ण करते.

डॉ. रूपा कुळकर्णी
पदव्युत्तर संस्कृत विभाग
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मार्च १९८६
नागपूर



ध्वन्यालोक–प्रथम उद्योत

(ध्वनिकारिकांवरील आनंदवर्धनांची वृत्ती)

स्वेच्छाकेसरिणः स्वच्छस्वच्छायायासितेन्दवः ।
त्रायन्तां यो मधुरिपोः प्रपन्नार्तिच्छिदो नखाः ॥

ध्वनिकारिका १

काव्यस्यात्मा ध्वनिरिति बुधैर्यः समाम्नातपूर्व–
स्तस्याभावं जगदुरपरे भाक्तमाहुस्तमन्ये ।
केचिद्वाचां स्थितमविषये तत्त्वमूचुस्तदीयं
तेन ब्रूमः सहृदयमनःप्रीतये तत्स्वरूपम् ॥ ध्व. का. १ ॥

बुधैः काव्यतत्त्वविद्भिः, काव्यस्यात्मा ध्वनिरिति संज्ञितः, परम्परया यः समाम्नातपूर्वः सम्यक् आ समन्तात् म्नातः प्रकटितः, तस्य सहृदयजनमनःप्रकाशमानस्याप्यभावमन्ये जगदुः तदभाववादिनां चामी विकल्पाः सम्भवन्ति ।

तत्र केचिदाचक्षीरन्–शब्दार्थशरीरं तावत्काव्यम् । तत्र च शब्दगताश्चारुत्वहेतवोऽनुप्रासादयः प्रसिद्धा एव । अर्थगताश्चोपमादयः । वर्णसंघटनाधर्माश्च ये माधुर्यादयस्तेऽपि प्रतीयन्ते । तदनतिरिक्तवृत्तयो वृत्तयोऽपि याः कैश्चिदुपनागरिकाद्याः प्रकाशिताः ता अपि गताः श्रवणगोचरम् । रीतयश्च वैदर्भीप्रभृतयः । तद्व्यतिरिक्तः कोऽयं ध्वनिर्नामेति ।

अन्ये ब्रूयुः– नास्त्येव ध्वनिः । प्रसिद्धप्रस्थानव्यतिरेकिणः काव्यप्रकारस्य काव्यत्वहानेः, सहृदयहृदयाह्लादि शब्दार्थमयत्वमेव काव्यलक्षणम् । न चोक्तप्रस्थानव्यतिरेकिणो मार्गस्य तत्सम्भवति । न च तत्समयान्तःपातिनः सहृदयान् कांश्चित् परिकल्प्य तत्प्रसिद्धया ध्वनौ काव्यव्यपदेशः प्रवर्तितोऽपि सकलविद्वन्मनोग्राहितामवलम्बते ।

पुनरपरे तस्याभावमन्यथा कथयेयुः– न सम्भवत्येव ध्वनिर्नामापूर्वः कश्चित् । कामनीयकमनतिवर्तमानस्य तस्योक्तेष्वेव चारुत्वहेतुष्वन्तर्भावात् । तेषामन्यतमस्यैव वा अपूर्वसमाख्यामात्रकरणे यत्किञ्चन कथनं स्यात् ।

किञ्च वाग्विकल्पानामानन्त्यात् सम्भवत्यपि वा कस्मिंश्चित् काव्यलक्षणविधायिभिः प्रसिद्धैरप्रदर्शिते प्रकारलेशे ध्वनिर्ध्वनिरिति यदेतदलीकसहृदयत्वभावनामुकुलितलोचनैर्नृत्यते तत्र हेतुं न विद्मः । सहस्रशो हि महात्मभिरन्यैरलङ्कारप्रकाराः प्रकाशिताः प्रकाश्यन्ते च । न च तेषामेषा दशा श्रूयते ।

तस्मात्प्रवादमात्रं ध्वनिः । न त्वस्य क्षोदक्षमं तत्त्वं किञ्चिदपि प्रकाशयितुं शक्यम् । तथा चान्येन कृत एवात्र श्लोकः—

यस्मिन्नस्ति न वस्तु किञ्चन मनःप्रह्लादि सालंकृति
व्युत्पन्नै रचितं न चैव वचनैर्वक्रोक्तिशून्यं च यत् ।
काव्यं तद् ध्वनिना समन्वितमिति प्रीत्या प्रशंसञ्जडो
नो विद्मोऽभिदधाति किं सुकृतिना पृष्टः स्वरूपं ध्वनेः ॥

भाक्तमाहुस्तमन्ये । अन्ये तं ध्वनिसंज्ञितं काव्यात्मानं गुणवृत्तिरित्याहुः ।

यद्यपि च ध्वनिशब्दसङ्कीर्तनेन काव्यलक्षणविधायिभिर्गुणवृत्तिरन्यो वा न कश्चित्प्रकारः प्रकाशितः तथापि अमुख्यवृत्त्या काव्येषु व्यवहारं दर्शयता ध्वनिमार्गो मनाक् स्पृष्टोऽपि न लक्षित इति परिकल्प्यैवमुक्तम्—'भाक्तमाहुस्तमन्ये' इति ।

केचित्पुनर्लक्षणकरणशालीनबुद्धयो ध्वनेस्तत्त्वं गिरामगोचरं सहृदयहृदयसंवेद्यमेव समाख्यातवन्तः । तेनैवंविधासु विमतिषु स्थितासु सहृदयमनःप्रीतये तत्स्वरूपं ब्रूमः ।

तस्य हि ध्वनेः स्वरूपं सकलसत्कविकाव्योपनिषद्भूतमतिरमणीयमणीयसीभिरपि चिरन्तनकाव्यलक्षणविधायिनां बुद्धिभिरनुन्मीलितपूर्वम्, अथ च रामायणमहाभारतप्रभृतिनि लक्ष्ये सर्वत्र प्रसिद्धव्यवहारं लक्षयतां सहृदयानामानन्दो मनसि लभतां प्रतिष्ठामिति प्रकाश्यते ॥ १ ॥

तत्र ध्वनेरेव लक्षयितुमारब्धस्य भूमिकां रचयितुमिदमुच्यते—

योऽर्थः सहृदयश्लाघ्यः काव्यात्मेति व्यवस्थितः ।
वाच्यप्रतीयमानाख्यौ तस्य भेदावुभौ स्मृतौ ॥ ध्व. का. २ ॥

काव्यस्य हि ललितोचितसन्निवेशचारुणः शरीरस्येवात्मा साररूपतया स्थितः सहृदयश्लाघ्यो योऽर्थस्तस्य वाच्यः प्रतीयमानश्चेति द्वौ भेदौ ।

तत्र वाच्यः प्रसिद्धो यः प्रकारैरुपमादिभिः ।
बहुधा व्याकृतः सोऽन्यैः,
काव्यलक्ष्मविधायिभिः ।
ततो नेह प्रतन्यते ॥ ध्व का. ३ ॥

केवलमनूद्यते पुनर्यथायोगमिति ।

प्रतीयमानं पुनरन्यदेव वस्त्वस्ति वाणीषु महाकवीनाम् ।
यत्तत्प्रसिद्धावयवातिरिक्तं विभाति लावण्यमिवाङ्गनासु
॥ ध्व. का. ४ ॥

प्रतीयमानं पुनरन्यदेव वाच्याद्वस्त्वस्ति वाणीषु महाकवीनाम्। यत्तत्सहृदय-सुप्रसिद्धं प्रसिद्धेभ्योऽलंकृतेभ्यः प्रतीतेभ्यो वावयवेभ्यो व्यतिरिक्तत्वेन प्रकाशते लावण्यमिवाङ्गनासु। यथाह्यङ्गनासु लावण्यं पृथङ् निर्वर्ण्यमानं निखिलावयव-व्यतिरेकि किमप्यन्यदेव सहृदयलोचनामृतं तत्त्वान्तरं तद्वदेव सोऽर्थः।

स ह्यथो वाच्यसामर्थ्याक्षिप्तं वस्तुमात्रमलङ्कारसादयश्चेत्यनेकप्रभेदप्रभिन्नो दर्शयिष्यते। सर्वेषु च तेषु प्रकारेषु तस्य वाच्यादन्यत्वम्।

तथा ह्याद्यस्तावत्प्रभेदो वाच्यद्दूरं विभेदवान्। स हि कदाचिद्वाच्ये विधिरूपे प्रतिषेधरूपः। यथा—

भम धम्मिअ वीसत्थो सो सुणओ अज्जमारिओ देण।
गोलाणइ कच्छकुडङ्गवासिणा दरिअमीहेण॥

क्वचिद्वाच्ये प्रतिषेधरूपे विधिरूपो यथा—

अत्ता एत्थ निमज्जइ एत्थ अहं दिअसअं पलोएहि।
या पहिअ रत्तिअन्धअ सेज्जाए मह णिमज्जहिसि॥

क्वचिद्वाच्ये विधिरूपेऽनुभयरूपो यथा—

वच्च मह व्विअ एक्केइ होन्तु णीसासरोइअव्वाइं।
मा तुज्ज वि तीअ विणा दक्खिण्णहअस्स जाअन्तु॥

क्वचिद्वाच्ये प्रतिषेधरूपेऽनुभयरूपो यथा—

दे आ पसिअ णिवत्तसु मुहससिजोल्हाविलुत्ततमणिवहे।
अहिसारिआणं विग्घं करोसि अण्णाणँ वि हआसे॥

क्वचित्वाच्याद्विभिन्नविषयत्वेन व्यवस्थापितो यथा—

कस्स व ण होई रोसो दट्ठूण पिआएँ सल्लुणं अहरम्।
सभमरपउमग्घाइणि वारिअवामे सहसु एल्लिम्॥

अन्ये चैवंप्रकारा वाच्याद्विभेदिनः प्रतीयमानभेदाः सम्भवन्ति। तेषां दिङ्मात्र-मेतत्प्रदर्शितम्। द्वितीयोऽपि प्रभेदो वाच्याद्विभिन्नः सप्रपञ्चमग्रे दर्शयिष्यते। तृतीयस्तु रसादिलक्षणः प्रभेदो वाच्यसामर्थ्याक्षिप्तः प्रकाशते, न तु साक्षाच्छ-ब्दव्यापारविषय इति वाच्याद्विभिन्न एव। तथा हि वाच्यत्वं तस्य स्वशब्दनिवे-दितत्वेन वा स्यात्, विभावादिप्रतिपादनमुखेन वा। पूर्वस्मिन् पक्षे स्वशब्दनिवेदित-त्वाभावे रसादीनामप्रतीतिप्रसङ्गः। न च सर्वत्र तेषां स्वशब्दनिवेदितत्वम्। यत्राप्यस्ति तत्, तत्रापि विशिष्टविभावादिप्रतिपादनमुखेनैवेषां प्रतीतिः। स्वशब्देन सा केवलमनूद्यते, न तु तत्कृता। विषयान्तरे तथा तस्या अदर्शनात्। न हि केवल शृङ्गारादिशब्दमात्रभाजि विभावादिप्रतिपादनरहिते काव्ये मनागपि रसवत्वप्रतीतिरस्ति। यतश्च स्वाभिधानमन्तरेण केवलेभ्योऽपि विभावादिभ्यो

विशिष्टेभ्यो रसादीनां प्रतीतिः। केवलाच्च स्वाभिधानादप्रतीतिः। तस्मादन्वय-व्यतिरेकाभ्यामभिधेयसामर्थ्याक्षिप्तत्वमेव रसादीनाम्। न त्वभिधेयं कथञ्चित्, इति तृतीयोऽपि प्रभेदो वाच्याद्भिन्न एवेति स्थितम्। वाच्येन त्वस्य सहेव प्रतीतिरित्यग्रे दर्शयिष्यते।

काव्यस्यात्मा स एवार्थस्तथा चादिकवेः पुरा।
क्रौञ्चद्वन्द्ववियोगोत्थः शोकः श्लोकत्वमागतः॥ ध्व. का. ५॥

विविधवाच्यवाचकरचनाप्रपञ्चचारुणः काव्यस्य स एवार्थः सारभूतः। तथा चादिकवेः वाल्मीकेः निहतसहचर (सहचरी?) विरहकातरक्रौञ्च्या (क्रौञ्चा?)-क्रन्दनजनितः शोक एव श्लोकतया परिणतः। शोको हि करुणस्थायिभावः। प्रतीयमानस्य चान्यभेददर्शनेऽपि रसभावमुखेनैवोपलक्षणप्राधान्यात् (उपलक्षणं प्राधान्यात्?)।

सरस्वती स्वादु तदर्थवस्तु निःष्यन्दमाना महतां कवीनाम्।
अलोकसामान्यमभिव्यनक्ति परिस्फुरन्तं प्रतिभाविशेषम्॥ ध्व.का. ६॥

तत् वस्तुतत्त्वं निःष्यन्दमाना महतां कवीनां भारती अलोकसामान्यं प्रतिभाविशेषं परिस्फुरन्तमभिव्यनक्ति। येनास्मिन्नतिविचित्रकविपरम्परावाहिनि संसारे कालिदासप्रभृतयो द्वित्राः पञ्चषा वा महाकवय इति गण्यन्ते।

इदं चापरं प्रतीयमानस्यार्थस्य सद्भावसाधनं प्रमाणम्–

शब्दार्थशासनज्ञानमात्रेणैव न वेद्यते।
वेद्यते स तु काव्यार्थतत्त्वज्ञैरेव केवलम्॥ ध्व. का. ७॥

सोऽर्थो यस्मात् केवलं काव्यार्थतत्त्वज्ञैरेव ज्ञायते। यदि च वाच्यरूपे एवासावर्थः स्याद्वाच्यवाचकलक्षणमात्रकृतश्रमाणां काव्यतत्त्वार्थभावनाविमुखानां स्वरश्रुत्यादिलक्षणमिवाप्रगीतानां गान्धर्वलक्षणविदामगोचर एवासावर्थः।

एवं वाच्यव्यतिरेकिणो व्यङ्ग्यस्य सद्भावं प्रतिपाद्य प्राधान्यं तस्यैवेति दर्शयति–

सोऽर्थस्तद्व्यक्तिसामर्थ्ययोगी शब्दश्च कश्चन।
यत्नतः प्रत्यभिज्ञेयौ तौ शब्दार्थौ महाकवेः॥ ध्व. का. ८॥

व्यङ्ग्योऽर्थस्तद्वचक्तिसामर्थ्ययोगी शब्दश्च कश्चन, न शब्दमात्रम्। तावेव शब्दार्थौ महाकवेः प्रत्यभिज्ञेयौ। व्यङ्ग्यव्यञ्जकाभ्यामेव सुप्रयुक्ताभ्यां महाकवित्वलाभो महाकवीनाम्, न वाच्यवाचकरचनामात्रेण।

इदानीं व्यङ्ग्यव्यञ्जकयोः प्राधान्येऽपि यद्वाच्यवाचकावेव प्रथममुपाददते कवयस्तदपि युक्तमेवेत्याह–

आलोकार्थी यथा दीपशिखायां यत्नवाञ्जनः।
तदुपायतया तद्वदर्थे वाच्ये तदादृतः॥ ध्व. का. ९॥

यथा ह्यालोकार्थी सन्नपि दीपशिखायां यत्नवाञ्जनो भवति तदुपायतया। न हि दीपशिखामन्तरेणालोकः सम्भवति। तद्वद्व्यङ्ग्यमर्थं प्रत्यादृतो जनो वाच्येऽर्थे यत्नवान् भवति। अनेन प्रतिपादकस्य कवेर्व्यङ्ग्यमर्थं प्रति व्यापारो दर्शितः।

प्रतिपाद्यस्यापि तं दर्शयितुमाह–

यथा पदार्थद्वारेण वाक्यार्थः सम्प्रतीयते।
वाच्यार्थपूर्विका तद्वत्प्रतिपत्तस्य वस्तुनः॥ ध्व. का. १०॥

यथाहि पदार्थद्वारेण वाक्यार्थावगमस्तथा वाच्यार्थप्रतीतिपूर्विका व्यङ्ग्यस्यार्थस्य प्रतिपत्तिः।

इदानीं वाच्यार्थप्रतीतिपूर्वकत्वेऽपि तत्प्रतीतेर्व्यङ्ग्यस्यार्थस्य प्राधान्यं यथा न व्यालुप्यते तथा दर्शयति—

स्वसामर्थ्यवशेनैव वाक्यार्थं प्रतिपादयन्।
यथा व्यापारनिष्पत्तौ पदार्थो न विभाव्यते॥ ध्व. का. ११॥

यथा स्वसामर्थ्यवशेनैव वाक्यार्थं प्रकाशयन्नपि पदार्थो व्यापारनिष्पत्तौ न विभाव्यते विभक्ततया।

तद्वत्सचेतसां सोऽर्थो वाच्यार्थविमुखात्मनाम्।
बुद्धौ तत्त्वार्थदर्शिन्यां झटित्येवावभासते॥ ध्व. का. १२॥

एवं वाच्यव्यतिरेकिणो व्यङ्ग्यस्यार्थस्य सद्भावं प्रतिपाद्य प्रकृत उपयोजयन्नाह–

यत्रार्थः शब्दो वा तमर्थमुपसर्जनीकृतस्वार्थौ।
व्यङ्क्तः काव्यविशेषः स ध्वनिरिति सूरिभिः कथितः॥ ध्व. का. १३॥

यत्रार्थो वाच्यविशेषः वाचकविशेषः शब्दो वा तमर्थं व्यङ्क्तः, स काव्यविशेषो ध्वनिरिति। अनेन वाच्यवाचकचारुत्वहेतुभ्य उपमादिभ्योऽनुप्रासादिभ्यश्च विभक्त एव ध्वनेर्विषय इति दर्शितम्।

यदप्युक्तम्–'प्रसिद्धप्रस्थानातिक्रमिणो मार्गस्य काव्यत्वहानेर्ध्वनिर्नास्ति' इति तदप्ययुक्तम्।

यतो लक्षणकृतामेव स केवलं न प्रसिद्धः, लक्ष्ये तु परीक्ष्यमाणे स एव सहृदयाह्लादकारि काव्यतत्त्वम्। ततोऽन्यच्चित्रमेवेत्यग्रे दर्शयिष्यामः।

यदप्युक्तम्–'कामनीयकमनतिवर्तमानस्य तस्योक्तालङ्कारादिष्वेवान्तर्भावः' इति तदप्यसमीचीनम्; वाच्यवाचकमात्राश्रयिणि प्रस्थाने व्यङ्ग्यव्यञ्जकसमाश्रयेण व्यवस्थितस्य ध्वनेः कथमन्तर्भावः? वाच्यवाचकचारुत्वहेतवो हि

तस्याङ्गभूताः, स त्वङ्गिरूप एवेति प्रतिपादयिष्यमाणत्वात् । परिकरश्लोकश्चात्र—

व्यङ्ग्यव्यञ्जकसम्बन्धनिबन्धनतया ध्वने : ।
वाच्यवाचकचारुत्वहेत्वन्तःपातिता कुतः ॥

ननु यत्र प्रतीयमानार्थस्य वैशद्येनाप्रतीति : स नाम मा भूद् ध्वनेर्विषयः । यत्र तु प्रतीतिरस्ति, यथा – समासोक्त्याक्षेपानुक्तनिमित्ताविशेषोक्तिपर्यायोक्तापह्नुति–दीपकसङ्करालङ्कारादौ, तत्र ध्वनेरन्तर्भावो भविष्यतीत्यादि निराकर्तुमभिहितम्–'उपसर्जनीकृतस्वार्थो' इति । अर्थो गुणीकृतात्मा, गुणीकृताभिधेयः शब्दो वा यत्रार्थान्तरमभिव्यनक्ति स ध्वनिरिति । तेषु कथं तस्यान्तर्भावः । व्यङ्ग्यप्राधान्ये हि ध्वनिः । न चैतत् समासोक्त्यादिष्वस्ति । समासोक्तौ तावत्–

उपोढरागेण विलोलतारकं तथा गृहीतं शशिना निशामुखम् ।
यथा समस्तं तिमिरांशुकं तया पुरोऽपि रागाद् गलितं न लक्षितम् ॥

इत्यादौ व्यङ्ग्येनानुगतं वाच्यमेव प्राधान्येन प्रतीयते समारोपितनायिकानायकव्यवहारयोर्निशाशशिनोरेव वाक्यार्थत्वात् । आक्षेपेऽपि व्यङ्ग्यविशेषाक्षेपिणोऽपि वाच्यस्यैव चारुत्वं प्राधान्येन वाक्यार्थ आक्षेपोक्तिसामर्थ्यादेव ज्ञायते । तथाहि–तत्र शब्दोपारूढो विशेषाभिधानेच्छया प्रतिषेधरूपो य आक्षेपः स एव व्यङ्ग्यविशेषमाक्षिपन् मुख्यं काव्य–शरीरम् । चारुत्वोत्कर्षनिबन्धना हि वाच्यव्यङ्ग्ययोः प्राधान्यविवक्षा । यथा—

अनुरागवती सन्ध्या दिवसस्तत्पुरःसरः।
अहो दैवगति : कीदृक्तथापि न समागमः ॥

अत्र सत्यामपि व्यङ्ग्यप्रतीतौ वाच्यस्यैव चारुत्वमुत्कर्षवदिति तस्यैव प्राधान्यविवक्षा ।

यथा च दीपकापह्नुत्यादौ व्यङ्ग्यत्वेनोपमायाः प्रतीतावपि प्राधान्येनाविवक्षितत्वान्न तया व्यपदेशस्तद्वदत्रापि द्रष्टव्यम् । अनुक्तनिमित्तायामपि विशेषोक्तौ—

आहूतोऽपि सहायैः ओमित्युक्त्वा विमुक्तनिद्रोऽपि ।
गन्तुमना अपि पथिकः सङ्कोचं नैव शिथिलयति ॥

इत्यादौ व्यङ्ग्यस्य प्रकरणसामर्थ्यात् प्रतीतिमात्रम् । न तु तत्प्रतीतिनिमित्ता काचिच्चारुत्वनिष्पत्तिरिति न प्राधान्यम् । पर्यायोक्तेऽपि यदि प्राधान्येन व्यङ्ग्यत्वं तद्भवतु नाम तस्य ध्वनावन्तर्भावः । न तु ध्वनेस्तत्रान्तर्भावः । तस्य महाविषयत्वेनाङ्गित्वेन च प्रतिपादयिष्यमाणत्वात् । न पुनः पर्यायोक्ते भामहोदाहृतसदृशे व्यङ्ग्यस्यैव प्राधान्यम् । वाच्यस्य तत्रोपसर्जनीभावेना –

विवक्षितत्वात् । अपह्नुतिदीपकयोः पुनर्वाच्यस्य प्राधान्यं व्यङ्ग्यस्य चानुयायित्वं प्रसिद्धमेव । सङ्करालङ्कारेऽपि यदाऽलङ्कारोऽलङ्कारान्तरच्छायामनुगृह्णाति, तदा व्यङ्ग्यस्य प्राधान्येनाविवक्षितत्वान्न ध्वनिविषयत्वम् । अलङ्कारद्वयसम्भावनायां तु वाच्यव्यङ्ग्ययोः समं प्राधान्यम् । अथ वाच्योपसर्जनीभावेन व्यङ्ग्यस्य तत्रावस्थानं तदा सोऽपि ध्वनिविषयोऽस्तु, न तु स एव ध्वनिरिति वक्तुं शक्यम् । पर्यायोक्तनिर्दिष्टन्यायात । अपि च सङ्करालङ्कारेऽपि च क्वचित् सङ्करोक्तिरेव ध्वनिसम्भावनां निराकरोति । अप्रस्तुतप्रशंसायामपि यदा सामान्यविशेषभावान्निमित्तनिमित्तभावाद्वा अभिधीयमानस्याप्रस्तुतस्य प्रतीयमानेन प्रस्तुतेनाभिसम्बन्धः तदाभिधीयमानप्रतीयमानयोः सममेव प्राधान्यम् । यदा तावत् सामान्यस्याप्रस्तुतस्याभिधीयमानस्य प्राकरणिकेन विशेषेण प्रतीयमानेन सम्बन्धस्तदा विशेषप्रतीतौ सत्यामपि प्राधान्येन तत्सामान्येनाविनाभावात्सामान्यस्यापि प्राधान्यम् । यदापि विशेषस्य सामान्यनिष्ठत्वं तदापि सामान्यस्य प्राधान्ये सामान्ये सर्वविशेषाणामन्तर्भावाद्विशेषस्यापि प्राधान्यम् । निमित्तनिमित्तिभावे चायमेव न्यायः । यदा सारूप्यमात्रवशेनाप्रस्तुतप्रशंसायामप्रकृतप्रकृतयोः सम्बन्धस्तदाप्यप्रस्तुतस्य सरूपस्याभिधीयमानस्य प्राधान्येनाविवक्षायां ध्वनावेवान्तःपातः । इतरथा त्वलङ्कारान्तरमेव । तदयमत्र सङ्क्षेपः—

> व्यङ्ग्यस्य यत्राप्राधान्यं वाच्यमात्रानुयायिनः ।
> समासोक्त्यादयस्तत्र वाच्यालङ्कृतयः स्फुटाः ॥
> व्यङ्ग्यस्य प्रतिभामात्रे वाच्यार्थानुगमेऽपि वा
> न ध्वनिर्यत्र वा तस्य प्राधान्यं न प्रतीयते ॥
> तत्परावेव शब्दार्थौ यत्र व्यङ्ग्यं प्रति स्थितौ ।
> ध्वनेः स एव विषयो मन्तव्यः सङ्करोज्झितः ॥

तस्मान्न ध्वनेरन्यत्रान्तर्भावः । इतश्च नान्तर्भावः यतः काव्यविशेषोऽङ्गी ध्वनिरिति कथितः । तस्य पुनरङ्गानि–अलङ्कारा गुणा वृत्तयश्चेति प्रतिपादयिष्यन्ते । न च अवयव एव पृथग्भूतोऽवयवीति प्रसिद्धः । अपृथग्भावे तु तदङ्गत्वं तस्य । न तु तत्त्वमेव । यत्रापि वा तत्त्वं तत्रापि ध्वनेर्महाविषयत्वान्न तन्निष्ठत्वमेव । 'सूरिभिः कथितः' इति विद्वदुपज्ञेयमुक्तिः, न तु यथाकथञ्चित् प्रवृत्तेति प्रतिपाद्यते । प्रथमे हि विद्वांसो वैयाकरणाः, व्याकरणमूलत्वात् सर्वविद्यानाम् । ते च श्रूयमाणेषु वर्णेषु ध्वनिरिति व्यवहरन्ति । तथैवान्यैस्तन्मतानुसारिभिः सूरिभिः काव्यतत्त्वार्थदर्शिभिर्वाच्यवाचकसम्मिश्रः शब्दात्मा काव्यमिति व्यपदेश्यो व्यञ्जकत्वसाम्याद् ध्वनिरित्युक्तः । न चैवंविधस्य ध्वनेर्वक्ष्यमाणप्रभेदतद्भेदसङ्कलनया महाविषयस्य यत्प्रकाशनं तदप्रसिद्धालङ्कारविशेषमात्रप्रतिपादनेन तुल्यमिति तद्भावितचेतसां युक्त एव संरम्भः । न च

तेषु कथञ्चिदीर्ष्यया कलुषितशेमुषीकत्वमाविष्करणीयम् । तदेवं ध्वनेस्तावद-भाववादिनः प्रत्युक्ताः ।

अस्ति ध्वनिः । स चासावविवक्षितवाच्यो विवक्षितान्यपरवाच्यश्चेति द्विविधः सामान्येन ।

तत्राद्यस्योदाहरणम्—

सुवर्णपुष्पां पृथिवीं चिन्वन्ति पुरुषास्त्रयः ।
शूरश्च कृतविद्यश्च यश्च जानाति सेवितुम् ॥

द्वितीयस्यापि—

शिखरिणि क्व नु नाम कियच्चिरं किमभिधानमसावकरोत्तपः ।
तरुणि येन तवाधरपाटलं दशति बिम्बफलं शुकशावकः ॥

यदप्युक्तं भक्तिर्ध्वनिरिति, तत्प्रतिसमाधीयते—

भक्त्या बिभर्ति नैकत्वं रूपभेदादयं ध्वनिः ।

अयमुक्तप्रकारो ध्वनिर्भक्त्या नैकत्वं बिभर्ति भिन्नरूपत्वात् । वाच्य-व्यतिरिक्तस्यार्थस्य वाच्यवाचकाभ्यां तात्पर्येण प्रकाशनं यत्र व्यङ्ग्यप्राधान्ये स ध्वनिः । उपचारमात्रं तु भक्तिः ।

मा चैतत् स्याद्भक्तिर्लक्षणं ध्वनेरित्याह—

अतिव्याप्तेरथाव्याप्तेर्न चासौ लक्ष्यते तया ॥ ध्व. का. १४ ॥

नैव भक्त्या ध्वनिर्लक्ष्यते । कथम् ? अतिव्याप्तेरव्याप्तेश्च । तत्रातिव्याप्तिर्ध्वनिव्यतिरिक्तेऽपि विषये भक्तेः सम्भवात् । यत्र हि व्यङ्ग्यकृतं महत्—सौष्ठवं नास्ति तत्राप्युपचरितशब्दवृत्त्या प्रसिद्धयनुरोधप्रवर्तितव्यवहाराः कवयो दृश्यन्ते । यथा—

परिम्लानं पीनस्तनजघनसङ्गादुभयत—
स्तनोर्मध्यस्यान्तः परिमिलनमप्राप्य हरितम् ।
इदं व्यस्तन्यासं श्लथभुजलताक्षेपवलनैः
कृशाङ्ग्याः सन्तापं वदति बिसिनीपत्रशयनम् ॥

तथा—

चुम्बिज्जइ असहुत्तं अवरुन्धिज्जइ सहस्सहुत्तम्मि ।
विरमिअ पुणो रमिज्जइ पिओ जणो णत्थि पुनरुत्तम् ।
(शतकृत्वोऽवरुध्यते सहस्रकृत्वः चुम्ब्यते ।
विरम्य पुना रम्यते प्रियो जनो नास्ति पुनरुक्तम् ॥

इति च्छाया)

तथा–

कुविआओ पसन्नाओ ओरण्णमूहीओ विहसमाणाओ ।
जह गहिओ तह हिअअं हरन्ति उच्छिन्तमहिलाओ ॥

तथा–

अज्जाएँ पहारो णवलदाए दिण्णो पिएणथणवट्टे ।
मिउओ वि दूसहो ब्विअ जाओ हिअए सवत्तीणम् ॥
(भार्यायाः प्रहारो नवलतया दत्तः प्रियेण स्तनपृष्ठे ।
मृदुकोऽपि दुःसह इव जातो हृदये सपत्नीनाम् ॥ इति च्छाया)

तथा–

परार्थे यः पीडामनुभवति भङ्गेऽपि मधुरो
यदीयः सर्वेषामिह खलु विकारोऽप्यभिमतः ।
न सम्प्राप्तो वृद्धिं यदि स भृशमक्षेत्रपतितः
किमिक्षोर्दोषोऽसौ न पुनरगुणाया मरुभवः ॥

इत्यत्रेक्षुपक्षेऽनुभवतिशब्दः । न चैवंविधः कदाचिदपि ध्वनेर्विषयः ।

यतः–

उक्त्यन्तरेणाशक्यं यत्तच्चारुत्वं प्रकाशयन् ।
शब्दो व्यञ्जकतां विभ्रद्ध्वन्युक्तेर्विषयीभवेत् ॥ ध्व. का. १५ ॥

अत्र चोदाहृते विषये नोक्त्यन्तराशक्यचारुत्वव्यक्तिहेतुः शब्दः ।

किञ्च–

रूढा ये विषयेऽन्यत्र शब्दाः स्वविषयादपि ।
लावण्याद्याः प्रयुक्तास्ते न भवन्ति पदं ध्वनेः ॥ ध्व. का. १६ ॥

तेषु चोपचरितशब्दवृत्तिरस्तीति । तथाविधे च विषये ध्वनिव्यवहारः प्रकारान्तरेण प्रवर्तते । न तथाविधशब्दमुखेन ।

अपि च–

मुख्यां वृत्तिं परित्यज्य गुणवृत्त्यार्थदर्शनम् ।
यदुद्दिश्य फलं तत्र शब्दो नैव स्खलद्गतिः ॥ ध्व. का. १७ ॥

तत्र हि चारुत्वातिशयविशिष्टार्थप्रकाशनलक्षणे प्रयोजने कर्तव्ये यदि शब्दस्यामुख्यता तदा तस्य प्रयोगे दुष्टतैव स्यात् । न चैवम् ।

तस्मात्–

वाचकत्वाश्रयेणैव गुणवृत्तिर्व्यवस्थिता ।
व्यञ्जकत्वैकमूलस्य ध्वनेः स्याल्लक्षणं कथम् ॥ ध्व. का. १८ ॥

तस्मादन्यो ध्वनिरन्या च गुणवृत्तिः । अव्याप्तिरप्यस्य लक्षणस्य । नहि ध्वनिप्रभेदो विवक्षितान्यपरवाच्यलक्षणः अन्ये च बहवः प्रकाराः भक्त्या व्याप्यन्ते । तस्माद्भक्तिरलक्षणम् ।

कस्यचिद्ध्वनिभेदस्य सा तु स्यादुपलक्षणम् । सा पुनर्भक्तिर्वक्ष्यमाणप्रभेद-मध्यादन्यतमस्य भेदस्य यदि नामोपलक्षणतया सम्भाव्येत; यदि च गुणवृत्त्यैव ध्वनिर्लक्ष्येत इत्युच्यते तदभिधाव्यापारेण तदितरोऽलङ्कारवर्ग समग्र एव लक्ष्यत इति प्रत्येकमलङ्काराणां लक्षणकरणवैयर्थ्यप्रसङ्गः ।

किञ्च–

लक्षणेऽन्यैः कृते चास्य पक्षसंसिद्धिरेव नः ॥ ध्व. का. १९ ॥

कृतेऽपि वा पूर्वमेवान्यैर्ध्वनिलक्षणे पक्षसंसिद्धिरेव नः; यस्माद्ध्वनिरस्तीति नः पक्षः । स च प्रागेव संसिद्ध इत्ययत्नसम्पन्नसमीहितार्थाः संवृत्ताः स्मः । येऽपि सहृदयहृदयसंवेद्यमनाख्येयमेव ध्वनेरात्मानमाम्नासिषुस्तेऽपि न परीक्ष्य वादिनः । यत उक्तया नीत्या वक्ष्यमाणया च ध्वनेः सामान्यविशेषलक्षणे प्रतिपादितेऽपि यद्यनाख्येयत्वं तत्सर्वेषामेव वस्तूनां तत्प्रसक्तम् । यदि पुनर्ध्वनेरतिशयोक्त्यानया काव्यान्तरातिशायि तैः स्वरूपमाख्यायते तत्तेऽपि युक्ताभिधायिन एव ॥



अभिनवलोचन

लोचनाचे मंगलाचरण

जे कोणत्याही कारणाच्या थोड्याशादेशील अंशाशिवाय अपूर्व अशा (पूर्वी कधीही अशातऱ्हेने वर्ण्य विषय न बनलेल्या) वस्तूची विस्ताराने रचना करते, जे पाषाणासारख्या (नीरस) जगताला स्वत:च्या प्रचुर अशा रसाने सारयुक्त बनविते, आणि क्रमाने प्रतिभा आणि वर्णनशक्ती या दोहोंच्या प्रसाराने (विस्तार-पूर्वक प्रयोगाने) त्या जगताला सुभग (रमणीय) बनविते, तसेच कवी आणि सहृदय या दोघांनाही जे जाणवते असे सरस्वतीचे तत्त्व म्हणजेच ध्वनी नामक काव्यतत्त्व सर्वोत्कृष्ट ठरते.

अभिनवगुप्तांचा स्वपरिचय

ज्याने नित्य आपले गुरू भट्टेन्दुराज यांच्या चरणकमळांशी आश्रय घेतला आणि त्यामुळेच सगळी शास्त्रे ज्याच्या हृदयावर ठसली (हृद्य–लोकांना अत्यंत प्रिय झाली) असा अभिनवगुप्तपाद हे नाव धारण करणारा मी लोकांसाठी स्वत:च्या 'लोचनाचे' नियोजन करून (स्वत:च्या नेत्राने सम्यक् निरीक्षण करून, 'लोचन' नामक टीकेची रचना करून), जसे जमेल तसे (अत्यंत अल्प प्रमाणात) आनंदवर्धनाच्या मूळ 'काव्यालोक' नामक ग्रंथाला प्रतिध्वनित करीत अधिक स्पष्ट करतो.

वृत्तिकार म्हणजेच स्वत: आनंदवर्धन अखंडितपणे परमेश्वराला नमस्कार करण्याच्या प्रवृत्तीमुळे त्या नमस्कारजनित पुण्यरूपी संपत्तीने कृतार्थ झालेला असला तरी व्याख्याता आणि श्रोता यांच्यामध्ये कोणतेही विघ्न न येता अभीष्ट अशा या ग्रंथावरील व्याख्यानाचे श्रवण लोकांना घडावे या फलपूर्तीसाठी योग्य प्रकारे आपल्या मनातील इच्छा प्रकट करून परमेश्वराच्या संमुख जात आहे.

ध्वन्यालोकाच्या मंगलाचरणावरील टीका

स्वेच्छाकेसरिण: स्वच्छस्वच्छायासितेन्दव: ।
त्रायन्तां वो मधुरिपो: प्रपन्नार्तिच्छिदा नखा: ॥

मधुरिपूची नखे तुम्हा सर्व व्याख्यात्यांचे आणि श्रोत्यांचे रक्षण करोत कारण या संदर्भात ज्यांना संबोधित करावे असे संबोधनाला लायक तेच होत आणि निश्चितच 'युष्मत्' या सर्वनामाच्या अर्थाचें सार 'संबोधन' हेच होय. (म्हणजेच युष्मत् हे सर्वनाम संबोधनासाठी वापरले जाते.) त्राण म्हणजे अभीष्ट लाभासाठी होणारे आचरण. अशा तऱ्हेचे आचरण विरोधी अशा अडथळ्यांच्या अपसरणाने सिद्ध होत असते, एवढ्या अर्थाने त्राण (निवारण) हा शब्द विवक्षित आहे. नित्य उद्योगी अशा भगवंताच्या ठिकाणी कधीही संमोहाच्या आहारी न जाता भक्तरक्षण करण्याचा निश्चय दिसून येत असल्याकारणाने उत्साहाची प्रतीती येते व त्यामुळे **वीररस ध्वनित होतो.**

(वरील मंगलाचरणाच्या श्लोकात) नखांना कर्तृपदी प्रथमा विभक्तीत ठेवून त्यांची आधिक्ययुक्त शक्तीच ध्वनित केली आहे. (नखेच स्वतः भक्तांची दुःखे नष्ट करतात असे म्हटल्यामुळे नखांच्या ठिकाणी असलेल्या शक्तीच्या आधिक्याचा बोध होतो.) कारण याठिकाणी नखे हीच प्रहाराची उपकरणे होत आणि प्रहाराच्याद्वारा भक्तांचे रक्षण केले जात असताना नखांहून भिन्न असे कोणतेही प्रहाराचे उपकरण वापरलेले नाही, यावरून परमेश्वराला अतिरिक्त अशा कोणत्याही कारणाची अपेक्षा नसते ही गोष्ट ध्वनित केलेली आहे. 'मधु'-नामक राक्षसाचा रिपू आहे हे सांगून सदैव संसारदुःखांचे निवारण करण्याचा त्याचा उद्योग सांगितला आहे. कशाप्रकारच्या मधुरिपूची नखे ? स्वेच्छेने केसरी अर्थात सिंहरूप धारण करणाऱ्या. कर्माच्या आधीन होऊन किंवा आणखी दुसऱ्या कोणाच्या इच्छेने नव्हे. (स्वेच्छेने केसरी बनलेल्या विष्णूच्या बाबतीत इच्छा शब्दामुळे कर्मपारतंत्र्य नाही. तसेच स्व या शब्दामुळे दुसऱ्या कोणाच्या इच्छेने केले असेही नाही. विशिष्ट कर्म केल्याने माणसाला पुण्य किंवा पाप लाभत असते. त्याच्या आधीन होऊन कर्म करीत असल्याने मनुष्य कर्मपरतंत्र होतो. अशा कोणत्याही पुण्यसंपादनाच्या इच्छेने परमेश्वर भक्ताचे रक्षण करीत नाही. तसेच भक्तरक्षणासाठी तो दुसऱ्या कोणाच्या इच्छेने नृसिंह बनला नाही.) हिरण्यकशिपू नामक विशिष्ट दानवाला मारण्यासाठी तशाच तीव्र इच्छेचा स्वीकार केल्यावर (मनात आणल्यानंतर) तिला (त्या इच्छेला) सर्वथैव उचित असल्यामुळेच नृसिंहरूप ज्याने स्वतःहून स्वीकारले असा येथे अर्थ घ्यावा. नखे कशी आहेत ? शरणागतांची दुःखे जी नखे कापून टाकतात. नखे ही वस्तूचा छेद करतात ही गोष्ट बरोबर आहे. पण दुःखाचा छेद करणे ही गोष्ट मात्र नखांच्या बाबतीत संभवनीय वाटत नाही. पण असे असूनसुद्धा परमेश्वराची नखे स्वेच्छेने निर्माण केली असल्याकारणाने त्यांच्याठिकाणी दुःखाचा छेद करणे संभवते, असा भाव आहे.

(दुःख नामक प्रतीतीचा छेद नखे कशी बरे करू शकतील ? यावर अभिनवगुप्त आणखी एक कल्पना सुचवितात.) तीन्ही लोकांना कंटकासमान

क्लेशदायक असलेला हिरण्यकशिपू हा संपूर्ण विश्वालाच पीडा देत होता आणि खरे पाहिले असता तोच प्रपन्नांना म्हणजेच केवळ भगवंताला शरण आलेल्या जनांना दुःख देत असल्याकारणाने मूर्तिमंत दुःखच होता. (दुःखाचे कारण असल्यामुळे तो साक्षात दुःखच होता असे मानता येते.) यामुळे त्याचा विनाश करणाऱ्या नखांनी पर्यायाने साक्षात् दुःखाचाच छेद केला. अशारीतीने परमेश्वराचे त्या अवस्थेतसुद्धा अतीव करुणामयत्वच कवीने सांगितले आहे. शिवाय ती नखेसुद्धा स्वच्छ होती म्हणजेच स्वच्छता गुणाने अथात निर्मळतेने युक्त होती. स्वच्छ, मृदू इत्यादी शब्द प्रामुख्याने त्या त्या भावांचे वाचक असतात. अशा या नखांनी स्वतःच्या छायेने म्हणजे वक्र (गोलाकार) आणि हृद्य अशा आपल्या आकृतीने चंद्राला कष्ट दिले. याठिकाणी अर्थशक्तिमूलध्वनिद्वारा बालचंद्रत्व सूचित केले आहे. तसेच आयासित करणे या उक्तीने त्या नखांच्या सान्निध्यात चंद्राचे कांतिहीनत्व आणि अहृद्यत्व प्रतीत होते, असे ध्वनित केले आहे. तसेही पाहिल्यास नखांचे आयासकारित्व प्रसिद्ध आहेच. (चंद्राला त्यांनी विशेष कष्ट दिले.) आणि त्यातही विष्णूच्या नखांच्या ठिकाणी तर ते लोकोत्तर स्वरूपात वर्णिले आहे, कारण त्यांची स्वच्छता आणि वक्रता पाहून बालचंद्र हा स्वतःशीच दुःखित होतो. एकवेळ असे गृहीत धरू की निर्मळता आणि वक्रता (वक्र आकार) ह्यांच्या बाबतीत आम्ही दोघेही सारखेच असलो तरी ही नखे शरणागतांचे दुःख निवारण करण्यात कुशल आहेत, मी मात्र नाही असा व्यतिरेक अलंकार देखील येथे ध्वनित केला आहे. तसेच मी पूर्वी माझ्या असाधारण अशा धवलतेने आणि हृद्य अशा आकाराने समस्त जनांच्या अभिलाषेला पात्र होणारा असा एकमेव होतो. आज मात्र ही बालचंद्राकार १० नखे आहेत. शिवाय दुःखित जनांच्या दुःखाचा विच्छेद करण्यात ती कुशल आहेत त्यामुळे यापुढे यांनाच लोक बालचंद्रासारखा बहुमान देतील, मला नाही या विचाराने बालेन्दू जणू काही निरन्तर कष्टी होतो असा उत्प्रेक्षा व अपह्नुती ध्वनी देखील येथे निघतो. अशा रीतीने वस्तू, अलकार व रस असा तीन प्रकारचा ध्वनी कसा निघतो याचे स्पष्टीकरण आमच्या गुरुजनांनी (भट्टेन्दुराजांनी) केले.

आता प्राधान्याने (या ग्रंथाचे) जे प्रधान प्रयोजन (ध्वनिस्वरूपकथन) आणि त्या प्रधान प्रयोजनाचे जे प्रयोजन (म्हणजेच अप्रधान प्रयोजन–सहृदय मनःप्रीती) ही दोन्ही प्रयोजने ज्यात प्रकट केली आहे ते आदिवाक्य म्हणजेच "काव्यस्यात्मा" ही कारिका सांगत आहोत.

ध्वनिकारिका : १

काव्यस्यात्मा ध्वनिरिति बुधैर्यः समाम्नातपूर्वः
तस्याभावं जगदुरपरे भाक्तमाहुस्तमन्ये ।

केचिद्वाचां स्थितमविषये तत्त्वमूचुस्तदीयं
तेन ब्रूमः सहृदयमनःप्रीतये तत्स्वरूपम् ॥

वरील कारिकेत येणारा 'बुध' हा शब्द काव्यात्मा या शब्दाच्या निकट आला असल्याकारणाने, 'त्या काव्यात्म्याच्या जाणण्याला निमित्त बनणारा तो बुध' या अभिप्रायाने ग्रंथकार (आनंदवर्धन) बुध शब्दाचे विवरण काव्य-तत्त्ववेत्ता असे देतात. काव्यात्मा या शब्दाचा अर्थ तत्त्व या पर्यायी शब्दाने स्पष्ट करीत असता त्याची (काव्यतत्त्वाची, आत्मरूप ध्वनीची) साररूपता आणि दुसऱ्या शाब्दज्ञानांहून त्याची विलक्षणता ही देखील दाखवू इच्छितात. आत्मा या शब्दासाठी तत्त्व हा शब्द वापरून आनंदवर्धनाने ध्वनीची काव्यातील साररूपता तर दाखविली आहेच पण त्याचबरोबर ध्वनी म्हणजे केवळ शब्द नव्हे किंवा वर्ण नव्हे तर या शब्दांहून विलक्षण असे हे तत्त्व आहे, हेही ग्रंथ-काराने (आनंदवर्धनाने) येथे दाखवून दिले आहे. (अन्यथा ध्वनी आणि शब्द हे एकच होत. आकाशाचा गुण जो शब्द, तो म्हणजे ध्वनीच होय. पण तो ध्वनी आणि हा ध्वनी निराळे होत ही गोष्ट तत्त्व या शब्दाने आनंदवर्धनांनी स्पष्ट केली आहे.) 'इति' हा शब्द ध्वनी या शब्दाची स्वरूपपरता (स्वरूपवाचकत्व) सांगतो (म्हणजेच बुधजनांनी, काव्याचा आत्मा ध्वनी ही गोष्ट सर्वांना सांगण्यापूर्वी स्वतः ध्वनीचे स्वरूप जाणलेच असेल आणि हे स्वरूपज्ञानपूर्वक ध्वनी शब्दाचे ज्ञान 'इति' या शब्दातून कारिकेत प्रकट केले आहे.) कारण ध्वनीचा अर्थ विवादास्पद झाला असल्याकारणाने कोणताही निश्चय होऊ शकत नव्हता (ध्वनिविषयक कोणताही निष्कर्ष काढता येत नव्हता.) आणि त्यामुळे ध्वनी या शब्दापासून अर्थप्रतीती येत नव्हती. (ध्वनी म्हणजे काय हे कोणालाच माहिती नसल्याने त्याचा अर्थ स्पष्ट झाला नव्हता.) हीच गोष्ट स्पष्ट करण्या-साठी वृत्तीमध्ये 'संज्ञितः' हा शब्द आला. वास्तविक त्या ठिकाणी ध्वनी हा शब्द केवळ संज्ञा म्हणून सांगितलेला नाही. आधी वस्तुतः त्या काव्यतत्त्वासाठी त्यांनी ध्वनी या संज्ञेचा वापर केवळ संज्ञा म्हणून केला नाही, तर ध्वनी ही संज्ञा (सारभूत तत्त्व) बुधांना समस्त काव्यातील एका सारभूत तत्त्वाची वाचक या नात्याने अभिप्रेत होती. अन्यथा काव्यतत्त्ववेत्त्यांनी तशा (केवळ संज्ञा मात्र असलेल्या) ध्वनीला कधीच प्रकट केले नसते. या अभिप्रायानेच आनंदवर्धन आता पुढे विवरण करताना सहृदय इत्यादी शब्द वापरतात, किंवा पुढील रीतीने अर्थ करणे अधिक योग्य ठरेल. 'इति' या शब्दाचा त्या वाक्यातील क्रम बदलवून त्याला संपूर्ण वाक्यार्थाचा परामर्शक या स्वरूपात ठेवावे. (ध्वनिः काव्यस्यात्मेति यः संज्ञितः समाम्नातः) म्हणजेच ध्वनिरूपी अर्थ काव्याचा आत्मा होय असे (इति) ज्याच्याविषयी (काव्यतत्त्ववेत्त्यांनी) सांगितले आहे, असे

वाक्य करावे. ध्वनी या संज्ञेचे फक्त शब्दपरत्व (शब्दासाठी शब्द किंवा संज्ञेसाठी संज्ञा म्हणून ध्वनी हे नाव दिले असे) मानल्यास ध्वनिसंज्ञित अर्थ म्हणजेच ध्वनी ही संज्ञा काव्याचा आत्मा होय हे मानल्यासारखेच होईल व मग या संपूर्ण ग्रंथाची संगतीच काय राहील ? केवळ ध्वनी या संज्ञेची शब्दपरताच मान्य करायची व त्याच्या अर्थाकडे वघावयाचे नाही असा अभिप्राय असल्यास ध्वनी हा शब्द काव्याचा आत्मा होय असे म्हणावे लागेल व हे म्हणणे म्हणजे या व्यक्तीने 'गवि' असे म्हटले (गवि इति अयं आह) या अनुकरण–वाक्यासारखे होईल. (या वाक्यातही 'इति' आहे व तो फक्त अनुकरण या अर्थीच वापरला आहे.) ध्वनी ही केवळ संज्ञा म्हणून न घेता तिचा वाच्यार्थासकट (ध्वनिशब्द-वाच्य) घेतल्यानंतर म्हणजेच अर्थ म्हणून (बुधजनांनी) मान्य केल्यावर मग मतभेदांना जागाच कोठे उरेल ? असा पूर्वपक्ष कल्पून अभिनवगुप्त म्हणतात अस्तित्वात नसलेल्या गोष्टींवद्दलचे मतभेद उद्भवतात असे नाही तर धर्मी अस्तित्वात असताना देखील त्यांच्या ठिकाणी असलेल्या धर्माच्या बाबतीत विवाद उत्पन्न होऊ शकतात. आता हा अप्रस्तुत विषय पुरे. कारण आधीच याने सहृदयांना बरेच क्लेश दिले आहेत.

ज्यावेळी एकच विद्वान व्यक्ती एखादे मत मांडते तेव्हा तिचे कथन चुकले असे संभवू शकते. पण तेच मत जेव्हा अनेक बुधजन मांडतात तेव्हा ते सर्व चुकले असे म्हणणे योग्य नव्हे. यासाठीच 'बुधैः' असे बहुवचन योजिले आहे. तेच अधिक स्पष्ट करीत आहे–'परम्परया' या शब्दाने.

ते बुधजन ही गोष्ट (ध्वनी हा काव्यात्मा आहे) अखंड अशा प्रवाहाने सांगत आले आहेत आणि ते सुद्धा कोणत्याही विशिष्ट पुस्तकात स्वमताचा अंतर्भाव न करता, असा परम्परया या शब्दाचा अभिप्राय आहे. अनेक विद्वज्जन एखाद्या अनादरणीय वस्तूचा एवढ्या आदराने उपदेश कधीच करणार नाहीत आणि हे तत्त्व तर आदराने उपदेशिलेले आहे. हीच गोष्ट – समाम्नातपूर्व – यातून दाखविलेली आहे. 'पूर्व' शब्दग्रहणाचा आशय हा की हा सिद्धांत या ग्रंथात प्रथमच सांगितला जात आहे असे नाही. यासाठीच स्पष्टीकरणातही म्हटले आहेच की उत्तमप्रकारे सर्व बाजूंनी (विचार करून) हा सिद्धांत प्रकट केलेला आहे. 'तस्य' या शब्दाचा अर्थ हा की ज्याच्या उपलब्धीसाठी (जे प्राप्त व्हावे यासाठी) वास्तविक प्रयत्न केले जावेत त्याच्या अभावाची कधीतरी कल्पना केली जाऊ शकते का ? तेव्हा आम्ही काय करावे ? अभाववाद्यांचा हा पराकोटीचा मूर्खपणा आहे असा भाव तेथे तस्य या पदाद्वारा प्रकट केला आहे.

अभाववाद्यांचे विकल्प (आक्षेप) आम्ही ऐकलेले नाहीत परंतु त्यांची कल्पना करून त्यामधील दोष आम्ही दाखवणार आहोत, म्हणून परोक्षभूत-

काळाचा प्रयोग केला. (जगदुः, ऊचुः इ.) भविष्यकाळात होऊ घातलेल्या वस्तू-मध्ये दोष दाखविणे योग्य नसते कारण ती उपपन्नच झालेली नसते, जर आपल्या बुद्धीने त्या वस्तूच्या टिकाणी दोषारोपण केले जात असेल तर बुद्धीवर आधीच आरोपित झाल्याकारणाने त्या वस्तूच्या भविष्यत्वाची हानी होईल. म्हणून भूतकाळाच्या उन्मेषाने परोक्ष असल्याकारणाने (प्रत्यक्ष नसल्याने) आणि ते विशिष्ट रूपाने वर्तमानकाळात विद्यमान असल्याची कोणतीही जाणीव नसल्या-कारणाने येथे "जगदुः" असा लिट् लकाराचा प्रयोग केला आहे.

ध्वनिव्याख्यानासाठीच (ध्वनीचे स्पष्टीकरण करण्यासाठीच) आता दोषांची कल्पना करून हे प्रकट केले जातील आणि ही संभावना देखील असंभवनीय अशा गोष्टीची केली तर ते योग्य नव्हे. संभवनीय गोष्टीचीच संभावना करणे उचित आहे. नाही तर संभावनांना आणि दूषणांना देखील अंतच राहणार नाही. म्हणून पुढे सांगितल्या जावयाच्या (पुढे विरोधकांच्या तोंडून वदविल्या जाणार आहेत अशा) संभावनांचे समर्थन करण्यासाठी त्या सांगण्याआधीच संभवन्ति – असे म्हटले. 'संभाव्यन्ते' असा (ज्यांची संभावना केली जाते असा कर्मणी) प्रयोग केला असता तर ती अर्थाची पुनरुक्तीच ठरली असती. जी गोष्ट संभवनीय असते तिच्या संभाविण्याची पुन्हा संभावना केल्या जाऊ शकत नाही, (ध्वनि-विरोधकांचे अमुक प्रकारचे पक्ष संभवतात अशी संभावना केल्या जाऊ शकते. हे वाक्य बरोबर नव्हे कारण त्यात पुनरुक्तीचा दोष आहे. म्हणून अशी द्वितीय संभावनाही वाक्यात प्रयुक्त केल्या जात नाही) उलट त्या संभवाची वर्तमानता हीच स्पष्ट असल्यामुळे वर्तमान काळातच त्या संभावनेचा निर्देश आनंदवर्धनांनी केला आहे. आता जी वस्तू संभवू शकते तिच्या आश्रयाने केलेल्या संभावनेच्या द्वारा जे काही संभावित केले असेल त्याचा निषेध कसा करता येईल ? या आक्षे-पाला उत्तर देण्यासाठी म्हणून 'विकल्पाः' असे म्हटले आहे. ज्यांची संभावना केली आहे (ध्वनीच्या बाबतीत) त्या 'वस्तू' नसून 'विकल्प' होत आणि ते विकल्प (काव्यातील) तत्त्वावबोधापासून परावृत्त झालेल्यांना स्फुरू शकतात. म्हणूनच 'आचक्षीरन्' इ. ठिकाणी संभावनेच्या अर्थी केलेले लिङ्लकाराचे प्रयोग अतीताच्याच (भूतकाळाच्याच) तात्पर्यात पर्यवसित होतात.

'यदि नामास्य' (नाम–अस्य) या ठिकाणी जर शरीर असे दिसले असते तर अशा प्रकारचे दृश्य पाहावयास मिळाले असते. अशारीतीने या वाक्याच्या अर्थाचा प्राण (सार) लिङ्लकारात म्हणजे भूतकाळात आहे हे लक्षात येते. तसेच जर 'असे झाले नसते तर' काय बरे घडले असते येथे देखील भूत-काळच समजावा, कारण येथे देखील पूर्वीप्रमाणे न घडण्याची संभावनाच व्यक्त केली आहे. तेव्हा आता मूळ विषयाशी संबंधित नसलेल्या या विषयाची चर्चा पुरे.

ध्वनिविरोधी मतांचे मुख्य प्रकार तीनच आहेत ते पुढीलप्रमाणे–

(१) ज्याच्या बाबतीत संकेताचे ग्रहण झालेले आहे असाच शब्द अर्थाचे प्रतिपादन करू शकतो हे लक्षात घेतले असता त्या संकेतितार्थाच्या म्हणजेच वाच्यार्थाच्या व्यतिरिक्त व्यङ्ग्यार्थ नावाचा दुसरा कोणताही अर्थ असूच शकत नाही.

(२) असा अर्थ जरी अस्तित्वात असला तरी तो अभिधावृत्तीने (शब्दाच्या वाच्य शक्तीने) आक्षिप्त झालेला व शब्दाच्या अवगत झालेल्या अर्थाच्या म्हणजे वाच्यार्थाच्या बलाने आकृष्ट झालेला (मागोमाग आलेला) असा असल्याकारणाने दुय्यम असून लक्षणेतच अंतर्भूत होऊ शकतो.

(३) अभिधावृत्तिद्वारा आक्षिप्त नसला तरी देखील (स्पष्ट जाणवणारा असला तरी) त्याच्याविषयी काहीही सांगता येत नाही–जसे कुमारिकेला विवाह-सौख्याबद्दल काही सांगता येत नाही.

त्यापैकी अभावविकल्पांचे तीन प्रकार होतात.

(१) शब्द व अर्थ या दोहोंवर आधारित असलेले असे गुण व अलंकार हेच खरे शब्दार्थांचे शोभाहेतू होत. (गुण व अलंकार हे शब्दार्थांच्या ठिकाणी शोभा उत्पन्न करतात) लोक व शास्त्र याहून भिन्न असलेल्या व सुंदर शब्दार्थांनी बनलेल्या काव्याचा शोभाहेतू दुसरा कोणताही (धर्म) राहू शकत नाही, जो आम्हाला मान्य नाही. हा झाला एक प्रकार.

(२) जो आम्हाला मान्य नाही तो धर्म काव्यात शोभा उत्पन्न करणारा असूच शकत नाही हा आक्षेपाचा दुसरा प्रकार.

(३) जरी शोभाकारक असला तरी आम्ही सांगितलेल्या गुणात किंवा अलंकारात तो अंतर्भूत होईल. त्याचेच नामांतर करण्यात कोणते बरे पांडित्य आहे ?

आजपर्यंत सांगितल्या गेलेल्या गुणांमध्ये किंवा अलंकारांमध्ये ध्वनीचा अंतर्भाव होऊ शकला नाही तरी कोणतातरी लहानसा विशेष प्रकार घेऊन दुसरे नाव ठेवता येते. कारण उपमेचे असे असंख्य प्रकार आहेत. (त्यापैकी कोणत्याही एका प्रकारात ध्वनीला अंतर्भूत करता येईल.) तरी देखील (उपमेच्या एखाद्या प्रकारात संनिविष्ट करून सुद्धा) गुण आणि अलंकार याहून तो निराळा सिद्ध होणार नाही. तर मग केवळ नाव बदलल्याने काय वेगळेपणा सिद्ध होणार ? ध्वनीच काय पण अशा इतरही वैचित्र्याची (नाविन्याची) कल्पना करणे सहज शक्य आहे. भरतमुनीसारख्या पुरातन मुनींनी यमक आणि उपमा हेच अनुक्रमे शब्दालंकार व अर्थालंकार म्हणून सांगितले आहेत. त्याने केलेल्या साहित्यशास्त्रीय

प्रपंचाची दिशाच इतर अलंकारांनी (दाखविली आहे) पाळली आहे. उदाहरणार्थ, 'कर्मण्यण्' या सूत्रानुसार कुम्भकारासारखे उदाहरण ऐकून स्वतःला नगरकार इत्यादी शब्दाची कल्पना करता येते. तेवढ्यानेच स्वतःला सन्मानित करण्याचे काय कारण ? (कुम्भकारावरून नगरकार शब्द तयार करण्यासारखे ध्वनितत्त्वाचा शोध हे कृत्य होय.) अशाप्रकारे ह्या अभावविकल्पामधील हा तिसरा प्रकार झाला. अशाप्रकारे एकाचे तीन विकल्प व अन्य दोन मिळून एकूण ध्वनिविषयक विप्रत्तिपत्तींचे पाच प्रकार होतात हा तात्पर्यार्थ.

तेच विकल्प आता क्रमशः सांगतात. 'शब्दार्थशरीरं तावत्काव्यम्' या व्याख्येतील तावत् या पदाचे ग्रहण करून या व्याख्येविषयी कोणाचेही दुमत नाही हे दाखविले आहे. शब्द आणि अर्थ म्हणजे ध्वनी नव्हेत मग शब्दार्थांना केवळ नवी संज्ञा (ध्वनी ही संज्ञा) देऊन कोणता बरे लाभ होणार आहे ? खरे तर 'शब्द आणि अर्थ यांचे चारुत्व म्हणजे ध्वनी.' मग ते सुद्धा दोन प्रकारचे होईल. १. स्वरूपमात्रनिष्ठ चारुत्व २. संघटनाश्रित चारुत्व. त्यापैकी शब्दांचे स्वरूपमात्रकृत सौंदर्य हे शब्दालंकारांनी व संघटनाश्रित चारुत्व हे शब्दगुणांनी उत्पन्न होत असते. अशाच रीतीने अर्थाचे स्वरूपमात्र चारुत्व उपमादी अर्थालंकारांनी व संघटनापर्यवसित रमणीयत्व अर्थगुणांनी उत्पन्न होते. तेव्हा गुण आणि अलंकार याहून वेगळा असा ध्वनी कोणीही नाही.

संघटना–धर्म हे शब्द व अर्थ यांचे होत हा वाक्याचा अध्याहृत भाग समजावा. जे गुण व अलंकार याहून व्यतिरिक्त असेल ते चारुत्वकारी असू शकत नाही. असाधुत्वासारखे नित्य दोष व दुःश्रवत्वासारखे अनित्य दोष हे गुणालंकारांहून भिन्न होत. त्यामुळे ते चारुत्वहेतू नसतात आणि ध्वनी तर चारुत्वहेतू आहे त्यामुळे तो गुणालंकारांहून व्यतिरिक्त नाही असा हा व्यतिरेकी हेतू आहे.

या म्हणण्यावर असा आक्षेप घेतला जाऊ शकतो की वृत्ती व रीती या गुणालंकाराहून व्यतिरिक्त आहेत व तरीही चारुत्वहेतू आहेत. तद्वतच ध्वनी देखील तद्व्यतिरिक्त असूनसुद्धा चारुत्व हेतू होऊ शकतो. म्हणून हा व्यतिरेक असिद्ध ठरतो. याला उत्तर म्हणून आक्षेपकांनी (रीती व वृत्ती यांच्यासाठी) तदनतिरिक्ता हे विशेषण वापरले आहे. वृत्ती आणि रीती यांचे तद्व्यतिरिक्तत्व (गुणालंकारव्यतिरिक्तत्व) सिद्धच होत नाही.

दीप्त, कोमल व मध्यम अशा वर्ण्य विषयांसाठी उपयुक्त असल्याकारणाने अनुक्रमे परुषत्व, ललितत्व व मध्यमत्व यांच्या स्वरूपविवेचनासाठी तीन वर्ग निर्माण झाले व ते तीन वर्ग निर्माण होण्यासाठी ज्या तीन अनुप्रासांच्या जाती निर्माण झाल्या त्याच वृत्ती होत, असे म्हटले जाते.

वृत्ती शब्दाची व्युत्पत्ती अशी दिली जाते की ज्यांच्या ठिकाणी अनुप्रास-भेद विद्यमान असतात त्या वृत्ती होत.

व्यंजनांचा प्रयोग ज्यांच्यामध्ये केला जातो अशा या तीन वृत्तींमध्ये निरनिराळ्या स्वरूपाचे अनुप्रास करण्याची कवी नेहमी इच्छा करतात, असे उद्भट म्हणतो.

पृथक् पृथक् म्हणण्याचे तात्पर्य असे की–परुष अनुप्रासांनी युक्त ती नागरिका, कोमल अनुप्रासांनी युक्त ती उपनागरिका किंवा ललिता. या दोन्ही ठिकाणी नगरनिवासी विदग्ध म्हणजेच चतुर अशा ललनेची उपमा अभिप्रेत आहे. मध्यम म्हणजे अकोमल व अपरुष असा अर्थ आहे. म्हणूनच वैदग्ध्यविहीन स्वभावाच्या व अकोमल आणि अपरुष अशा ग्राम्य स्त्रीच्या सादृश्यावरून या वृत्तीला ग्राम्या असे म्हटले आहे. या तिसऱ्या वृत्तीलाच कोमलानुप्रास असेही म्हटले आहे (भट्टोद्भटादींनी). यावरून वृत्ती म्हणजे अनुप्रास–जातीच होत. याठिकाणी वैशेषिक वृत्ती ही संज्ञा विवक्षित नाही जिच्यानुसार एका जातीच्या ठिकाणी जातिमानाचे वर्तमानत्व असू शकत नाही. येथे तर वृत्ती या जाती आहेत असे म्हटले आणि त्यांच्या ठिकाणी त्या प्रकारच्या अनुप्रास जातींचे वर्तमानत्व सांगितले. वैशेषिकानुसार येथे जातीच्या ठिकाणी म्हणजेच उपनागरिकादी वृत्तींच्या ठिकाणी अनुप्रास हा अन्य कसा बरे राहू शकेल ? म्हणून येथे वृत्तीमध्ये अनुप्रासाचे वर्तमानत्व अनुग्राह्य–अनुग्राहक भावाने मानले पाहिजे.

जसे कोणीतरी म्हटलेच आहे की लोकोत्तर अशा गांभीर्याच्या ठिकाणी राजे (पृथ्वीचा उपभोग घेणारे) राहात (तसेच) वृत्तीमध्ये अनुप्रास राहतात हे विधान तसेच समजावे म्हणून (ध्वनिविरोधकांचा) निष्कर्ष असा की वृत्ती या अनुप्रासादिकांहून काही अधिक (वेगळ्या) व्यापाराने युक्त नसतात. म्हणूनच त्या दोहोंचा व्यापार भिन्न नसल्याकारणाने त्यांचे (वृत्तींचे) स्वरूप जाणण्यासाठी वेगळे अनुमान करण्याची गरज नसते. म्हणून 'वृत्ती' हा शब्द 'व्यापार' ह्या अर्थी अभिप्रेत आहे, असे समजावे. याच कारणाने म्हणजेच वृत्ती या अनुप्रास-जातीहून अतिरिक्त (वेगळ्या) नसल्याने भामहादिकांनी वृत्तींवर विवरणच केले नाही. उद्भटादिकांनी वृत्ती शब्दाचा प्रयोग केला परंतु त्याद्वारा कोणताही अधिक अर्थ हृदयपथावर अवतीर्ण झाला नाही. त्या शब्दावर या ग्रंथकारांनी देखील काही अधिक प्रकाश टाकला नाही. याच अभिप्रायाने ग्रंथकार म्हणतात की अशा या वृत्ती देखील आमच्या कानावर आल्या आहेत.

रीतींच्या बाबतीत देखील असेच. 'तदनतिरिक्त' म्हणजेच गुणालंकारांहून वेगळ्या नसलेल्या अशा रीती देखील आमच्या कानी पडल्या आहेत.

'तत्' शब्दाने येथे माधुर्यादी गुण अभिप्रेत आहेत, आणि त्यांच्या वृत्ती किंवा स्वभाव समुचित प्रमाणात अर्पण होण्यामुळे आणि त्यांच्या ठिकाणी परस्परात मिसळून जाण्याची क्षमता असल्यामुळे, गूळ, मिरे, इत्यादी पदार्थांच्या चवी परस्परात मिसळून ज्याप्रमाणे पानक रस तयार होतो तसे संघाताच्या स्वरूपात त्यांचे एकीकरण होते व दीप्त (ओजस्वी), ललित (कोमल), किंवा मध्यम असे वर्ण्यविषय असलेले हे तीन प्रकार अनुक्रमे गौड, वैदर्भ व पांचाल या देशांच्या (आवडीच्या) स्वभाव वैशिष्ट्यांच्या प्राचुर्यावरुन अनुक्रमे गौडी, वैदर्भी व पांचाली या त्रिविध रीतींच्या रूपात ओळखले जातात.

जाती ही जातिमानाहून निराळी नसते तसेच समुदाय हा समुदायीहून भिन्न नसतो. त्याचप्रमाणे वृत्ती आणि रीती या अनुक्रमे गुण व अलंकार याहून निराळ्या नसतात. या प्रमाणे हा व्यतिरेकी हेतू कायमच राहतो. हीच गोष्ट पुढीलप्रमाणे मांडतात–त्याहून त्या पूर्ववर्णित चारुत्वहेतूंहून) निराळा असलेला कोण बरे हा ध्वनी ?

हा तुमचा ध्वनी काव्यात चारुत्वाचे स्थान होऊ शकत नाही कारण शब्द व अर्थ या दोहोंच्या स्वरूपाचा अभाव त्याच्या ठिकाणी आहे. तसेच तो चारुत्वाचा हेतूही नव्हे कारण गुण व अलंकार याहून तो व्यतिरिक्त (भिन्न) आहे. आक्षेपकाच्या 'को ऽयं ध्वनिर्नाम' या वचनातील 'नाम' या पदाद्वारे असे दाखवावयाचे आहे की काव्य हे जरी अखंड बुद्धीने आस्वादिले जात असले तरी अपोद्धारबुद्धीने म्हणजे केवळ शास्त्रीय विभाजनाच्या दृष्टीने काव्याचे विभाजन केल्या गेले तर तेथे ध्वनी शब्दाने सांगितला जाणारा असा कोणताच अतिरिक्त अर्थ (निराळा व जास्तीचा) सापडत नाही.

हा ध्वनी शब्दार्थांच्या स्वभावाचा नसला तर नसू दे, चारुत्व हेतू देखील नसू दे, पण त्यामुळेच तो गुणालंकाराहून व्यतिरिक्त तर निश्चितच ठरू पाहातो ही आशंका ठेवून आता अभाववादाचा दुसरा प्रकार सांगतात– 'अन्ये ब्रूयु:' या द्वारा. असा असला तरी देखील ध्वनी हा तुम्हा लक्षण करणाऱ्यांना (ध्वनिवाद्यांना) जसा वाटतो तसा नाहीच. (काव्यात्मा वगैरे स्वरूपाचा) म्हणजे काव्याशी ह्याचा काहीतरी संबंध आहे एवढेच म्हणता येईल. (काव्याशी संबंधित असलेल्या पण स्वत: काव्य नसलेल्या) अशा नृत्य, गीत व वाद्य यांच्यासारखा ध्वनीदेखील काव्याचा कोणीच नव्हे. (काव्याच्या अंतर्गत असलेला असा घटक नव्हे.) जे कवनीय असते त्यालाच काव्य म्हणतात, आणि त्याचा भाव म्हणजे काव्यत्व. नृत्त, गीत आदी कधीच कवनीय म्हणविले जाऊ शकत नाहीत. (तसाच ध्वनीदेखील 'कवनीय' म्हटला जाऊ शकत नाही, तो नृत्तगीतासारखा काव्याला केवल उपकारक ठरू शकतो.)

प्रसिद्ध प्रस्थान म्हणजे शब्द आणि अर्थ व त्यांचे गुण व अलंकार. प्रस्थान म्हणजे ज्या मार्गाने परम्परेने व्यवहार केला जातो तो मार्ग. काव्यप्रकारस्य म्हणजे तुला (ध्वनिवाद्याला) काव्यप्रकार या स्वरूपात अभिप्रेत असलेला तो मार्ग. कारण काव्यस्यात्मा असे म्हटलेलेच आहे. पण तो मार्ग काव्य का बरे ठरणार नाही? (असे पूर्वपक्षाने म्हणजेच ध्वनिवाद्याने विचारल्यास) त्यावर अभाववादी म्हणतात की सहृदयांच्या हृदयांना आह्लाद देणाऱ्या शब्दार्थांनी युक्त असणे हेच काव्याचे लक्षण होय. (आणि उक्त प्रस्थानाहून भिन्न असलेल्या 'मार्गाला' 'ते' लागू पडत नाही–मार्गाच्या ठिकाणी 'ते' संभवत नाही.)यातील 'मार्गस्य' या शब्दाचा अर्थ नृत्त, गीत, अक्षिनिकोचन इत्यादींसारख्या मार्गाच्या बाबतीत असा होतो. (ध्वनिमार्ग हा काव्याशी तेवढाच संबंधित आहे जेवढे नृत्त, गीत आदी मार्ग होत.) तत् चा अर्थ सहृदयहृदयाह्लादिशब्दार्थमयत्त्व हे काव्यलक्षण.

यावर पुन्हा पूर्वपक्षी म्हणजे ध्वनिवादी असे म्हणू शकतात की तशा प्रकारच्या अपूर्व (पूर्वी कधीही वर्णिल्या न गेलेल्या) ध्वनितत्त्वाला जे काव्य-स्वरूपात पाहतात तेच सहृदय होत. त्यांना मान्य होणे हेच काव्यलक्षण होय. आणि ते लक्षण उक्तप्रस्थानाहून भिन्न असणाऱ्या तत्त्वाला लागू पडू शकते.

ही शंका जाणूनच अभाववादी 'न च तत्समयान्तःपातिनः.....' हे वाक्य उच्चारतात.

जसे मी आता खड्गाचे लक्षण करतो असे म्हणून एखाद्या व्यक्तीने पुढील-प्रमाणे लक्षण केले–जो लांब व रुंद अशा स्वरूपात ताणला जातो, जो संपूर्ण देहाला आच्छादित करणारा, सुकुमार, रंगीबेरंगी धाग्यांनी विणलेला, घडी घालता येण्यासारखा व पसरविता येण्यासारखा, स्वतः कापू न शकणारा परंतु सहज कापल्या जाणारा तो उत्कृष्ट खड्ग. त्यावर 'अरे, अशाप्रकारचे तर वस्त्र असते, खड्ग नसतो' असे म्हणून इतरांनी त्याच्यावर आक्षेप घेतल्यास त्याने 'मला माहिती असलेला खड्ग असाच आहे' असे ज्याप्रमाणे उत्तर द्यावे त्याप्रमाणेच हे होय म्हणजेच ध्वनीला 'काव्य' संबोधणे होय. लक्ष्य कधीच कल्पित नसते, ते नेहमीच प्रसिद्ध (प्रत्यक्ष अस्तित्वात असणारे, सापडणारे) असे असते. हीच गोष्ट सकलविद्वद्...या वाक्यातून सांगितली आहे. ध्वनी कशाला म्हणावे हे जाणणारे म्हणजेच ध्वनीचा संकेत (समय) जाणणारे असेच विद्वान असतील या शंकेचे निराकरण 'सकल' शब्दाने केले आहे. (सगळ्या विद्वज्जनांची मान्यता ध्वनीला काव्यतत्त्व म्हणण्याच्या बाबतीत कधीच मिळणार नाही त्यामुळे ध्वनी हे काव्यतत्त्व आहे ही गोष्ट सिद्धच होऊ शकणार नाही.) अशाप्रकारे ध्वनीला काहींनी मान्यता दिली तरी काहीच

होणार नाही उलट त्यांची उन्मत्तताच प्रकट होईल असा येथे म्हणण्याचा भाव आहे.

ज्याने या द्वितीय अभाववाद्यांचा अभिप्राय निराळ्या पद्धतीने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे (त्याचे सर्व म्हणणे त्याच्याच युक्तिवादाच्या विरोधात जाते, ध्वनिवाद्यांच्या बाजूने होते.) तो (ध्वनिविरोधक) असे म्हणतो की "तुम्हाला (ध्वनिवाद्यांना) ध्वनी काव्याच्या जीवितरूपात मान्य आहे, आणि जीवित हे तर प्रसिद्ध प्रस्थानाहून अतिरिक्त आहे (काव्यमार्गाच्या बाहेरचे आहे) कारण अलंकारकारांनी ते (जीवित नामक कोणतीच गोष्ट) सांगितलेले नाही. म्हणून ते काव्य होऊ शकत नाही." जर त्या पूर्वपक्षवाद्याने (म्हणजे ध्वनिमत मांडणाऱ्याने) काव्याचे अनुप्राणक तत्त्व म्हणून ध्वनीचा अंगीकार केला असेल आणि पूर्वीच्या अलंकारशास्त्रज्ञांनी त्याबद्दल सांगितले तर उलट त्याचे (ध्वनीचे) लक्षण करणे अधिक आवश्यक होऊन बसते (ध्वनी हा लक्षणार्ह ठरतो), असे ध्वनिवादी म्हणतील. म्हणून (अभाववाद्यांच्या दृष्टीने) आधी केलेला युक्तिवादच श्रेयस्कर ठरतो.

ध्वनिवाद्यांच्या बाजूने असे म्हटले जाऊ शकते की तो चारुत्वहेतू असो, तसेच शब्द, अर्थ, गुण व अलंकार यामध्ये अंतर्भूत होणाराही असो पण तरीही 'ध्वनी' हे नाव देऊन, ते काव्यजीवित आहे अशाप्रकारे कोणीच त्याविषयी आजवर सांगितले नाही (म्हणून आता तरी ही गोष्ट सांगावयास हवी व म्हणूनच आम्ही ध्वनिविवेचन करीत आहोत.) असा युक्तिवाद ध्वनिवादी करतील अशी शंका आल्यामुळेच तृतीय अभाववादपक्ष उपस्थित केला आहे– पुनरपरे इ. द्वारा.

त्यापैकी 'कामनीयक' हा शब्द. कमनीयाचे कर्म ते कामनीयक. म्हणजेच चारुत्वाची प्रतीती उत्पन्न करण्यास कारणीभूत असा धर्म.

असेही म्हटल्या जाऊ शकते की विच्छित्तींचे (काव्यातील क्लृप्त्यांचे) असंख्य प्रकार असल्यामुळे एखादी अशीही विच्छित्ती असेल की जी आमच्या (ध्वनिवाद्यांच्या) लक्षात आली असेल परंतु जी उक्तस्वरूप अशा अनुप्रासादिकांमध्ये (अलंकारांमध्ये) तसेच माधुर्यादी गुणांमध्ये मात्र अंतर्भूत होऊ शकत नसेल. (त्यापुढे अशा विच्छित्तीविषयी सांगावयास हवे. ध्वनी निराळा मानावयास हवा) अशा युक्तिवादाची शंका आल्यामुळे, त्यांचे म्हणणे (प्रथम) मान्य करून नंतर वाग्विकल्पानाम्...इत्यादीद्वारा त्याचे खंडन करतात. वाक् शब्दाची व्युत्पत्ती तीन प्रकारांनी देता येते–१. जो सांगतो तो **शब्द** म्हणजे **वाक्**. २. जो सांगितला जातो तो अर्थ म्हणजे वाक्. ३. ज्याच्याद्वारा सांगितले जाते तो अभिधाव्यापार म्हणजे वाक्. त्यातही शब्द व अर्थ यांच्या वैचित्र्यप्रकारांना

अंत नाही. अभिधावैचित्र्याचे देखील असंख्य प्रकार आहेत. विवेचनात आलेल्या प्रकारलेश या शब्दाचा अभिप्राय असा आहे की तो ध्वनी चारुत्वाला कारणीभूत होणारा असा गुण असू शकतो किंवा अलंकार असू शकतो. पण एवढे मात्र निश्चित की काव्यसौंदर्यतत्त्वाच्या सामान्यलक्षणाद्वारा तो आधीच, अप्रत्यक्षपणे संगृहीत झालेलाच आहे. सर्वसामान्यलक्षण असे केले आहे की "काव्यशोभा उत्पन्न करणारे धर्म म्हणजे गुण, आणि ती शोभा वाढविणारे हेतू म्हणजे अलंकार." तसेच वक्र असा (अभिधेय) अर्थ आणि शब्द यांची उक्ती वाणीच्या अलंकारस्वरूपात अभीष्ट अभिप्रेत असते.

ध्वनिर्ध्वनिरिति असे म्हणण्यामागील तात्पर्य असे की द्विरुक्तीच्या द्वारा संभ्रमाचे सूचन करून अनादर दाखविला आहे. 'नृत्यते' या पदाला पुढील भाग जोडावयाचा राहिला–त्या ध्वनीचे लक्षण करणारे, ध्वनियुक्त काव्यरचना करणारे व असे काव्य श्रवण केल्यानंतर ज्यांना चमत्कार (आनंद) वाटतो असे–काव्याचे वाचक. ध्वनी या शब्दाविषयी काय हा कमालीचा आदर असा येथे भाव आहे. एपा दशा इ. वाक्यामागील तात्पर्य असे की अन्य आलंकारिकांच्या ठिकाणी असा स्वतःविषयी दर्प व अशी दुसऱ्याच्या द्वारा केल्या जाणाऱ्या स्तुतीची अपेक्षा दिसत नाही. वाग्विकल्प म्हणजे प्रतिभाव्यापाराचे असे प्रकार की ज्यांच्यामुळे वाणी प्रवृत्त होते (काव्याकरिता).

तेव्हा ध्वनी हा केवळ प्रवाद होय हा सर्व अभाववाद्यांच्या मतांचा केलेला सर्वसाधारण असा उपसंहार होय. ध्वनी हा शोभाहेतू असेल तर गुणालंकारांहून वेगळा असू शकत नाही. वेगळा असेल तर शोभाहेतू राहू शकत नाही, आणि शोभाहेतू असला तरी तो आदरणीय तत्त्व असू शकत नाही म्हणून ध्वनी केवळ प्रवाद आहे असा अर्थ घ्यावा. ही ध्वनीच्या अभावाची संभावना (कल्पना) असली तरी देखील निराधार मात्र नाही (म्हणजे तिला आधार आहे). तथा च अन्येन याचा अर्थ ग्रंथकाराच्या समकालीन अशा मनोरथ नामक कवीने (केलेला श्लोक). अलंकाराने युक्त नाही म्हणूनच मनाला आह्लाद देणारीही नाही. यातून ध्वनीच्या ठिकाणी अर्थालंकारांचा अभाव सांगितला आहे. तसेच व्युत्पन्न अशा वचनांनी रचलेले असेही त्यात काही नाही असे म्हणूनच ध्वनीच्या ठिकाणी शब्दालंकारांचाही अभाव सांगितला आहे. वक्रोक्ती म्हणजे उत्कृष्ट संघटना (रचना). तिने रहित असलेले असे तत्त्व म्हणजे ध्वनी असे म्हणून शब्दार्थगुणांचा अभाव सांगितला आहे. काही तर असे म्हणतात, वक्रोक्तिशून्य या शब्दाने काव्याच्या सामान्य लक्षणाचाच अभाव ध्वनीच्या ठिकाणी दाखवून सर्वच अलंकारांचा अभाव सांगितला आहे (मनोरथ कवीने). खरे तर दुसऱ्या अर्थात येणारा पुनरुक्तीचा दोष (एकदा अलंकाररहित्य 'न सालंकृति' या द्वारा

स्पष्टपणे सांगितल्यावर पुन्हा 'वक्रोक्तिशून्य' या शब्दाचा अर्थ अलंकारशून्यच घेणे म्हणजे पुनरुक्ती होय) त्यांना (तो अर्थ सांगणाऱ्यांना) टाळता आलेला नाही एवढेच त्यांच्याविषयी म्हटले म्हणजे पुरे. (म्हणजेच हा अर्थ अभिनव-गुप्तांना मान्य नाही.) श्लोकातील 'प्रीतीने' या शब्दाचा अर्थ 'एकाचे पाहून दुसऱ्याने केलेल्या अंधानुकरणामुळे' असा घ्यावा. 'सुमतिना' असे म्हणण्या-मागील तात्पर्य असे की एखाद्या मूर्खाने ध्वनीचे स्वरूप काय असे विचारले असता भ्रूभंग, नेत्रकटाक्ष इ. खुणांनीच त्याला उत्तर देत ध्वनीविषयी मन मानेल तसे सांगता येईल, (परंतु विद्वानाने विचारले असता हे ध्वनिवादी काय उत्तर देतील ?) असा येथे भाव आहे.

अशा तऱ्हेने हे अभावविकल्प शृंखलाक्रमाने म्हणजे एकातून दुसरा अशा क्रमाने आलेले आहेत. परस्परांशी असंबद्ध नाहीत. हीच गोष्ट तिसऱ्या अभाव-प्रकारनिरूपणाच्या वेळी आलेल्या 'पुनः' या शब्दाने दाखविली आहे. शिवाय तीन्ही मतांचा एकच उपसंहार(प्रवादमात्रं ध्वनिः) या गोष्टीला दुजोराच देतो. (शृंखलाक्रमाला सुसंगत ठरवितो.)

अभाववादाचा प्राण 'संभावना' हा असल्यामुळे परोक्ष (अभावं जगदुः) भूतकाळ वापरला आहे. परंतु भाक्तवाद (लक्षणा पक्ष) अगोदरच भिन्न भिन्न पुस्तकांमधून अविच्छिन्न रूपात सापडत असल्याने 'आहुः' असा नित्यप्रवृत्त वर्तमानकाळाच्या अपेक्षेने प्रयोग केला आहे.

(१) 'भक्ती' हा शब्द 'भज् सेवायाम्' या धातूपासून तयार झाला आहे. भज्यते म्हणजे जो सेविला जातो--पदार्थाद्वारा म्हणजेच पदाच्या मुख्यार्था-द्वारा किंवा वाच्यार्थाद्वारा. अर्थात अभिधेयाद्वारा म्हणजे वाच्यार्थाद्वारा ज्यांची कल्पना केली जाते असे प्रसिद्ध असलेले म्हणजे सर्वांना सुपरिचित असलेले असे (तटादींच्या बाबतीत) सामीप्यादी धर्म म्हणजेच भक्ती आणि त्या भक्तीपासून आलेला, निर्माण झालेला अर्थ म्हणजे भाक्त किंवा लाक्षणिक अर्थ. म्हटलेच आहे की–

अभिधेयाशी सामीप्याने, सारूप्याने, समवायाने, वैपरीत्याने व क्रियायोगाने लक्षणा पाच प्रकारची मानली आहे.

(२) भक्ती म्हणजे गुणसमुदायाचे प्रतिपादन करणाऱ्या शब्दाचा तैक्ष्ण्यादी अर्थभाग. शब्दाची वृत्ती म्हणजेच व्यवहार हा कोणत्या ना कोणत्या गुणांच्या संबंधात असल्यामुळे त्या शब्दाच्या अर्थाचा काही भाग म्हणजे हिस्सा हा गुणवाचक–गुणाचा बोध करून देणारा असतो. त्यालाच भक्ती असे म्हणतात. (येथे 'भाग' शब्दावरून 'भक्ती' तयार झाला. उदा. सिंहो

माणवकः, अग्निर्माणवकः या ठिकाणी सिंह किंवा अग्नी या शब्दाचा जो तीक्ष्णता किंवा तेजस्विता हा गुणरूप अर्थभाग त्याला भक्ती म्हणावे.) त्यापासून आलेला 'गौण अर्थ' (गुणावर आधारित असा अर्थ) म्हणजेच भाक्त.

(३) भक्ती म्हणचे श्रद्धातिशय. वक्त्याला त्या विशिष्ट लाक्षणिक प्रयोगातून प्रतिपाद्य अभिप्रेत असलेल्या अशा सामीप्य, तीक्ष्णता आदी गुणांच्या ठिकाणी असलेली आत्यंतिक श्रद्धा म्हणजे भक्ती. तिलाच प्रयोजन स्वरूपात मानून तिच्यापासून जो अर्थ उत्पन्न होतो तोच भाक्त म्हणविला जातो. अशाप्रकारे गौण व लाक्षणिक अर्थालाच भाक्त असे म्हणतात.

(४) मुख्य अर्थाचा भंग म्हणजे भक्ती. अशा रीतीने उपचरित वृत्तीचे म्हणजेच लक्षणेचे बीज असलेल्या मुख्यार्थबाध, निमित्त व प्रयोजन ह्या तीन तत्त्वांचे प्रतिपादन 'भक्ति' ह्या शब्दाद्वारे केले जाते.

काव्यात्मानं गुणवृत्तिः म्हणजे ध्वनी नामक काव्यात्म्याला काही लोक गुणवृत्ती असे म्हणतात. ग्रंथकारांनी **भाक्तम् आहुः** तम् अन्ये–या वाक्यात तं भाक्तम् या प्रयोगात जे सामानाधिकरण्य दाखविले आहे त्यागील आशय असा की–

ध्वनी व गुणवृत्ती (भक्ती) एकच होत. पण जरी अविवक्षिवाच्य ह्या ध्वनिप्रकारात निःश्वासान्ध इवादर्श इत्यादी उदाहरणात 'उपचार' म्हणजेच लक्षणा असली तरी केवळ उपचार हेच ध्वनीचे स्वरूप नव्हे. कारण ध्वनी हा उपचाराशिवायही राहू शकतो. उदा. विवक्षितान्यपरवाच्य या मुख्य ध्वनिप्रकारात उपचार नाही. तसेच अविवक्षितवाच्यात (लक्षणामूल ध्वनीत) देखील उपचार म्हणजेच ध्वनी असे नसते हे आम्ही पुढे सांगणार आहोत आणि स्वतः ग्रंथकारही सांगणार आहेत.

रूपभेद असल्यामुळे (रूप–भिन्नता असल्यामुळे) ध्वनी व भक्ती हे एकरूप आहेत असे म्हणता येत नाही. तसेच अतिव्याप्ती व अव्याप्ती या दोषांमुळे भक्तीने ध्वनीचे लक्षणही केल्या जाऊ शकत नाही परंतु एखाद्या ध्वनिप्रकाराचे मात्र ती (भक्ती) उपलक्षण होऊ शकेल.

(गुणवृत्ती शब्दाचा अर्थ) गुण म्हणजे सामीप्यादी व तैक्ष्ण्यादी धर्म. ह्या (गुणरूपी) उपायांच्या द्वारा ज्याची अन्य अर्थांच्या ठिकाणी वृत्ती होते असा शब्द किंवा त्या उपायांच्याद्वारा शब्दाची ज्याच्या ठिकाणी वृत्ती होते असा अर्थ म्हणजे 'गुणवृत्ती' होय. गुणांच्या द्वारा होणारे वर्तन म्हणजे गुणवृत्ती अर्थात अमुख्य अभिधा व्यापार. जो ध्वनित करतो तो शब्द म्हणजे ध्वनी, किंवा जो ध्वनित केला जातो तो अर्थ म्हणजे ध्वनी, किंवा ध्वननव्यापार म्हणजे ध्वनी हे जरी सांगितले असले तरी ध्वनी म्हणजे उपचरित शब्दार्थव्यापाराहून

निराळा असा काहीही नाही. मुख्यार्थाच्या बाबतीत अभिधाच (कार्यप्रवण) होते (हे निर्विवाद) त्यामुळे शिल्लक राहिलेल्या अमुख्य अर्थामध्येच ध्वनी समाविष्ट होतो कारण (या दोहोंहून–मुख्य व अमुख्य) तिसरी कोणतीही अर्थराशी अस्तित्वातच नाही.

ध्वनी म्हणजेच गुणवृत्ती असे कोणी म्हटले आहे ? असा प्रश्न विचारला जाईल असे वाटून 'यद्यपि च...' हा परिच्छेद लिहिला आहे. अन्यो वा म्हणजे गुण किंवा अलंकार ह्यांचा प्रकार. अमुख्य वृत्तीने काव्यात व्यवहार चालतो असे दर्शविणाऱ्या अर्थात भट्टोद्भट, वामन इत्यादींनी. भामहाने शब्द, छन्द, अभिधान, अर्थ, कथा, लोकयुक्ती, कला, इत्यादी काव्यहेतू होत असे म्हटले. त्यातील अभिधानाची शब्दाहून भिन्नता कशी आहे ते (म्हणजेच अभिधान व शब्द यात फरक काय ?) हे स्पष्ट करीत असता भट्टोद्भटाने म्हटले की शब्दांचे अभिधान म्हणजे अभिधाव्यापार. तो दोन प्रकारचा असतो–मुख्य व गुणवृत्ती.

वामनाने देखील सादृश्यावरून होणारी लक्षणा म्हणजे वक्रोक्ती असे म्हटले. ध्वनिमार्गः मनाक् स्पृष्टः म्हणजेज ध्वनिमार्गाला किंचित् स्पर्श केला याचा अर्थ त्यांनी (भामहादिकांनी) ध्वनीच्या दिशेचे उन्मीलन केले होते (संकेत केला होता) परंतु जसे लिहिले तसेच वाचणाऱ्यांना (व्याख्या करणाऱ्यांना) स्वरूप-विवेक (ध्वनी व लक्षणा यांच्या स्वरूपातील विवेक) करता आला नाही म्हणून त्यांनी स्वरूपविवेक केला नाही. उलट नारळ न फोडताच त्याला नावे ठेवावीत त्याप्रमाणे केवळ ऐकीव अशा त्यांच्या (भामहादिकांच्या) ग्रंथांच्या ग्रहणाच्या आधाराने त्यांची निंदाच केली. म्हणूनच ग्रंथकार आनंदवर्धन म्हणतात– 'परि-कल्प्य एवम् उक्तम्' म्हणजे 'याच लोकांना लक्षात घेऊन' आम्ही कारिकेत 'त्या ध्वनीला काही दुसरे लोक 'भाक्त' म्हणतात' असे म्हटले. जुन्या ग्रंथकारांचे रहस्य जाणून न घेता या लोकांनी 'ध्वनिमार्गः मनाक् स्पृष्टः' अशी विधाने केली (म्हणजे अमुख्य वृत्तीत गुण–वृत्तीत भामहादिकांना ध्वनीच अभिप्रेत होता पण तो विषय त्यांनी स्पष्ट केला नाही असा अर्थ भाक्तवाद्यांनी केला.) अशी योजना जर केली नसती तर ध्वनिमार्गाला स्पर्श केला हे विधान पूर्वपक्षालाच मारक ठरले असते. (लक्षणावाद्यांच्या तोंडी 'ध्वनिमार्गाला स्पर्श केला' (ध्वनिमार्गः स्पृष्टः) हे विधान विरुद्ध प्रतीत झाले असते. म्हणून येथे यद्यपि च ध्वनि... हा परिच्छेद स्पष्ट करताना अभिनवगुप्तांना अशी योजना करावी लागली. म्हणजेच भामहादिकांनी जिचा ओझरता उल्लेख केला आहे ती गुणवृत्ती म्हणजेच ध्वनी होय. तेव्हा ध्वनी व गुणवृत्ती एकच होत हा निष्कर्ष भाक्तवाद्यांनी काढला.)

शालीनबुद्धीचे म्हणजे ज्यांची मती अप्रगल्भ आहे असे. हे तीन्ही ध्वनि-विरोधक (अभाववादी, भाक्तवादी आणि अनिर्वचनीयतावादी) उत्तरोत्तर अधिकाधिक श्रेष्ठ बुद्धीचे आहेत. पहिल्या प्रकारचे लोक (अभाववादी) हे संपूर्ण-पणे विपर्यस्त ज्ञानाने युक्त आहेत. मधले (म्हणजे भाक्तवादी) ध्वनीचे रूप जाणत असले तरी संदेहाने प्रगट करीत नाहीत, लपवितात. आणि शेवटचे (अनिर्वचनीयतावादी) लपवित नसले तरी (ध्वनी आहे ही गोष्ट) त्याचे लक्षण कसे करावे हे त्यांना कळत नाही. अशाप्रकारे अनुक्रमे विपर्यास, संदेह व अज्ञान ह्या गोष्टींचे वरील तीन पक्षांच्या ठिकाणी प्राधान्य आहे.

तेन एवंविधासु... या वाक्यात ग्रंथकारांनी 'तेन' हे एकवचन वापरले आहे कारण वरील विप्रतिपत्तींपैकी एकेका विप्रतिपत्तीचा वाक्यार्थ देखील त्यांच्या निरूपणाला कारणीभूत ठरू शकतो. 'अशाप्रकारचे मतभेद विद्यमान असताना' या ठिकाणी निर्धारणे सप्तमी वापरली आहे. ह्यापैकी (ह्या मतभेदांपैकी) एक जरी विप्रतिपत्ती असली तरी सुद्धा त्यासाठीच केवळ आम्ही ध्वनीचे स्वरूप सांगत आहोत (आम्हाला ध्वनिस्वरूप सांगणे भाग आहे.). तेव्हा ध्वनिस्वरूप सांगितले पाहिजे. (म्हणजे ध्वनी हा विषय होय.)

ध्वनी व शास्त्र ह्यांच्यामधील संबंध अभिधानाभिधेय–संबंध होय. (ध्वनी हे अभिधान, व शास्त्र हे त्याचा अर्थ सांगते म्हणून ते अभिधेय हाच साध्य–साधक भाव संबंध जाणावा.) तसेच वक्ता व श्रोता यांच्यातील संबंध व्युत्पादक–व्युत्पाद्य स्वरूपाचा होय. (साध्य, साधन, अधिकारी व प्रयोजन हे अनुबंध–चतुष्टय येथे पूर्ण होते.) विरुद्ध मतांचे (ध्वनिविरोधी) निराकरण करून त्याचे (ध्वनीचे) स्वरूप जाणून घेणे हे प्रयोजन होय. प्रयोजन व शास्त्र यांच्यातील संबंध साध्य–साधक भावाचा आहे हे सांगितलेच आहे. (व्युत्पाद्य म्हणजे ध्वनी व व्युत्पादक म्हणजे शास्त्र–असेही होऊ शकते कारण वक्ता व श्रोता यांचा उल्लेख मूळ संस्कृतात काही प्रतीत सापडत नाही).

श्रोतृगत प्रयोजन स्पष्ट करणारे प्रयोजनप्रतिपादक वाक्य सहृदयांच्या मनः-प्रीतीसाठी...इ. आता स्पष्ट करीत आहेत. 'तस्य हि...'यातील 'तस्य' शब्दाचा अर्थ मतभेदांच्या मार्गात सापडलेल्या अशा ध्वनीच्या स्वरूपाचे लक्षण कर-णाऱ्यांच्या मनात आनंद प्रतिष्ठित होवो हा आहे. आनंद म्हणजे निवृत्ती (मुक्ती) हे स्वरूप असलेला व चमत्कार हे दुसरे नाव असलेला. प्रतिष्ठा पावो यातील 'प्रतिष्ठा' म्हणजे विपर्यासादींनी ज्यांची बुद्धी उपहत झाली आहे अशा ध्वनि-विरोधकांना त्या ध्वनीचे उन्मूलन करता न आल्याने त्याला प्राप्त झालेली स्थिरता. अशी प्रतिष्ठा म्हणजेच स्थिरता लाभो हे प्रयोजन संपन्न करण्यासाठी त्याचे स्वरूप (ध्वनिस्वरूप) प्रकाशित केले जात आहे असा अर्थ आहे. (असा संबंध आहे.)

आनंद हे ग्रंथकाराचे नाव होय, तेव्हा देवालयात जशी मूर्तीला तशी सहृदयांच्या हृदयात आनंदवर्धनाचार्यांना कधीही नष्ट न होणारी अशी प्रतिष्ठा ह्या शास्त्राच्याद्वारा प्राप्त होवो असा भाव आहे. म्हटलेच आहे की–

ज्यांनी उत्तम साहित्यकृतींची रचना केलेली असते असे साहित्यिक स्वर्गवासी झाले तरी त्यांच्या सुंदर काव्यमय शरीराला कशाचेही भय नसते.

जेणेकरून सहृदयांच्या मनात प्रतिष्ठापना व्हावी असे याचे (ग्रंथकाराचे) मन असले पाहिजे आणि अर्थातच हा ग्रंथकार खरोखर सहृदयांचाही चक्रवर्ती आहे असेच म्हणावे लागते. जशी युद्धात अर्जुनाला परमप्रतिष्ठा होती तशीच आनंदवर्धनांना सहृदयांमध्ये परमप्रतिष्ठा आहे.

स्वत:च्या नावाचे प्रकटीकरण (उल्लेख) करून स्वत:विषयी सन्मान आणि विश्वास उत्पादन करून त्यांद्वारा श्रोत्यांना ह्या ग्रंथांकडे प्रवृत्त करावयाचे आहे, ही गोष्ट ह्या ग्रंथाच्या शेवटी आम्ही सांगणार आहोत. अशा तऱ्हेने ग्रंथकार, कवी व श्रोता ह्या तिघांचेही मुख्य प्रयोजन सांगितले,

कारिका २

योऽर्थ: सहृदयश्लाघ्य: काव्यत्मेति व्यवस्थित: ।
वाच्यप्रतीयमानाख्यौ तस्य भेदावुभौ स्मृतौ ॥

आम्ही ध्वनीचे स्वरूप सांगणार आहोत अशी प्रतिज्ञा करून वाच्य व प्रतीयमान असे अर्थाचे दोन भेद आहेत ह्या विधानाद्वारा वाच्यार्थाचा उल्लेख करणारी कारिका (प्रतिज्ञेशी) कशी काय सुसंगत ठरू शकते असा आक्षेप ह्या कारिकेवर घेतला जाऊ शकतो हे जाणून ती संगती दाखविण्यासाठी म्हणून–एक प्रस्तावनापर अवतरण ग्रंथकार कारिकेपूर्वी देतात–" तत्र ध्वनेरेव..." इत्यादी. अर्थात् अशा प्रकारचे अभिधेय आणि प्रयोजन असताना असा 'तत्र' या शब्दाचा अर्थ घ्यावा.

अभिधेय विषय–(दुसऱ्या कारिकेची सुरुवात करण्यापूर्वी आनंदवर्धन एक अवतरण देतात. ध्वनीचे लक्षण करण्यास प्रारंभ करण्यापूर्वी त्यामागची भूमिका स्पष्ट करणे लेखकाला आवश्यक वाटते. हाच आशय अभिनवगुप्त पुढीलप्रमाणे मांडतात–)

जी भूमीसारखी असते ती भूमिका. ज्याप्रमाणे नवीन (वास्तू) निर्माण करण्याची इच्छा झाली असता, आधी भूमी तयार केली जाते तद्वत् प्रतीयमान नामक ध्वनिस्वरूपाचे निरूपण करावयाचे असताना, निर्विवादपणे सिद्ध झालेला असा वाच्यार्थ हा भूमी (सारखाच) होय. त्याच्याच पृष्ठभागावर म्हणजेच

आधारावर प्रतीयमानाचा जास्तीत जास्त अंश उभा असतो (प्रतीतीला येतो.). प्रतीयमानाची गणना वाच्यार्थाच्या बरोबरीने समान शीर्षकाखाली करण्याचा हेतू हा आहे की (वाच्यार्थाप्रमाणेच) प्रतीयमानार्थाचा देखील अपह्नव करता येत नाही हे प्रतिपादन करावयाचे आहे. (प्रतीयमानार्थ हा जरी शब्दाचा साक्षात् अर्थ म्हणजे अभिधेय किंवा वाच्यार्थ नसला तरी तो वाच्यार्थाइतकाच स्पष्ट (स्फुट) असावा लागतो म्हणजेच तो लपविता येत नाही) 'स्मृतौ' असा शब्दप्रयोग करून 'यः समाम्नातपूर्वः' म्हणजे 'ज्याचे पूर्वाचार्यांनी वर्णन केले असा' या प्रथम कारिकेतील वचनालाच अधिक बळकट केले आहे.

काव्याचे शरीर शब्द व अर्थ यांनी बनलेले असते, असे जे म्हटले आहे त्यात शरीराचे ग्रहण केल्यामुळे त्या शरीरात अनुप्राणक असे कोणतेतरी आत्मतत्त्व असलेच पाहिजे. स्थूलत्व किंवा कृशत्व हे शरीराचे धर्म ज्याप्रमाणे बाह्य असल्यामुळे सर्वजनांना समजू शकतात त्याप्रमाणेच शब्दही सर्वजनसंवेद्य असल्यामुळे काव्यशरीराचाच भाग बनतात (शरीरस्थानीयच असतात.) अर्थ मात्र सर्व जनसंवेद्य नसतो. परंतु केवळ अर्थामुळे काव्य ही संज्ञा प्राप्त होत नसते, कारण लौकिक व वैदिक वाक्यांमध्ये अर्थ असतो, परंतु काव्य नसते. म्हणूनच 'सहृदयांना प्रशंसनीय वाटणारा' असे काव्यातील अर्थाविषयी म्हटले आहे. त्या (सलग) एकाच अर्थाचे दोन शाखांच्या स्वरूपात विवेकीजन विभाजन करतात ते केवळ विभागबुद्धीने किंवा अपोद्धारबुद्धीने. अर्थरूपता जर सारखीच असेल तर मग सहृदय एखाद्या विशिष्ट अर्थाचीच प्रशंसा का करतात? तर त्यात काहीतरी वैशिष्ट्य असते म्हणूनच. असा वैशिष्ट्ययुक्त ठरलेला जो प्रतीयमान अर्थाचा भाग तोच त्याच्या विशेषहेतुत्वामुळे विवेकी लोकांकडून 'आत्मा' स्वरूपात व्यवस्थापित केल्या जातो. परंतु वाच्यार्थाच्या परिचयाने ज्यांची हृदये विमूढ बनलेली असतात ते प्रतीयमानाची पृथक् सत्ता मानण्यास विरोध करतात जसे चार्वाक शरीराहून पृथक् असे आत्मतत्त्व मानण्यास विरोध करतात. अशा तऱ्हेने "योऽर्थः सहृदयश्लाघ्यः..."या ठिकाणी अर्थः या (एकवचनाच्या) द्वारा एकच अर्थ असतो असा प्रारंभ (उपक्रम) करून नंतर त्या अर्थासाठी सहृदयश्लाघ्य हे विशेषण वापरून त्याद्वारा काव्यार्थाच्या वैशिष्ट्याचा हेतूच सांगितला आहे. (काव्यार्थ हा सहृदयश्लाघ्य आहे म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण आहे.) आणि नंतर केवळ अपोद्धारबुद्धीने त्याचे दोन भेद किंवा अंश होतात असे सांगितले आहे. दोन्हीही (वाच्य व प्रतीयमान) काव्याचे आत्मे होत असे म्हणण्याचा ग्रंथकाराचा हेतू नाही.

कारिकेच्या भागात आलेल्या 'काव्य' ह्या शब्दाचे स्पष्टीकरण करण्यासाठी "काव्यस्य हि..." हा भाग येतो. ललित ह्या शब्दाने गुण व अलंकार

ह्यांचा अनुग्रह सांगितला आहे. उचित ह्या शब्दाने औचित्य हे रसविषयक असते हे दाखवून रसध्वनीचे जीवितत्त्व (काव्याचे जीवित रसध्वनी) सुचविले आहे. त्या (जीवितभूत) रसाच्या अभावी कशाच्या बरे आधाराने तुम्ही सर्वत्र औचित्याची घोषणा करू शकाल ? असा भाव आहे. योऽर्थः असे म्हणून कारिकेतील शब्दांचा जो अनुवाद ग्रंथकार करतो त्यामागील हेतू हे दाखविण्याचा आहे की ही गोष्ट इतरांना देखील मान्य आहे. तस्य...द्वौ भेदौ ह्याद्वारा लेखक हे दाखवू इच्छितात की–प्रतीयमानाला मिळालेली मान्यता ही (त्या सहृदयश्लाघ्य) अर्थाचे दोन अंश मानले असतानाच उपपन्न होते, त्यामुळे 'चारुत्वहेतू असल्याकारणाने ध्वनी गुणालंकारांहून वेगळा नाही' असे जे पूर्वी म्हटले त्यातील हेतू ध्वनीच्या बाबतीत असिद्ध ठरतो कारण ध्वनी हा आत्मस्वरूप आहे असे येथे दाखविले आहे. आणि आत्मा हा देहाचा चारुत्वहेतू कधीच नसतो. पण जर त्याला चारुत्वहेतू मानलेच तर वाच्यार्थाच्या संदर्भात त्याच्या (प्रतीयमानाच्या–ध्वनीच्या) ठिकाणी अनैकान्तिकत्व हा दोष येईल (हा हेत्वाभास होण्याची आपत्ती येईल.) अलंकार्य हा स्वतः कधीच अलंकार नसतो आणि गुणी हा कधीच गुण नसतो. ह्यासाठीच ह्या ठिकाणी वाच्यांशाचे ग्रहण केले. म्हणूनच पुढे जो वाच्यार्थ प्रसिद्ध असतो...इत्यादी सांगणारच आहेत.

कारिका ३

तत्र वाच्यः प्रसिद्धो यः प्रकारैरुपमादिभिः ।
बहुधा व्याकृतः सोऽन्यैः, ततो नेह प्रतन्यते ॥

तिसऱ्या कारिकेतील 'तत्र' या शब्दाचा अर्थ काव्यार्थाचे दोन अंश असले तरी देखील असा होय. 'प्रसिद्ध' ह्याचा अर्थ सुंदर स्त्रीचा चेहरा, उद्यान, चंद्रोदय इ. लौकिक स्वरूपाचा असतो. "उपमा आदी प्रकारांनी तो अनेकदा स्पष्ट झालेला आहे" ही त्याचीच (प्रसिद्ध शब्दाचीच) संगती समजावी. 'अन्यैः' हा कारिकेतील भाग 'काव्यलक्ष्मविधायिभिः' याद्वारा स्पष्ट केलेलाच आहे. म्हणून विशेष प्रतिषेधाद्वारा केवळ अनुमती देणेच शिल्लक राहिले आहे असे दर्शविण्यासाठी आम्ही केवळ अनुवाद मात्र करतो असे म्हटले आहे. (केवलमनूद्यते .....इ.)

कारिका ४

प्रतीयमानं पुनरन्यदेव वस्त्वस्ति वाणीषु महाकवीनाम् ।
यत्तत्प्रसिद्धावयवातिरिक्तं विभाति लावण्यमिवाङ्गनासु ॥

प्रतीयमानं पुनरन्यदेव–या चौथ्या कारिकेत आलेला पुनः हा शब्द वाच्यार्थाहून विशेषता सूचित करणारा आहे. म्हणजेच त्याहून (वाच्यार्थाहून) निराळा व त्याचबरोबर सारभूत असलेला असा होतो. महाकवीनाम् हे बहुवचन सर्व विषयांची व्यापकता दाखविणारे आहे (म्हणजे महाकवींच्या लेखणीतून कोणतेच विषय सुटू शकत नाहीत हे दाखवावयाचे आहे.)

ज्याचे विवेचन पुढे केले जाणार आहे अशा प्रतीयमान अर्थाने अनुप्राणित झालेले काव्य निर्माण करण्यात निपुण असलेल्या अशा प्रतिभेचा लाभ होण्यानेच महाकवित्वाची संज्ञा (उपाधी) प्राप्त होत असते. जे (काव्य) अशा प्रकारचे असते तेच शोभून दिसते. अत्यंत असत् वस्तूचे भान कधीच सिद्ध होत नाही. (शुक्तीच्या ठिकाणी भासणारे) रजत देखील अत्यंत असत् नसते (दुसरीकडे त्या रजताची सत्ता सिद्ध झालेली असते.) त्यामुळे ज्याची सत्ता (अस्तित्व) असते त्याचेच भान होते आणि भानामुळेच पुन्हा सत्तेचे ज्ञान होत असते. त्यामुळे जे प्रतीत होते ते तसे असतेच असे म्हटल्यासारखे होते. तेव्हा वरील वाक्यप्रयोगाचा अर्थ असा झाला की काव्यात प्रसिद्ध असे वाक्य हे धर्मी असून ते स्वतःहून व्यतिरिक्त अशा प्रतीयमानाने युक्त असते. कारण ते तसे प्रतीत होते. जसे–लावण्याने युक्त असलेले लावण्यवतीचे अवयव.

प्रसिद्ध शब्दाचा अर्थ सर्वांना प्रतीत होणे व अलंकृत असणे. (आनंदवर्धनाने) कारिकेत आणि वृत्तीत वापरलेला 'यत् तत्' (यत्तत्प्रसिद्धावयवातिरिक्तम्) हा सर्वनामसमुदाय दृष्टान्तस्वरूप अशा लावण्य व दार्ष्टान्तिक म्हणजे ज्याला दृष्टांत दिल्या गेला आहे तो प्रतीयमानार्थ ह्या दोहोंच्या बाबतीत पुढील गोष्टी दाखवून देतो-एक म्हणजे ह्या दोहोंचे तात्पर्य चमत्कारात आहे व तो चमत्कार वर्णन करण्यास कोणतीही संज्ञा (व्यपदेश) सापडत नाही (अव्यपदेश्यत्वम्) व दुसरे म्हणजे दृष्टान्ताच्या बाबतीत भासणारा व्यतिरेकाचा अभाव म्हणजेच लावण्याच्या बाबतीत ते लावण्य आणि ती देहाकृती या दोहोत भासणारा व्यतिरेकाभाव म्हणजेच भेदाचा अभाव अर्थातच अभेद. आणि त्याचप्रमाणे दार्ष्टान्तिकाच्या बाबतीत म्हणजे काव्यातील प्रतीयमानार्थाच्या बाबतीत तो अर्थ आणि (काव्यशरीररूपी) वाच्यार्थ या दोहोंमध्ये भासणारा व्यतिरेकाभाव म्हणजेच अभेद हे दोन्हीही भ्रम होत. हीच गोष्ट वृत्तीत किमपि ह्या शब्दाने स्पष्ट केली आहे.

लावण्य म्हणजे एक असा वेगळाच धर्म होय की जो अवयवांच्या सुसंघटित रचनेतून म्हणजेच अवयवसंस्थानातून अभिव्यक्त होतो परंतु त्यावेळी अवयवांहून मात्र तो निराळा असतो. अवयव निर्दोष असणे किंवा अवयवांच्या ठिकाणी अलंकारांचा संयोग होणे म्हणजे लावण्य नव्हे. कारण पृथक् स्वरूपात

दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या अशा कोणत्याही काणत्वादी दोषांनी रहित असे शरीरावयव असलेल्या स्त्रीच्या बाबतीत व त्याचप्रमाणे अलंकारांनी सजलेल्या अशाही स्त्रीच्या बाबतीत, 'ही लावण्यशून्य आहे' असा व्यवहार, तर वरीलप्रमाणे नसलेल्या एखाद्या स्त्रीच्या बाबतीत मात्र "ही लावण्यामृताचा वर्षाव करणारी चद्रिकाच होय" अशा तऱ्हेचा व्यवहार, सहृदयांकडून घडत असतो.

येथे कोणी आक्षेप घेऊ शकतील की लावण्य हे तर देहाहून व्यतिरिक्त असे तत्त्व म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु प्रतीयमानाच्या बाबतीत मात्र ते काय तत्त्व आहे हेच आधी आम्हाला माहिती नाही. त्यामुळे ते वाच्यार्थहून व्यतिरिक्त आहे हे कळणे दूरच राहिले. तशा रीतीने भासमानत्व म्हणजे प्रतीत होणे ही गोष्ट किंवा हा हेतूच असिद्ध असल्यामुळे प्रतीयमानार्थाचे अस्तित्व हे साध्यच सिद्ध होऊ शकत नाही.

अशा तऱ्हेच्या आक्षेपांची शंका आल्यामुळेच ग्रंथकारांनी 'स हि अर्थो...' इत्यादिद्वारा त्या प्रतीयमान अर्थाचे स्वरूप सांगितले आहे, आणि पुढे (लगेचच) 'सर्वेषु च तेषु प्रकारेषु वाच्यादन्यत्वम्' ह्याद्वारा प्रतीयमान हा वाच्यार्थहून भिन्न आहे ही गोष्ट प्रसिद्ध असल्याचे ग्रंथकार सिद्ध करणार आहेत.

त्यांपैकी प्रतीयमानाचे दोन प्रकार होत. एक लौकिक व दुसरा केवळ काव्यव्यापारातच प्रतीतीला येणारा. यांपैकी लौकिक अर्थ कधीतरी स्वशब्दाने वाच्य बनू शकतो व तो विधी निषेध इत्यादी अनेक प्रकारचा असून 'वस्तू' ह्या शब्दाने वर्णिला जातो. तो (लौकिक अर्थदेखील) दोन प्रकारचा असतो :

पहिला म्हणजे ज्याने पूर्वी कधीतरी वाक्यार्थात उपमादी अलंकारभाव अनुभविला आहे (म्हणजे पूर्वी वाक्यार्थदशेत–अर्थात् वाच्यार्थस्वरूपात प्रकट झाला असताना जो उपमादी अलंकार–स्वरूपाचा होता), परंतु आता मात्र दुसऱ्या ठिकाणी (संदर्भात) कोणत्याही प्रकारे गौणभाव धारण करीत नसल्यामुळे जो अलंकाररूप राहिलेला नाही. परंतु त्यालाच ब्राह्मणश्रमण न्यायाने त्याच्या पूर्वीच्या स्वरूप परिचयाच्या बलाने **अलंकारध्वनी** असे म्हणतात. परंतु अशा तऱ्हेच्या अलंकाररूपाच्या अभावाने (अशातऱ्हेचे अलंकाररूप नसताना) जो उपलक्षित म्हणजे व्यंजित होतो त्याला **वस्तुमात्र** असे म्हणतात. 'मात्र' शब्दाच्या ग्रहणाद्वारा तो दुसऱ्या कोणत्याही रूपाचा असण्याची शक्यता नाकारली आहे (निराकृत केली आहे).

प्रतीयमानाचा दुसरा प्रकार म्हणजे काव्यव्यापारैकगोचर प्रतीयमान. तो म्हणजे रसध्वनी होय. हा नित्य ध्वनिरूपच असतो. स्वप्नातदेखील स्वशब्दवाच्य बनत नाही किंवा लौकिक व्यवहाराचा विषय होत नाही. परंतु काव्यात शब्दांच्याद्वारा समर्पित केल्या जाणाऱ्या (वर्णिल्या जाणाऱ्या) व हृदयाशी संवाद

साधणाऱ्या अशा सुंदर विभावांना व अनुभावांना अनुरूप असलेल्या व हृदयात पूर्वीपासून विनिविष्ट असलेल्या रत्यादी वासना चाळविल्या गेल्यामुळे एक-प्रकारची सुकुमार अशी स्वसंवेदना (आत्मिक जाणीव) निर्माण होऊन तिच्या आनंदमय अशा चर्वणाव्यापाराद्वारा रसनीयतेला म्हणजे आस्वाद्यतेला प्राप्त होणारा तो रस. (ज्याचे स्वरूप रसनीय असते तो रस) तोच केवल काव्य-व्यापारातून गोचर (प्रतीत) होऊ शकणारा रसध्वनी असून तोच मुख्यतया काव्याचा आत्मा होय.

भट्टनायकाने, 'ध्वनी हा केवळ एक अंश होय, ते संपूर्ण काव्यरूप नव्हे' अशी जी टीका केली ती लागू पडलीच तर वस्तू व अलंकारध्वनी यांनाच लागू पडू शकते. रसध्वनी तर त्याने स्वतःच आत्मा ह्या स्वरूपात स्वीकारला आहे कारण अभिधा व भावना ह्या दोन अंशांनंतर रसचर्वणात्मक तिसऱ्या अंशाला स्थान देण्याचा निर्णय त्याने स्वतःच घेतला आहे. वस्तू व अलंकारध्वनी हे रस-ध्वनीतच पर्यवसित होतात ही गोष्ट आम्हीच पुढे सांगणार आहोत तेव्हा येथे अधिक विस्तार करीत नाही.

प्रतीयमानाचे 'वाच्यसामर्थ्याक्षिप्त' हे भेदत्रयांना म्हणजेच वस्तू, अलंकार व रस या तीन्ही प्रकारांना व्यापणारे लक्षण सामान्य लक्षण समजावे.

जरी ध्वनन हा **शब्दाचाच व्यापार** असला तरी सुद्धा त्याला सहकारी स्वरूपाच्या अशा **अर्थसामर्थ्याचे** अस्तित्व कधीही नष्ट होत नसल्याने (म्हणजेच सर्वदा विद्यमान असल्यानेच) ध्वनीचे वाच्यसामर्थ्याक्षिप्तत्व मानले आहे. (वाच्यार्थाशिवाय शब्द ह्या गोष्टीला काहीच अर्थ नसल्याने ध्वनीला शब्द-सामर्थ्याक्षिप्त न मानता अर्थसामर्थ्याक्षिप्त मानले आहे.) शब्दशक्तिमूल अनुरणनरूप ध्वनीच्या बाबतीत देखील अर्थसामर्थ्यामुळेच प्रतीयमानाची प्रतीती येत असते. शब्दशक्ती ही केवळ अवान्तर–सहकारिणी (गौण–साहाय्यक) असते हे आम्ही पुढे सांगणार आहोतच.

दूरं विभेदवान् (म्हणजेच प्रतीयमानाचा पहिला भेद) वाच्यार्थाहून खूपच भिन्न असतो. विधी व निषेध हे परस्परविरुद्ध होत ह्याबद्दल कोणाचेही दुमत असू शकत नाही. म्हणून प्रथम त्यांचेच उदाहरण देतात–

भ्रम धार्मिक विश्रब्ध सः शुनकोऽद्य मारितस्तेन ।
गोदावरीनदी कूललतागहनवासिना दृप्तसिंहेन ॥

(प्राकृत श्लोकाची संस्कृत छाया)

संकेतस्थानाला (प्रियकराच्या भेटीच्या ठिकाणाला) जीवितसर्वस्व मानणाऱ्या एका नायिकेची ही उक्ती आहे. त्या ठिकाणी एक संन्यासी फिरत

असल्याने उत्पन्न झालेल्या विघ्नरूपी दोषापासून व तसेच तो संन्याशी तेथील पाने फुले तोडून नेत असल्यामुळे त्या जागेची जी सौंदर्यहानी होत होती तिच्यापासूनही ते स्थान वाचविण्यासाठी ती स्त्री असे म्हणाली.

वरील उदाहरणात त्या संन्याशाचे गोदातीरावरील भ्रमण स्वतःसिद्ध आहे. (म्हणजे त्या स्त्रीच्या 'भ्रम' ह्या आदेशामुळे काही तो संन्याशी तेथे फिरत नाही. तर तो आधीपासूनच त्या परिसरात फिरतो आहे.) परंतु त्या भ्रमणात कुत्र्याच्या भीतीने बाधा येत होती. म्हणून आता त्या **बाधेचा निरास** झाला आहे असे सांगून ती स्त्री निषेधाभावस्वरूपात त्या संन्याशाला उद्देशून त्या ठिकाणी मुक्त, निर्भयपणे भ्रमण करण्याचा जो आदेश देते तो आदेश किंवा नियोग प्रैषादिस्वरूपाचा विधी नसून प्रतिप्रसवात्मक निषेधाभावस्वरूपाचा विधी होय. तसेच येथील 'भ्रम' हा लोट् लकार (आज्ञार्थ) देखील 'प्रवर्तन' ह्या अर्थाचा नसून अतिसर्ग (एखाद्या कार्यात आधीपासूनच प्रवृत्त झालेल्या एखाद्या व्यक्तीला त्या कार्यापासून निवृत्त करण्याच्या इच्छेने उलट प्रवृत्त होण्याची प्रेरणा दिली जाते तेव्हा त्याला अतिसर्ग किंवा इच्छानुकूल प्रवृत्ती, स्वेच्छाविहार असे म्हणतात.) व प्राप्तकाल ह्या अर्थी योजिलेला आहे. (पाणिनीय सूत्र–प्रैषातिसर्गप्राप्तकालेषु कृत्याश्च ३.३.१०३) (२८१७–प्रैषो विधिः। अतिसर्गः कामचारानुज्ञा। भवता यष्टव्यम्। भवान् यजताम्। चकारेण लोटोऽनुकर्षणं प्राप्तकालार्थम्। प्राप्तकाल यथा–गुरुणा भोक्तव्यम्। गुरुर्भुङ्क्तीत। भोजनं प्राप्तावसरम् इत्यर्थः।)

या वाक्यातून निघणारे भाव व अभाव हे परस्परविरोधी असल्यामुळे ते एकाचवेळी वाच्य होतात म्हणजेच अभिधेने कळतात असे म्हणता येत नाही. ते क्रमाने अभिहित होतात असेही नाही कारण अभिधाव्यापार थांबून थांबून किंवा क्रमाने विराम घेत होत नसतो. "जर अभिधेची शक्ती विशेषणात खर्ची पडली असेल तर अशी क्षीण झालेली अभिधा विशेष्यापर्यंत जाऊन पोहचू शकत नाही (विशेष्यरूप अर्थ दाखवू शकत नाही.)" या विधानावरून हे सिद्ध होते की अभिधेचा व्यापार विराम घेत घेत कधीच संभवत नाही. (आधी विधी हा अर्थ व नंतर थोड्या काळाने निषेध हा अर्थ अभिधेनेच कळतो ही शक्यता येथे नाकारली आहे. निषेधपर अर्थ व्यंजनेने कळतो हे सुचविले आहे.)

(पण हे ज्यांना मान्य नाही ते पुढीलप्रमाणे आक्षेप घेऊ शकतात.) 'भ्रम धार्मिक' ह्या वाक्यात तात्पर्यशक्तीचे पर्यवसान जे सांगावयाचे आहे त्यात न झाल्याने (म्हणजे वाक्यार्थाची पूर्ती तात्पर्यशक्तीने न झाल्यामुळे), दृप्त, धार्मिक, तद् (तेन) इत्यादी पदांच्या अर्थाचा अन्वय लागत नाही व त्या अनन्वयामुळे मख्यार्थाची प्रतीती येत नाही. मुख्यार्थबाध निर्माण झाल्यामुळे त्याच्या बलाने

आणि विरोध (त्या संन्याशाच्या भ्रमणाला विरोध करण्यासाठी म्हणून) हे जिचे निमित्त म्हणजे प्रयोजन आहे अशा विपरीत लक्षणेच्या द्वारा ही तात्पर्यशक्ती अभिहितान्वयवादाच्या दृष्टीने ह्या संपूर्ण वाक्यातून निघणाऱ्या निषेधरूप (भ्रमणनिषेध) अर्थाची प्रतीती आणून देते. (तात्पर्यशक्ती स्वतः अपर्यवसित असल्याने वाक्यार्थबोधासाठी लक्षणेची मदत घेते. अशा रीतीने अभिधा, तात्पर्य व लक्षणा ह्या तीन शब्दशक्तींच्या द्वारा भ्रम धार्मिक ह्या श्लोकातून अभावरूप–भ्रमणनिषेधरूप वाक्यार्थ निघतो असे ह्या आक्षेपकांचे म्हणणे आहे.) अशा रीतीने हा अर्थ शब्दशक्तिमूलच आहे, आणि व्यवहारात देखील बोलताना आपण 'ह्याने असे सांगितले' असेच बोलतो (ह्याने अमुक अर्थ ध्वनित केला असे आपण म्हणत नाही). तेव्हा येथे वाच्यार्थाहून अतिरिक्त अन्य अर्थ नाही असे पूर्वपक्षाला म्हणावयाचे आहे.

ह्यावर सिद्धांतपक्षाचे म्हणणे असे की हे म्हणणे योग्य नव्हे. येथे तीन व्यापार जाणवतात. सामान्य स्वरूपाच्या पदार्थबोधाच्या बाबतीत अभिधाव्यापार घडतो. जिच्यामुळे संकेताच्या अपेक्षेने शब्दापासून अर्थबोध होतो ती शक्ती म्हणजे अभिधा. संकेत हा अर्थाच्या तेवढ्याच अंशापुरता असतो. विशेषांशाचा बोध संकेताने होत नाही. कारण त्यामुळे आनंत्य व एकाचा व्यभिचार दोष देखील उत्पन्न होण्याचा धोका असतो. (संकेत हा नेहमी सामान्यरूप अशा पदार्थबोधासाठी उपयुक्त असतो. तो विशेषरूप वाक्यार्थाचा गोळाबेरीज स्वरूपाचा बोध करून देऊ शकत नाही. संकेतावर अवलंबून असलेल्या अभिधाशक्तीची ही मर्यादा आहे.) त्यानंतर (पदार्थबोध झाल्यानंतर) परस्परान्वित विशेषरूप असा वाक्यार्थबोध होण्यासाठी तात्पर्यशक्ती कामाला येते. "कारण विशेष हा दुसऱ्या कोणत्याही मार्गाने सिद्ध होण्याची शक्यता जेव्हा नसते तेव्हा अनेक सामान्ये मिळून विशेषाचा बोध करून देतात. (पदांचे अर्थ सुटचा स्वरूपात संकेतशक्तीने आपल्याला ज्ञात झाल्यानंतर त्यांच्याचपासून सलग असा विशेष वाक्यार्थ निर्माण करण्याची दुसरी कोणतीही शक्ती आपल्याजवळ नसते त्यामुळे ते सामान्य पदार्थच विशेषस्वरूपाचा वाक्यार्थ निर्माण करतात.)" असा न्याय आहे. म्हणूनच द्वितीय कक्ष्येमध्ये 'भ्रम धार्मिक' ह्या श्लोकात 'भ्रमण कर' ह्या विधीरूप अर्थाशिवाय दुसऱ्या कोणत्याच अर्थाची प्रतीती येत नाही कारण द्वितीय कक्ष्येत केवळ अन्वय प्रतिपन्न होत असतो. 'गङ्गायां घोषः,' 'सिंहो बटुः' ह्या वाक्यांमध्ये योग्यता हा धर्म नसल्याने ज्याप्रमाणे अन्वय तयार होत असतानाच प्रतिहत केल्या जातो (बाधित होतो) त्याप्रमाणे काही 'भ्रम धार्मिक' ह्या वाक्यात घडत नाही. "तुझ्या भ्रमाणात अडथळा आणणारा तो कुत्रा कालच सिंहाकडून मारल्या गेला तेव्हा तुझ्या भ्रमणात अडथळा आणणारे कारणच नाहीसे झाल्या-

मुळे तुला भ्रमण करायला हरकत नाही" अशा स्वरूपाच्या ह्या अन्वयाची कोणतीही हानी येथे होत नाही. त्यामुळेच मुख्यार्थबाध होतो अशी शंकाही घेऊ नये. अशा रीतीने विपरीतलक्षणेला येथे वाव नाही.

किंवा असली तरीदेखील द्वितीय स्थानी ती संक्रात होऊ शकत नाही. ती ह्याप्रमाणे–मुख्यार्थबाधात लक्षणेची कल्पना केली जाते, आणि बाधा म्हणजे विरोधाची प्रतीती. ह्या उदाहरणात तर पदांच्या अर्थाचा स्वत:तच विरोध आहे असे दिसत नाही. परस्पर विरोध आहे असे म्हटल्यास तोही नाही कारण तो विरोध अन्वयाच्या ठिकाणी प्रतीतीला यायला पाहिजे. अन्वय प्रतिपन्न झाला नसताना विरोधाची प्रतीतीच येऊ शकत नाही. अन्वयाची प्रतिपत्ती अभिधाशक्तीने कधीही येत नसते. (पदांमधील परस्पर अन्वय दाखविणे हे काही अभिधेचे काम नव्हे.) कारण पदांचा अर्थ दाखवून क्षीणशक्ती झालेली अभिधा थोडा काळ थांबून अन्वयबोधासाठी पुन्हा व्यापारप्रवण होते असे घडत नाही. म्हणून अन्वयाची प्रतीती तात्पर्यशक्तीनेच येते.

जर असे मानले तर 'अंगुलीच्या अग्रभागी शेकडो श्रेष्ठ कवी राहातात' अशा बाधित वाक्यात देखील अन्वयाची प्रतीती येऊ लागेल अशी शंका पूर्वपक्षाने उपस्थित केल्यास ग्रंथकार म्हणतात, ज्याप्रमाणे दशदाडिमानि, षडपूपा ह्या वाक्यांमध्ये अन्वयप्रतीती नसते त्याप्रमाणे वरील वाक्यातही नसते असे म्हणण्याचे काय कारण ? तेथेही अन्वय असतो पण तो प्रत्यक्षादी अन्य प्रमाणांनी बाधित होत असल्याने, शुक्तीच्या ठिकाणी भासणाऱ्या रजताप्रमाणे त्या अन्वयाचा बोध करून देणारे वाक्य अप्रमाण ठरते (म्हणजेच विश्वासार्ह नसते.).

सिंहो माणवक: (हा माणवक सिंह आहे) ह्या उदाहरणात द्वितीयकक्ष्या निविष्ट अशा तात्पर्यशक्तीद्वारा निर्माण केल्या गेलेल्या अन्वयाचा बाध झाला आहे ही गोष्ट लक्षात आली म्हणजे अभिधा व तात्पर्य या दोन शक्तींहून भिन्न अशी लक्षणा नावाची तिसरीच शक्ती उत्पन्न होते. ही लक्षणा नामक शक्ती पूर्वीच्या बाधकतेला व्यर्थ बनविण्यात समर्थ असते. (त्यामुळे सिंहो माणवक: हे वाक्य दशदाडिमादि वाक्याप्रमाणे अप्रमाण नाही.)

तर मग 'सिंहो वटु:' अशा वाक्यात देखील काव्यरूपता मानावी लागेल कारण ज्याच्याविषयी आता लवकरच सांगितले जाणार आहे त्या ध्वननरूपी आत्म्याचे अस्तित्त्व तेथेही आहेच. घटाच्या ठिकाणी जीवव्यवहार घडायला लागेल कारण आत्मतत्त्व विभू (सर्वव्यापी) असल्याने ते तेथेही आहेच. जर असा युक्तिवाद केला की आत्मतत्त्व विशिष्ट अधिष्ठानाने युक्त अशा शरीरात असले तरच त्याच्या बाबतीत जीवव्यवहार होतो, कोणत्याही शरीराच्या बाबतीत होत नाही तर मग काव्यक्षेत्रात देखील गुण व अलंकार ह्यांच्या औचित्यामुळे

सुंदर बनलेल्या शब्दार्थशरीराच्या बाबतीत, ध्वननरूपी आत्मा विद्यमान असताना काव्यरूपतेचा व्यवहार होईल (अन्यथा नाही). वरील दोन्ही ठिकाणी आत्म्याची सारता नाही असे नाही (सिंहो बटुः ह्या वाक्यात ध्वनिरूपी आत्मा आहे, तसेच घटात व्यापक आत्मतत्त्व आहे पण पहिल्या उदाहरणाला काव्य म्हणता येत नाही, तर दुसऱ्या उदाहरणाला जीव म्हणता येत नाही. कारण दोन्ही ठिकाणी वैशिष्ट्यपूर्ण अशा शरीराचा अभाव आहे.) अशा रीतीने भक्ती म्हणजेच ध्वनी असे म्हणता येत नाही कारण भक्ती म्हणजे लक्षणाव्यापार होय जो तृतीयकक्ष्येमध्ये समाविष्ट होतो. (तृतीय अवस्थेच्या अंतर्गत येतो.) आणि चतुर्थ कक्ष्येत ध्वननव्यापार संभवतो. तो पुढीलप्रमाणे–तीन गोष्टींचा (मुख्यार्थबाध, निमित्त व रूढी किंवा प्रयोजन) समुदाय निकट असला की लक्षणा प्रवृत्त होते ही गोष्ट तर तुम्हीच सांगता. त्यापैकी मुख्यार्थाचा बाध हा तर प्रत्यक्ष आदी अन्य प्रमाणांवर अवलंबून असतो. सामीप्य आदी जे निमित्त सांगितले जाते ते देखील अन्य प्रमाणांनी ज्ञात होणारे असेच असते.

'गंगायां घोषः' ह्या उदाहरणात घोषाच्या ठिकाणी असलेले पावित्र्य, शीतलत्व, सेव्यत्व इत्यादी **अन्य शब्दांनी सांगता न येण्यासारखे** (वाच्य न बनणारे) तसेच **अन्य प्रमाणांनी प्रतिपादन न करता येण्यासारखे जे प्रयोजन** असते त्याबाबतीत किंवा 'सिंहो बटुः' या उदाहरणात बटूची जी अत्यंत पराक्रमशालिता (दाखवावयाची आहे) त्या बाबतीत **शब्दाचा कोणताच व्यापार नसतो असे नाही**. आमच्या म्हणण्याचा अर्थ पुढीलप्रमाणे–घोषाच्या ठिकाणी असलेल्या गंगासामीप्यामुळे त्या (शैत्यपावनत्ववादी) धर्माचे अनुमान होते असे म्हटल्यास अनैकान्तिकता हा दोष येतो. (**म्हणजे सामीप्य हा हेतू नेमका शैत्यपावनत्ववादी धर्माशीच संबंधित असतो असे नसल्यामुळे** येथे व्याप्तीचीच सिद्धी होत नाही. त्यामुळे तो हेतू एकान्तिक हेतू असू शकत नाही. त्यामुळे अनुमानाच्या आधारे गंगायां घोषः या उदाहरणात शैत्यपावनात्वादी प्रयोजनरूप अर्थ सामीप्य ह्या हेतूवरून सिद्ध करता येत नाही. म्हणून प्रयोजनाची प्रतीती अनुमान ह्या प्रमाणाने येऊ शकत नाही) तसेच बटू या शब्दाचे सिंहशब्दवाच्यत्व असिद्ध आहे. (कोणत्याही शब्दकोशात बटू व सिंह हे परस्परांचे पर्यायी शब्द या स्वरूपात दिलेले नाहीत. त्यामुळे पराक्रमातिशयशालित्व हा सिंहाचा धर्म बटूच्या बाबतीत अभिधेने लागू पडू शकत नाही. कारण बटू हा सिंह–शब्दवाच्य नाही. त्यामुळे तो सिंहधर्मांनी युक्त आहे असे अनुमान करता येत नाही. जो जो सिंह–शब्दवाच्य असेल तो तो सिंहधर्मांनी युक्त असतो ही झाली व्याप्ती. ती बटू ह्या पक्षाच्या ठिकाणी हेतूच्या अभावी म्हणजेच सिंहशब्दवाच्यत्वाच्या अभावी म्हणजेच सिंह व बटू यांचे स्वरूप सारखे नसल्यामुळे सिद्ध होत नाही).

जर कोणी असे म्हणू लागले की जेथे जेथे हा शब्दप्रयोग असेल तेथे तेथे हे विशिष्ट धर्म असतातच अशा प्रकारचे हे अनुमान समजावे (सिंह किंवा गंगा या पदांचा पराक्रमशालित्व किंवा शैत्यपावनत्व ह्या धर्मांशी व्याप्यव्यापकभावसंबंध मानून 'यत्र यत्र धूमस्तत्रतत्र वह्निः' या उदाहरणाप्रमाणे येथे अनुमानाने ज्ञान होते असा युक्तिवाद लक्षणेतील प्रयोजनप्रतीतीच्या बाबतीत कोणी केल्यास त्यावर पुढील उत्तर दिले आहे.) अनुमानाच्या बाबतीत देखील व्याप्तिग्रहणाच्या वेळी दुसरे कोणतेतरी मौलिक प्रमाण सांगावे लागते. (उदा. धूम व अग्नी यांच्या व्याप्तीच्या संबंधात असलेले महानसाचे उदाहरण–जेथे प्रत्यक्ष धूमावरून अग्नीचे अस्तित्त्व सिद्ध झालेले असते.) तसे प्रमाणांतर प्रस्तुत उदाहरणात (सिंहो बटुः येथे) देता येत नाही.

ही स्मृतीही नव्हे कारण अननुभूत वस्तूच्या बाबतीत स्मृती उत्पन्न होऊ शकत नाही (त्यामुळे प्रयोजनाची प्रतीती स्मृतीने आली असे म्हणता येत नाही. स्मृतीसाठी पूर्वानुभव आवश्यक असतो. वरील उदाहरणांमध्ये तसा अनुभव नाही.) वक्त्याला हीच गोष्ट सांगावयाची आहे अशा तऱ्हेचे कोणतेही नियामक तत्त्व ज्ञात नसल्याकारणाने असा निश्चय करण्यास कोणताच अवसर येथे नाही. तेव्हा येथे शब्दाचाच व्यापार आहे (प्रयोजनप्रतीतीच्या बाबतीत).

हा व्यापार अभिधा नव्हे, कारण तसा संकेत नाही. तात्पर्य नावाचाही व्यापार येथे नाही कारण अन्वयाची प्रतीती येत असतानाच तो क्षीण होतो (म्हणजेच तो प्रयोजनापर्यंत लांबविता येत नाही.) तो व्यापार लक्षणाही नव्हे कारण वर सांगितलेल्या कारणांमुळेच तेथे स्खलद्गतित्व म्हणजे मुख्यार्थबाध संभवत नाही. प्रयोजनाच्याही बाबतीत जर स्खलद्गतित्त्व निर्माण व्हायला लागले तर पुन्हा मुख्यार्थबाध, निमित्त व प्रयोजन असा अनवस्था प्रसंग ओढवेल. त्यामुळे कोणीतरी ही 'लक्षितलक्षणा' होय असे जे नामकरण केले ते केवळ व्यसन समजावे. तेव्हा अभिधा, तात्पर्य, लक्षणा ह्याहून भिन्न असा हा चौथा व्यापार आपण स्वीकारला पाहिजे. तो ध्वनन, द्योतन, व्यंजन, प्रत्यायन, अवगमन इत्यादी सहोदर संज्ञांनी म्हणजेच पर्यायी नावांनी वर्णिला जातो.

ही गोष्ट पुढे ग्रंथकार (आनंदवर्धन) सांगणार आहेत. ज्या फलाला उद्देशून मुख्य वृत्तीचा त्याग करून गुणवृत्तीच्या आधारे अर्थ दाखविला जातो, त्या फलाच्या (प्रयोजनाच्या) प्रतीतीसाठी शब्द कधीच स्खलद्गती होत नाही. (म्हणजेच प्रयोजनाच्या प्रतीतीसाठी, लक्षणेचे पहिले आवश्यक अंग म्हणजेच मुख्यार्थबाध–तेच सिद्ध होत नाही. मुख्यार्थ बाधित न होताच प्रयोजनाची प्रतीती येत असते.)

संकेताच्या अपेक्षेने वाच्यार्थाचे अवगमन (बोध) करून देणारी शक्ती म्हणजे अभिधा शक्ती. अभिधेने निष्पन्न झालेल्या (पदांच्या) अर्थांहून सर्वस्वी निराळा अर्थ उपपन्न होऊ नये यासाठी सहाय्यभूत ठरणारी अशी अर्थाववबोध करून देणारी शक्ती म्हणजे तात्पर्यशक्ती होय. मुख्यार्थबाध आदी सहकाऱ्यांच्या अपेक्षेने अर्थाचे प्रतिपादन करणारी शक्ती म्हणजे लक्षणाशक्ती. या तीन शक्तींमुळे उत्पन्न केल्या गेलेल्या अर्थाववबोधरूपी मूळातून जिची उत्पत्ती होते आणि या तीन अर्थांच्या निरंतर जाणिवेमुळे वाचकाच्या (श्रोत्याच्या, प्रेक्षकाच्या) संस्कारित केल्या गेलेल्या प्रतिभेच्या सहाय्याने जी अर्थाचे द्योतन (प्रकाशन) करते ती शक्ती म्हणजे ध्वनन व्यापार होय, आणि तो पूर्वीच्या तीनही व्यापारांना तिरस्कृत करीत स्वत: प्रधान होऊन काव्यात्मा बनतो.

'भ्रम धार्मिक' या उदाहरणात निषेध (भ्रमणाचा निषेध) मुख्य असल्याकारणाने, प्रयोजनरूपी अर्थसुद्धा निषेधविषयकच आहे असे म्हटले. हे केवळ विरोधी पक्षाच्या (पूर्वपक्षाच्या) समजुतीखातर म्हटले. (गंगायां घोष: या उदाहरणातील अभिधा, तात्पर्य व लक्षण या पूर्वकथित क्रमानुसार 'भ्रम धार्मिक' या उदाहरणात पूर्वपक्षाच्या मते भ्रमणनिषेधरूपअर्थ तृतीयकक्ष्यानिविष्ट असून लक्षणेने ज्ञात होतो. त्यांच्या मते या निषेधाचे प्रयोजन 'संकेतस्थान सुरक्षित ठेवणे' हे असून तो प्रयोजनरूपी अर्थ व्यंजनेने कळतो. त्यामुळे या उदाहरणाच्या वृत्तीत 'वाच्ये विधिरूपे प्रतिषेधरूप:' असे आनंदवर्धनांनी कसे म्हटले? अशी शंका पूर्वपक्ष उपस्थित करील हे जाणूनच अभिनवगुप्तांनी वरीलप्रमाणे उत्तर दिले आहे. विरोधक भ्रम धार्मिक या उदाहरणातसुद्धा लक्षणा आहे असेच गृहीत धरून चालतात. त्यांच्या मताला क्षणभर मान्यता देऊन अभिनवगुप्त असे म्हणतात की येथे निषेध मुख्य असल्यामुळे (तो लक्षणेने ज्ञात झाला असला तरी त्यालाच प्रयोजनाची जागा दिली आहे.) वस्तुत: या उदाहरणात लक्षणा नाही. कारण येथे वाच्यार्थाचा अत्यंत तिरस्कार किंवा त्याचे अर्थांतर–संक्रमण या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. अर्थशक्तिमूल ध्वनीच्या बाबतीत लक्षणाव्यापार संभवत नाही. सहकारी कारणे भिन्न असलीत की शक्तिभेद देखील स्पष्टच असतो. जसे शब्द तोच असला तरी जर त्याला व्याप्तिस्मरणादी सहकारी कारणांची जोड असली तर त्या शब्दातून काय सांगावयाचे आहे याचा बोध करून देणारा व्यापार अनुमापकत्व हा असतो. किंवा त्याच शब्दाला अक्ष म्हणजे इन्द्रियाची अर्थात इन्द्रियार्थसंनिकर्षाची जोड असेल तर विकल्पत्वव्यापार मानला जातो. अशारीतीने अभिहितान्वयवाद्यांना ध्वनीचे निराकरण करणे शक्य नाही.

जो अन्विताभिधानवादी 'शब्द ज्याच्यासाठी असतो तोच शब्दाचा अर्थ होय' असे आपल्या मनाशी ठरवून एखाद्या बाणाप्रमाणे अभिधाव्यापारच दीर्घ–

दीर्घ होत जातो असे मानतो त्याचा व्यापार जर दीर्घ असेल तर 'तो एक आहे' असे कसे बरे म्हटल्या जाऊ शकते ? कारण त्याचा विषय भिन्न असतो. जर तो 'अनेक' असेल म्हणजेच एक नसेल तर त्याच्याशी संबंधित सहकारी कारणे भिन्न असल्यामुळे (कारण–भेद असल्यामुळे) तो (व्यापार) सजातीय नसतो असे म्हणणेच योग्य होय. शिवाय कार्य जर सजातीय असेल तर पद–पदार्थज्ञ विद्वानांनी शब्द, कर्म, बुद्धी इत्यादींच्या बाबतीत विरम्यव्यापार म्हणजे अंतरा–अंतराने थांबत जाणारा व्यापार निषिद्ध मानला आहे. कार्य जर सजातीय नसेल (आरंभापासून अंतापर्यंत एकाच प्रकारचे नसेल) तर आमचाच पक्ष (आमची पद्धत) योग्य ठरते. (व ती म्हणजे शब्दाच्या वृत्ती किंवा शब्द-शक्ती भिन्नभिन्न आहेत व त्या म्हणजे अभिधा, लक्षणा व व्यंजना. तात्पर्य, एकच अभिधाशक्ती दीर्घ होत जाऊन अर्थबोध करून देते हे मत ध्वनिवाद्यांच्या मते चुकीचे आहे.)

आता जो हा चतुर्थकक्ष्यानिविष्ट अर्थ असतो तोच तात्काळ (अविलंब) वाक्याद्वारा अभिहित केला जातो अशा प्रकारचे दीर्घ–दीर्घत्व जर अपेक्षित असेल तर त्यावर असे म्हणता येते की त्या (चतुर्थकक्ष्यानिविष्ट) अर्थाच्या बाबतीत कोणताही संकेत केलेला नसल्याकारणाने त्याची साक्षात् प्रतीती कशी बरे येईल ? जर असा युक्तिवाद केला गेला की संकेतग्रहण निमित्तासाठी (मुख्यार्थासाठी–वाच्यार्थासाठी) आवश्यक आहे आणि हा अर्थ तर नैमित्तिक असून संकेताची अपेक्षा न करणारा आहे तर आम्ही एवढेच म्हणतो की या श्रोत्रियाची (विद्वानाची) उक्तिकुशलता तर पहा. जो अर्थ अंतिमकक्ष्येमध्ये समाविष्ट होतो तो यांच्यामते सर्वप्रथम प्रतीतीला आला आणि त्याच्या मागून येणारे सर्व पदार्थबोध मात्र त्याचे निमित्त बनले. हे म्हणजे खरोखर मीमांसकाचा पणतू त्याला (मीमांसकाला) जन्म देता झाला असे म्हणण्यासारखेच आहे.

जर पूर्वपक्षाचे म्हणणे असे असले की आधी केल्या गेलेल्या संकेतग्रहणाने ज्याचे हृदय संस्कारयुक्त झाले आहे त्यालाच अशा प्रकारचा झटितिप्रत्यय येतो, तर मग या वस्तुस्थितीनुसार पदांच्या अर्थांना निमित्तत्व प्राप्त होते. असे असेल तर त्या संकेतग्रहणाचे अनुसरण केल्याचा काय उपयोग होतो (चतुर्थकक्ष्यानिविष्ट अर्थ तत्काळ कळण्याच्या दृष्टीने) याविषयी–तुम्ही काहीही सांगितलेले नसेल. शिवाय पूर्वप्रतीत पदांच्या अर्थांच्या बाबतीत संकेतग्रहण घडलेले असते असेही नाही कारण (मीमांसकांच्या मते) अन्वित अशा पदांचाच नेहमी वाक्यात प्रयोग होत असतो. अवाप–उद्वाप तत्त्वानुसार–म्हणजेच वाक्यात काही शब्द शिरतात व काही बाहेर पडतात–त्यांच्या बाबतीत तरी संकेतग्रह होतो असे म्हटल्यास

संकेत हा फक्त पदार्थाच्या बाबतीतच ग्रहण केल्या जातो असे मानावे लागेल व वाक्यातून होणारी विशेषप्रतीती मागाहून होते असा अर्थ होईल.

जर पूर्वपक्षाचे (अन्विताभिधानवाद्यांचे) म्हणणे असे असेल की वाक्यातून तात्पर्यार्थाची प्रतीती ताबडतोब येते हे आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे, त्याला आम्ही तरी काय करणार ? तर त्यावर अभिनवगुप्त म्हणतात की तुमचे हे म्हणणे आम्ही देखील नाकारत नाही कारण पुढे आम्ही देखील सांगणार आहोतच की–

"जो अर्थ (वाक्यश्रवणानंतर) वाच्यार्थापासून परावृत्त झालेल्या सहृदयांच्या तत्त्वावभासिनी बुद्धीच्या ठिकाणी तत्काळ आविर्भूत होतो...इत्यादी".

परंतु आमच्या म्हणण्याचे तात्पर्य हे आहे की वारंवार अतिशय अनुशीलनामुळे तेथे क्रम विद्यमान असला तरीदेखील (क्रम असणे शक्य असले तरीदेखील) जाणवत नाही. ज्याप्रमाणे सजातीय विकल्पांची म्हणजेच तपशीलांची परंपरा उत्पन्न झाली नसतानासुद्धा, विषय जर अभ्यस्त असेल म्हणजेच वारंवार अनुभविलेला असेल तर अनुमान (प्रमाणातील) व्याप्तीचे स्मरण किंवा प्रत्यक्ष (प्रमाणातील) समय (संकेताचे) स्मरण क्रमपूर्वक लक्षात ठेवावे लागतच नाही. (म्हणजेच क्रम असूनसुद्धा तो जाणवत नाही, कारण क्रम लक्षात ठेवण्याची गरजच नसते. वारंवार झालेल्या निरीक्षणाने व परिशीलनाने कोणत्याही तपशीलात न शिरता वाक्यश्रवणानंतर तत्काळ तात्पर्याची प्रतीती येते हा अन्विताभिधानवाद्यांचा अनुभव अभिनवगुप्तांनाही मान्य आहे. कारण व्यंग्यार्थप्रतीतीच्या बाबतीतही तो येत असतो. पण याचा अर्थ (तेथे) व्यंग्यार्थप्रतीतीच्या बाबतीत संकेतग्रहण, किंवा अनुमान असल्यास व्याप्तिग्रहण ही अवस्था किंवा हा क्रम संपूर्णपणे कधीच नाहीसा होत नाही. (फक्त तो इतका वेगाने घडतो की असूनसुद्धा जाणवत नाही.)

आणि निमित्त–नैमित्तिकभाव तर अवश्य अंगिकारिलाच पाहिजे. नाहीतर गौण आणि लाक्षणिक यांचा मुख्यार्थाहून भेदच सिद्ध होणार नाही, तसेच श्रुती, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान व समाख्या या (मीमांसकांना अनुमत असलेल्या) सहा प्रमाणांमध्ये उत्तरोत्तर प्रमाणे दुर्बल होत जातात या प्रक्रियेचा नाश होईल कारण हिचे समर्थनच मुळी निमित्तता–वैचित्र्यामुळे म्हणजे निमित्त–नैमित्तिक भेदामुळे केले जाते. मग एकदा निमित्ततावैचित्र्य मान्य केल्यावर आमचा द्वेष करण्याने तुम्हाला कोणता बरे लाभ होणार आहे ?

(मीमांसक ध्वनिविरोधी आहेत. अभिहितान्वयवादी व अन्विताभिधानवादी या दोहोंनाही अभिधा हाच मुख्य व्यापार वाटतो. पण जेव्हा ती अभिधा 'निमित्त' बनते तेव्हा ती मुख्य राहू शकत नाही त्यामुळे हा गौणमुख्यभाव

मीमांसकांना देखील शेवटी मान्य करावाच लागतो. मग व्यंग्यार्थाला वाच्यार्थापेक्षा (अभिधेपेक्षा) प्राधान्य देणाऱ्या ध्वनिवाद्यांना विरोध करून मीमांसकांना काय बरे साध्य होते असा प्रश्न अभिनवगुप्तांनी येथे केला आहे.)

कोणी अखंड अशा (नित्य) स्फोटाला वाक्य आणि त्याचा अर्थ मानतात. त्या अविद्येच्या मार्गात अडकलेल्या (जाऊन पडलेल्या) सर्वांना व्यवहारमार्गात याच प्रक्रियेचे अनुसरण करावे लागणार आहे. (व्यवहारात पद व पदार्थ यांच्याशिवाय मनुष्याला बोध होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती असल्यामुळे वाक्यातील प्रत्येक पदाचा संकेतितार्थ ग्रहण करावाच लागतो. त्यामुळे वाक्यार्थबोध हा अन्त्यबुद्धिनिर्ग्राह्य असतो म्हणजेच वाक्यातील शेवटचा शब्द ऐकल्यानंतर स्फोटशक्तीने संपूर्ण वाक्यार्थ, श्रूयमाण वर्ण नष्ट होत असले तरी, ऐकणाऱ्यासमोर उपस्थित होत असतो हा स्फोटवाद्यांचा अखंडवाक्यार्थाचा सिद्धांत मानूनसुद्धा प्रत्येक पदाचा अभिधार्थ (वाच्यार्थ) समजणे अत्यावश्यक असते. संपूर्ण वाक्याचा संकेत भाषेत कधीच रूढ केला जात नाही. त्यामुळे स्फोटवाद्यांना देखील अभिधेची प्रक्रिया (–तसेच अन्वयाची प्रक्रिया) अनुसरणे भाग आहे–असे अभिनवगुप्तांचे म्हणणे आहे.) एकदा व्यवहार पार केला की परमेश्वराशी कोणतेही द्वैत नसलेली अशी प्रतीती शिल्लक राहते, व तोच ब्रह्मानुभव ही गोष्ट तत्त्वालोकासारख्या ग्रंथाची रचना करणाऱ्या आमच्या शास्त्रकाराने (आनंदवर्धनाने) जाणली नव्हती असे नाही. तेव्हा जास्त बोलण्याची काय आवश्यकता ?

भट्टनायकाने जे म्हटले की या ठिकाणी (भ्रमधार्मिक या श्लोकात) दृप्त, सिंह आदी पदांच्या प्रयोगामुळे व तसेच 'धार्मिक' या पदाच्या प्रयोगामुळे भयानक रसाचा उद्भव होऊन त्याद्वारा निषेधाची प्रतीती येते. त्यांच्या (धार्मिक व सिंह यांच्या) अनुक्रमे भीरुत्व व वीरत्व या स्वभाववैशिष्ट्यांचा नियम (नित्यसंबंध) जाणून घेतल्याशिवाय संपूर्णपणे (निश्चितपणे) निषेधाचे ज्ञान होणे शक्य नाही. केवळ अर्थसामर्थ्य हे काही निषेधप्रतीतीचे निमित्त नव्हे.

त्यावर अभिनवगुप्त विचारतात, "वक्ता व श्रोता (बोद्धव्य) यांच्या प्रकृतिविशेषांचे ज्ञान झाल्याशिवाय व शब्दांच्या ठिकाणी असलेल्या ध्वननव्यापाराशिवायच निषेधाची प्रतीती येते असे कोणी म्हटले ? ज्याला बोध करून द्यावयाचा (ज्याच्यासाठी प्रतिपादन करावयाचे त्याच्या प्रतिभेचे सहकारित्व हे आम्हीदेखील द्योतनाचे (ध्वननाचे) प्राणस्वरूप म्हटलेले आहे. भयानक रसाचा आवेश (जो भट्टनायकाने सांगितला) देखील नाही असे आम्ही म्हणत नाही, कारण त्याच्या (धार्मिकाच्या) ठिकाणी (भयमात्राची) **केवळ भयाची (रसाची नव्हे)** उत्पत्ती आम्हालाही मान्य आहे, (रसावेश मात्र वाचकाच्या ठिकाणी आम्ही मानतो.) वाचकाच्या ठिकाणी उत्पन्न होणारा रसाभिनिवेश रसाच्या

अभिव्यक्तीद्वाराच होत असतो, आणि रस फक्त व्यंग्यच असतो. त्याचे शब्द-वाच्यत्व त्यानेदेखील (भट्टनायकाने देखील) मान्य केलेले नाही त्यामुळे येथे व्यंग्यत्वच आहे असे ठरते. वाचकाच्या ठिकाणी रसावेश नियत नाही कारण हा सहृदय (वाचक) त्या भिन्न्या संन्याशासारखा असेल असा काही नियम नाही.

जर सहृदय वाचकाचे वैशिष्टच हे सहकारी मानत असाल तर वक्ता (कवी किंवा कविनिबद्ध वक्ता) व सहृदय या दोहोंच्या प्रतिभेने अनुप्राणित झालेला ध्वननव्यापार का बरे मान्य करीत नाही ? शिवाय दुसरी गोष्ट अशी की वस्तुध्वनीत दोष काढायला निघालात आणि त्याचा अनुग्राहक (साहाय्यक) असा रसध्वनी मात्र तुम्ही स्वीकारला (त्याचे समर्थन केले). हा चांगलाच ध्वनिविरोध–ध्वनिध्वंस तुम्ही केलात !) देवाला क्रोध आला तरी तो वरदाना-सारखा ठरतो असे म्हटलेच आहे. (तुमचा ध्वनिविरोध, ध्वनीविषयक क्रोध आम्हाला वरदानच ठरला.) जर तुम्ही रसाचेच प्राधान्य वर्णन केले असेल तर ते कोण बरे सहन करणार नाही ? हे केवळ वस्तुध्वनीचे उदाहरण उचित नाही असे तुमचे म्हणणे असले तरी ते काव्याचे उदाहरण असल्यामुळे तेथे दोन्ही ध्वनी (वस्तू व रस) असू शकतात. त्यामुळे काहीही बिघडत नाही.

जर रसानुवेधाशिवाय विरोधकांना (भट्टनायकाची उपपत्ती मानणाऱ्या) समाधानच होत नसेल तर आम्ही असे म्हणतो की याठिकाणी भयानक रसाचा अनुवेध सहृदयाच्या हृदयदर्पणावर अधिष्ठित होतच नाही. उलट उक्तनीतीने संभोगअभिलाषारूपी विभाव व त्या संकेतस्थानाला अनुरूप असे विशिष्ट काकु (आवाजातील चढउतार) आदी अनुभाव यांच्या संमिश्रणाने उदय पावलेल्या शृंगारसाचाच अनुवेध येथे अनुभवाला येतो. रस हा अलौकिक असल्यामुळे व केवळ तेवढ्याने त्याची प्रतीती येत नसल्याकारणाने प्रथम निर्विवादसिद्ध व परस्परांहून भिन्न अशा विधी व निषेध यांच्या प्रदर्शनाच्या अभिप्रायाने हे वस्तुध्वनीचे उदाहरण म्हणूनच आम्ही दिले.

ध्वनीवर व्याख्यान करावयास उद्युक्त झालेल्या एकाने तात्पर्यशक्ती म्हणजेच ध्वनन किंवा विवक्षासूचकत्व म्हणजेच ध्वनन होय असे जे म्हटले ते आमच्या मनाला मुळीच पटत नाही. पण 'लोक भिन्न भिन्न रुचीचे असतात' असे म्हटले आहे. तेव्हा पुढे याचा योग्य रीतीने विस्तार करून सांगू. येथे हे विवरण पुरे. भ्रम शब्दाचा वाच्यार्थ असा की तुला भ्रमणाची अनुज्ञा दिली आहे. तुझी भ्रमणाची वेळ झाली आहे. धार्मिक शब्दाचा अर्थ फुलांसारख्या पूजासाहित्यासाठी तुझे भ्रमण योग्यच आहे. विश्रब्ध शब्दाचा प्रयोग शंका घेण्यालायक कोणत्याही कारणाचा अभाव दाखविण्यासाठी केला आहे. 'सः' या शब्दाचा अर्थ जो तुझी अंगलतिका भयाने कम्पित करीत असे असा. 'अद्य' याचा

अर्थ आज तुझे भाग्य उंचावले आहे. 'मारितः' हा शब्द हे दाखवितो की पुन्हा काही तो (कुत्रा) दिसणार नाही. 'तेन' या पदाने, ज्याच्याविषयी पूर्वी कर्णोपकर्णी तूदेखील ऐकले आहेस तो गोदावरीच्या तीरावरील गहन अरण्यात सध्या राहतो आहे असा बोध करून दिला आहे. त्या संकेतस्थानाच्या रक्षणासाठी आधीच तिने त्याला ही सूचना दिली आहे. शिवाय सध्या तो सिंह चवताळलेला आहे तेव्हा त्या रानातून केव्हाही बाहेर पडू शकतो म्हणून या प्रसिद्ध अशा गोदावरीच्या तटप्रांती तुझे (साधे) भ्रमणदेखील केवळ सांगायच्या गोष्टी राहिल्या. मग तू आता त्या लताकुंजात प्रवेश करण्याची तर गोष्टच नको, असा येथे भाव आहे.

'अत्ता एत्थ' या श्लोकाची संस्कृत छाया :

श्वश्रूरत्र शेते (अथवा निमज्जति) अत्राहं दिवसकं प्रलोकय ।
मा पथिक राज्यन्ध शय्यायामावयोः शयिष्ठाः ॥

या श्लोकात (मूळ प्राकृतात आलेला) मह हा निपात बहुवचनाचा निदर्शक असल्यामुळे येथे 'आम्हा दोघींच्या' या अर्थी प्रयुक्त झाला आहे, 'माझ्या' या अर्थी नव्हे. तसेही पाहिल्यास विशेषरूपाने एकवचनाचा प्रयोग हा शंका निर्माण करणारा झाला असता व मग ती लपून स्वीकृती राहिली नसती. कोण्या एका प्रोषितभर्तृका तरुणीला पाहून ज्याची कामवासना वाढलेली आहे अशा एका पथिकाला या निषेधाद्वारा तिने संमती दिली आहे म्हणून येथे निषेधाभावरूप विधीरूपी अर्थ (ध्वनित झाला) आहे. येथे मुळात अप्रवृत्त असलेल्या त्या पथिकाला प्रवृत्त करणारा, निमंत्रण देणारा असा अर्थ आहे असे जे म्हटले जाते ते योग्य नव्हे कारण त्यात तिच्या सौभाग्याभिमानाचे खंडन होण्याची शक्यता उद्भवते. म्हणून 'राज्यन्ध' या संबोधनाद्वारा योग्य वेळी विकारपीडित होण्याची संभावना ध्वनित केलेली आहे. भाव म्हणजे एखाद्या गोष्टीचे अस्तित्व व तिचा अभाव या दोहोंमध्ये साक्षात् विरोध असल्यामुळे व्यंग्यार्थाचे अन्यत्व स्पष्टच आहे.

या बाबतीत भट्टनायकाने जे म्हटले आहे की 'अहम्' या शब्दाद्वारा विशेष अभिनयाची जोड देऊन स्वतःच्या दशेचे कथन केले असल्याकारणाने हे शाब्दिक कथनच समजावे. त्यावर आमचे म्हणणे असे की 'अहम्' ह्या शब्दाचा हा साक्षात् अर्थ नव्हे. काकु म्हणजे ध्वनिपरिवर्तन किंवा आवाजातील चढउतार यांच्या साहाय्याने तर उलट तेथे ध्वनन हाच व्यापार होईल आणि तो ध्वनीचे भूषण ठरेल. 'अत्ता' या शब्दाद्वारे उघड (अनिभृत) अशा संभोगाची शक्यता प्रयत्नपूर्वक नाकारली आहे. जरी तुम्ही मदनबाणांच्या वर्षावाने विदीर्ण हृदय झालेले असल्यामुळे तुमची उपेक्षा करणे योग्य नसले तरी मी काय करू ? आता

हा पापी दिवस विद्यमान आहे, म्हणजे भेटण्यास ही वेळ अयोग्य असल्याकारणाने हा दिवस वाईट आहे असे म्हटले. (प्राकृत भाषेत पुल्लिंगी व नपुंसकलिंगी शब्दांच्या बाबतीत नियम नसतो.) मी तुझी पूर्णपणे उपेक्षा करीत नाही. मी येथेच असल्यामुळे तू मला पाहून घे. मी दुसरीकडे कोठेही जात नाही. तेव्हा परस्परांचे चेहरे अवलोकन करून आपले मन रमवीत हा दिवस कसातरी घालवू या असा येथे अर्थ आहे. रात्र पडायला लागली की तू आंधळा होऊन माझ्या शय्येवर एकदम येऊ नकोस, तर लपतछपतच या सासू नामक निकट असलेल्या कण्टकाच्या निद्रेचा अंदाज घेत ये असा अर्थ ध्वनित होतो.

उच्च महव्विअ एक्केइ या प्राकृत श्लोकाची संस्कृत छाया—

व्रज ममैवैकस्या भवन्तु निःश्वासरोदितव्यानि ।
मा तवापि तया विना दक्षिण्यहतस्य जनिषत ॥

येथे 'जा' असा विधी आहे (वाच्यार्थ विधिरूप आहे.) "तू केवळ चुकून दुसऱ्या नायिकेच्या संगतीत गेलास असे नव्हे तर तिच्याविषयी वाटणाऱ्या गाढ अनुरागामुळे गेलास हे तुझ्या वेगळ्याच मुखरागावरून (म्हणजे चेहऱ्यावरील भावावरून) तसेच गोत्रस्खलनादिकावरून (नायिकेचे नाव चुकून तोंडातून निघाले त्यावरून) दिसतेच आहे. तू येथे उपस्थित आहेस तो केवळ पूर्वी दिलेल्या वचनांचे पालन करण्याचे तुझे सौजन्य दाखविण्यासाठी व आपण कसे एकरूप आहोत हे दाखविण्यासाठी! खरे तर तू पूर्णपणे फसवा आहेस" अशारीतीने एका खंडिता नायिकेचा तीव्र संताप येथे अभिप्रायरूपाने प्रतीत होतो. हा (क्रोधाभिप्राय) त्याला 'जाऊ नको' अशाप्रकारे तिच्याकडे जाण्यापासून परावृत्त करणारा 'निषेध' ही नव्हे, की अन्यनिषेधाच्या अभावरूप असा दुसरा कोणता 'विधी' ही नव्हे.

'दे आ पसिअ णिवत्तसु' या श्लोकातील 'दे' हा निपात प्रार्थना (विनवणी) या अर्थी आला आहे. 'आ' हा 'तावत्' या शब्दाचा अर्थी योजला आहे. त्यामुळे याचा असा अर्थ निघतो– (संस्कृत छाया)

प्रार्थये तावत्प्रसीद निवर्तस्व सुखशशिज्योत्स्नाविलुप्ततमोनिवहे ।
अभिसारिकाणां विघ्नं करोष्यन्यासामपि हताशे ॥

येथे आधी केलेल्या जाण्याच्या निश्चयापासून परावृत्त हो (जाऊ नकोस) अशी प्रतीती येत असल्याकारणाने निषेध वाच्य आहे. नायिका दारी आली आहे (नायकाच्या), परंतु गोत्रस्खलनादिकांवरून नायकाने आपला अपराध (आपल्याशी प्रतारणारूपी अपराध) केला आहे हे दिसताच तेथून परत जाण्यास निघाली आहे. अशावेळी नायकाकडून अनुनयपूर्वक तिला परावृत्त केले जात आहे.

"तू केवळ तुझ्या स्वतःच्या व माझ्याच नव्हे तर इतरांच्याही (इतर स्त्रियांच्याही) मार्गात विघ्न आणते आहेस. यामुळे तुला कदापि थोडेदेखील सुख लाभणार नाही आणि तू हताश होशील (तुला निराशा येईल)" अशा स्वरूपाचा तिच्या प्रियकराचा अभिप्रायरूपी विशेष प्रकारचा अनुनय याटिकाणी व्यंग्य आहे.

किंवा असेही म्हणता येईल की, सखीने सल्ला दिलेला असतानाही तो धुडकावून निघून जाणाऱ्या आपल्या सखीला (नायिकेला) ती सखी म्हणते, "तू स्वतःला केवळ विघ्नच करीत नाहीस तर आपले मन छोटे करून आणखी स्वतःलाच अपमानित करीत आहेस म्हणूनच तुला 'हताश' असे म्हटले. शिवाय आपल्या मुखचंद्राच्या प्रकाशाने तू या मार्गांनाही प्रकाशित करून इतर अभिसारिकांच्या मार्गात विघ्न आणते आहेस." अशारीतीने तिच्या सखीची अभिप्रायरूपी विशेष चाटूक्ती ही या ठिकाणी व्यंग्य आहे.

या दोन्ही व्याख्यानांमध्ये, "तू ठरविलेल्या विरुद्ध जाण्याच्या आणि प्रियतमाच्या घरी न जाण्याच्या निश्चयापासून मागे फीर" अशा वाच्यार्थात पुन्हा विश्रांती होत असल्यामुळे हे गुणीभूतव्यंग्याच्या प्रेयोऽलंकार किंवा रसवदलंकार नामक प्रकाराचे उदाहरण होते, ध्वनीचे होत नाही.

तेव्हा या ठिकाणी भाव असा आहे की–कोणी एक घाईने आपल्या प्रियकराकडे अभिसारासाठी निघाली असते. त्यावेळी तिच्याच घराकडे यावयास निघालेला तिचा हृदयवल्लभ तिला न ओळखल्याचा बहाणा करून अशाप्रकारे अनुनय करू लागतो. म्हणूनच स्वतःची ओळख देण्याच्या हेतूनेच 'हताशे' हे नर्मवचन आले आहे. "तू दुसऱ्यांच्या मार्गात विघ्न आणतेस आणि तुला तरी तुझे ईप्सित प्राप्त होईलच याची काय खात्री ? म्हणून आता माझ्या घरी चल किंवा आपण दोघे तुझ्या घरी जाऊ" असे दोन्ही प्रकारचे तात्पर्य निघू शकते. हा विधी किंवा निषेध यापैकी कोणताही एक नसलेला म्हणजेच अनुभयरूप असा त्या प्रियकराच्या चाटूक्तीने युक्त असलेला अभिप्रायच येथे व्यंग्य आहे अशी व्यवस्था लागते.

इतर काही असे म्हणतात की, "की तटस्थ अशा सहृदयांची त्या अभिसारिकेला उद्देशून उक्ती आहे." येथे 'हताशे' हे संबोधन वगैरे योग्य आहे की अयोग्य या बाबतीत सहृदयच प्रमाण आहेत (तेच जाणोत).

अशा रीतीने (वरील चारही उदाहरणांमध्ये) अनुक्रमे–संन्यासी (धार्मिक) प्रवासी (पान्थ), प्रियतमा (खंडिता) व अभिसारिका यांच्या बाबतीत वाच्य व व्यंग्य या दोहोंचेही ऐक्य असले तरी स्वरूपभेद असल्यामुळे भेद आहे असे आतापर्यंत प्रतिपादन केले. आता असे सांगतात की विषयभेदामुळे देखील व्यंग्य हे

वाच्याहून भिन्न ठरते. 'व्यवस्थापितः' या शब्दाचा अर्थ असा की हा विचित्ररूपे (विविधतेने युक्त असलेला) विषयभेददेखील स्वतःच व्यवस्थित होणारा असल्याने (ज्याची व्यवस्था लागू शकते असा असल्याकारणाने) सहृदयांना त्याची व्यवस्था लावणे शक्य होते.

कस्य वा न भवति रोषो दृष्ट्वा प्रियायाः सव्रणमधरम् ।
सभ्रमरपद्माघ्राणशीले वारितवामे सहस्वेदानीम् ।।

कस्य वा हा श्लोक. यात स्वतः न करतादेखील कोठूनतरी प्रियतमेचा अधर व्रणाने युक्त आहे हे पाहिल्यानंतर पूर्वी नसलेली गोष्ट आता आढळल्यामुळे मूळच्या ईर्ष्यायुक्त नसलेल्या व्यक्तीला देखील केवळ पाहूनच क्रोध येतो. सभ्रमरपद्माघ्राणशीले या संबोधनाचा अर्थ असा की एखाद्याचे शील, स्वभाव कधीच बदलता येत नाही. वारिते या शब्दाचा अर्थ परावृत्त केले असतानाही, वामे म्हणजे (त्याचा) अंगीकार न करणाऱ्या (न मानणाऱ्या), हे स्त्रिये! सहस्व इदानीम् म्हणजे आता सहन कर ही निंदेची परंपरा (ही टोचून बोलणी).

या ठिकाणी भाव असा आहे–कोणी एक अविनीत (धृष्ट) स्त्री कुठूनतरी खण्डिताधरा होऊन आली असता, तिचा पती जवळपासच्या परिसरात आहे हे निश्चित माहिती असलेली तिची एक **चतुर सखी** जणू काही त्याला (तिच्या पतीला) आपण पाहिलेच नाही असे भासवीत तिची होणारी निर्भर्त्सना टळावी या हेतूने पुढीलप्रमाणे बोलते– 'सहस्व इदानीम्' इत्यादी वाच्यार्थ त्या अविनीत स्त्रीला उद्देशून आहे. तर तिच्या पतीला उद्देशून 'हिचा काहीही अपराध नाही' हा (प्रामुख्याने) सांगितला जावयाचा अभिप्राय हेच व्यंग्य होय. 'सहस्व...' हे देखील खरे तर याच व्यंग्य अभिप्रायाला उद्देशून आहे. तिचा प्रियकर गंभीरपणे तिच्या अपराधाची दखल घेऊ लागल्यास (तिची हजेरी घेऊ लागल्यास),तिच्या दुराचरणाची शंका आलेल्या आजूबाजूच्या लोकांना उद्देशून, तिच्या दुराचरणावर पांघरूण घालून त्या लोकांच्या ठिकाणी विश्वास उत्पन्न करणे हा व्यंग्यार्थ होय. पतीने तिची निर्भर्त्सना केल्यामुळे व तिच्या अविनीत आचरणामुळे तिच्या सवतीला आनंद झाला असता, (तीच पतीला प्रिय आहे हे त्या सवतीला दिसावे म्हणून) प्रियायाः या शब्दाच्या बलाने तिच्या सौभाग्याचा उत्कर्ष दाखविणे हे त्या सपत्नींना उद्देशून असलेले व्यंग्य होय. प्रत्यक्ष आपल्या सखीला म्हणजे त्या दुराचरणी नायिकेला उद्देशून असा व्यंग्यार्थ आहे की "सर्व सपत्नींमध्ये मी केवळ एवढ्याने दुराचरणी (दुष्ट) ठरविल्या गेले असा विचार करून स्वतःला तू कमी लेखणे योग्य नव्हे, उलट हा तुझा बहुमान आहे. सहस्व म्हणजे तू यावेळी शोभित होते आहेस." अशारीतीने त्या नायिकेचे सौभाग्य तिलाच दर्शविणे (तिच्याच लक्षात आणून देणे) हा व्यंग्यार्थ आहे. तिचा जो उपपती, त्याला उद्देशून असा

व्यंग्यार्थ आहे की आज ही तुझी प्रच्छन्नप्रेयसी (लपून-चोरीने तुला भेटणारी प्रेयसी) तुझी हृदयवल्लभा अशा रीतीने वाचवली, पुन: असा प्रकटदर्शनविधी करू नकोस. आणि आजूबाजूच्या तटस्थ (या प्रकरणाशी संबंध नसलेल्या) तिऱ्हाईत परंतु चतुर अशा लोकांना उद्देशून त्या सखीच्या दृष्टीने 'पहा मी कसे हे प्रकरण लपविले' अशा आशयाचे स्वत:चे चातुर्य लक्षात आणून देणे हा व्यंग्यार्थ आहे. अशा रीतीने 'व्यवस्थापित' या शब्दाने हे सर्व सांगावयाचे आहे.

वृत्तीतील 'अग्रे' या शब्दाने द्वित्तीय उद्योतात (ध्वन्यालोकाच्या) 'असंलक्ष्यक्रमव्यङ्गय: क्रमेणोद्योतित: पर:' येथे विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीच्या द्वितीयप्रभेदाच्या वर्णनप्रसंगी एवढा अर्थ दाखवावयाचा आहे. जसा, विधी, निषेध आणि अनुनय या तीन प्रकारांच्या स्वरूपात संकलित केलेला वस्तु-ध्वनी संक्षेपाने उत्तम रीतीने सांगितला जाऊ शकतो तसा अलंकारध्वनी सांगितला जाऊ शकत नाही. कारण अलंकार संख्येने खूप आहेत. म्हणूनच सप्रपंच म्हणजे त्या ध्वनीच्या संपूर्ण प्रपंचासकट असे म्हटले. 'तृतीयस्तु' यातील 'तु' शब्द व्यतिरेक या अर्थी वापरला आहे. वस्तु व अलंकार देखील शब्दाभिधेयत्व धारण करू शकतात (यात काही मतभेद असू शकत नाही,) परंतु अग्रे म्हणजे द्वितीय उद्योतातील (ध्वन्यालोकाच्या) विवक्षितान्यपरवाच्याच्या, असंलक्ष्यक्रम-व्यंग्य व संलक्ष्यक्रमव्यंग्य यांच्या पैकी द्वितीयप्रभेदाच्या (म्हणजेच संलक्ष्यक्रम-व्यंग्यध्वनीच्या) वर्णनप्रसंगी. ज्याप्रमाणे, विधी, निषेध व अनुभव या (तीन) प्रकारांच्या रूपात वस्तुध्वनी एकत्रित संक्षेपाने सांगता येतो तसा अलंकारध्वनी सांगता येत नाही कारण अलंकार असंख्य आहेत. म्हणूनच 'सप्रपंच' असे म्हटले. 'तृतीयवस्तु' यातील 'तु' हा शब्द व्यतिरेकार्थी येतो. वस्तु (ध्वनी) व अलंकारध्वनीदेखील शब्दांच्याद्वारा अभिहित केल्या जाऊ शकतात.

परंतु रस, भाव, तदाभास व तत्प्रशम हे मात्र कधीही शब्दांनी सांगितले जाऊ शकत नाहीत (वाच्य होऊ शकत नाहीत.) कारण आस्वाद्यमानता हा त्यांचा प्राण असतो. त्यामुळेच ते शोभत असतात. त्यामुळे त्या ठिकाणी ध्वननाशिवाय दुसरी कल्पना केली जाऊ शकत नाही. तसेच स्खलद्गतित्व नसल्याकारणाने लक्षणेला आवश्यक अशा मुख्यार्थबाध इत्यादी कारणांची शंका देखील घेतली जाऊ शकत नाही. स्थायी अशा चित्तवृत्तीचा आस्वाद औचित्याने प्रवर्तित झाला असता 'रस' होतो. व्यभिचारिणी (संचारिणी) चित्तवृत्तीला आस्वाद्यत्व प्राप्त झाल्यास 'भाव' होतो. हे दोन्ही जेव्हा अनौचित्याने प्रवर्तित होतात तेव्हा त्यांचे (रस व भाव या दोहोंचे) आभास होत असतात, उदाहरणार्थ रावणाची सीतेच्या बाबतीत असलेली रती. शृंगारापासूनच हास्य निर्माण होते या वचनानुसार येथे देखील (रावणाच्या उद्गारांमध्ये) हास्यरसरूपताच (हास्यास्पदता)

असली तरी ही स्थिती **सामाजिकांच्या** अनुभवाला **नंतर** येते, तन्मयीभवन-दशेत मात्र 'रती'च आस्वाद्य असल्याकारणाने 'दूराकर्षणमोहमंत्र इव मे तन्नाम्नि याते श्रुतिम्' या ठिकाणी आधीची (वरील श्लोक ऐकताक्षणीच चित्ताच्या 'रती' नामक स्थायीभावाच्या आस्वादनसमयी होणारी) अवस्था व नंतरची (ही रती रावणाची आहे हे लक्षात आल्यानंतर होणारी) अवस्था या दोहोतील विवेक लक्षात **येईपर्यंत** तरी **शृंगारताच** लक्षात येते. म्हणून (हा हास्यरस नसून) हा शृंगाराचा आभासच होय. त्याचेच अंग म्हणजे भावाभास. रसास्वादाने आक्रांत झालेल्या–(जिच्या रसास्वादाला रसावेशाला प्रारंभ झालेला आहे अशा) चित्तवृत्तीचा प्रशनच विशेषरूपाने हृदय आह्लादित करतो हे जाणून भावध्वनीत तो अंतर्भूत होऊ शकत असला तरी त्याची गणना निराळी केली आहे (भावप्रशम हा स्वतंत्र प्रकार मानला आहे).

(भावप्रशमासाठी घेतलेले हे उदाहरण आनंदवर्धनांच्या विवेचनात येत नाही. अभिनवगुप्तांनीच लोचनात ते घेतले आहे.)

'एकस्मिन् शयने' या श्लोकात ईर्ष्यारोषयुक्त 'मानाचा' (मान नामक व्यभिचारी भावाचा) प्रशम आस्वादाला कारणीभूत झालेला आहे.

हा रसादिरूप अर्थ 'तुला पुत्र झाला' या वाक्यामुळे ज्याप्रकारचा हर्ष होतो त्याप्रकारचा नव्हे. तसेच तो (रसादिरूप अर्थ) लक्षणेने देखील उत्पन्न होणारा नसतो.

उलट सहृदयाच्या ठिकाणी असलेल्या हृदयसंवादाच्या सामर्थ्याने (काव्यातील विभावानुभावांची प्रतीती आली असता, त्यांच्याशी उत्पन्न झालेल्या तन्मयतेमुळे आस्वाद्यमान होत असतानाच (आस्वादिला जात असतानाच) जो स्फुरित होतो व रस्यमानता म्हणजेच आस्वाद हाच ज्याचा प्राण असतो असा सिद्ध स्वभावाचा (म्हणजेच नित्य स्वभावाचा) व लौकिक सुखादिकांहून भिन्न असलेला असा रसादिरूप अर्थ होय. म्हणूनच तो प्रकाशित होतो असे म्हटले. म्हणूनच येथे **शब्दाचा वाच्यार्थसहकृत** असा **ध्वननानामक व्यापारच** कारणीभूत होत असतो. विभावादिरूप अर्थदेखील पुत्रजन्महर्षन्यायाने त्या चित्तवृत्तीला उत्पन्न करीत नाही त्यामुळे जननाहून निराळा असा **अर्थाचा देखील व्यापार 'ध्वनन'च** म्हणविला जातो.

स्वशब्दनिवेदितत्वेन म्हणजे शृंगार इत्यादी शब्दांच्या द्वारा अभिधा-व्यापारामुळे निवेदित केला जात असल्यामुळे 'विभावादिप्रतिपादनमुखेन' याचा अर्थ तात्पर्यशक्तीच्या द्वारा असा समजावा. येथे रस्यमानता हे ज्याचे सार अशा रसाच्या बाबतीत स्वशब्दाचा (म्हणजेच शृंगारादी रसवाचक शब्दाचा) अन्वय–व्यतिरेक संबंध खोडून काढीत, रसप्रतीतीच्या बाबतीत ध्वननाच्याच

ठिकाणी अन्वय व व्यतिरेक हे दोन्ही संभवतात. (दोन्ही प्रकारची व्याप्ती ध्वनन व रस यांच्यात सिद्ध करता येते. तशी ती रसवाचक शब्द व रस यांच्यात कधीच नसते.) जसे भट्टेन्दुराजाचे पुढील पद्य पहा–

कृष्णाच्या युवावस्थेला प्रारंभ झाला आणि (गोकुळातील) तरुण स्त्रियांची वेपस्थिती–अवस्था अशी झाली–त्या मधे थांबून थांबून वारंवार कृष्णाकडे दृष्टिक्षेप टाकत होत्या त्यामुळे त्यांचे नेत्र अस्थिर होऊन गेले होते (चंचल बनले होते.) कमलिनीचे देठ तुटून गेल्यावर ती जशी म्लान व्हावी तद्वत त्यांची गात्रे दिवसेंदिवस सुकत चालली होती. त्यांच्या कपोलांवर तर असा काही घनपांडुर वर्ण पसरला होता की दूर्वाकांडांनी देखील लाजेने मान खाली घालावी.

या ठिकाणी अनुभाव व विभाव यांचा बोध झाल्यानंतरच तन्मय होण्याच्या गुणधर्मामुळे, त्या विभावानुभावांना अनुरूप अशा चित्तवृत्तीच्या वासनेने रंगलेली जी स्वतःची अशी संविद–संवेदना तिच्या आनंदाची जी चर्वणा, त्या चवर्णेला गोचर होणारा–त्या चर्वणेच्या क्षेत्रात येणारा अर्थ म्हणजे रस. तो या ठिकाणी अभिलाषा, चिंता, औत्सुक्य, निद्रा, धृती, ग्लानी, आलस्य, श्रम, स्मृती, वितर्क इ. शब्द नसताना देखील स्फुरित होतोच. अशा रीतीने व्यतिरेकाचा (स्वशब्द व रस यांच्यामधील व्यतिरेकी व्याप्तीचा) अभाव दाखवून नंतर अन्वयाचा देखील अभाव दाखवितात–

यत्रापि...या वाक्यातील 'तत्' या पदाचा अर्थ स्वशब्दनिवेदितत्व हा घ्यावा. प्रतिपादनमुखेन म्हणजे शब्दांच्या प्रत्यक्ष प्रयोगाद्वारा. विभावादिकांचे प्रतिपादन करून असा अर्थ घ्यावा– (शब्दांच्या द्वारा प्रत्यक्ष वर्णन करून). 'सा केवलम्' या वाक्याचा अर्थ पुढील श्लोकातून अधिक स्पष्ट होऊ शकतो–

'मधुरिपू श्रीकृष्ण द्वारकेला गेला असता, कालिंदीच्या तीरावर वाढलेल्या व श्रीकृष्णाने दिलेल्या झोक्यांमुळे झुकलेल्या वंजुललतेला आलिंगन देऊन अत्यधिक अश्रूंमुळे गद्गदलेल्या कंठाने तारस्वरात सोत्कंठित राधेने असे काही गीत म्हटले की ज्यामुळे जलात विचरण करणाऱ्या जलचर प्राण्यांनी देखील उत्कंठेमुळे कूजनाला प्रारंभ केला.'

या ठिकाणी विभाव अनुभाव स्पष्टपणे प्रतीत होतात, आणि उत्कंठा ही चर्वणेचा विषय बनून अनुभवाला येतेच.

सोत्कंठा हा शब्द केवळ सिद्ध गोष्टींचीच सिद्धी करतो, 'उत्कम्' या शब्दामुळे मात्र उक्त अनुभावांचे (प्रत्यक्ष शब्दांमध्ये वर्णन केलेल्या राधेच्या अनुभावांचे म्हणजेच तिच्या विरहदर्शक हालचालींचे अनुकर्षण म्हणून सोत्कंठा शब्द आधी वापरला. म्हणूनच हा अनुवाद देखील निरर्थक नाही. पुनरुक्ती किंवा अतन्मयीभाव

पुनरनुभवकथनाला उद्देशून म्हणतात (तसे येथे उत्कंठा या शब्दाच्या बाबतीत घडत नाही.) रसप्रतीती ही कधीच त्या रसवाचक शब्दामुळे (स्वशब्दामुळे) उत्पन्न झालेली नसते. या म्हणण्याचा हेतू 'विषयान्तरे...या वाक्याद्वारा सांगितला आहे. ज्याच्या अभावी जी उत्पन्न होते ती त्याच्यापासून झाली असे म्हणता येत नाही. हा भाव 'यद् विश्रम्य' या श्लोकातून प्रतीत होतो. आता हे अदर्शन म्हणजे रसप्रतीतीचा अभाव 'न हि केवल शृंगारादि...शब्दमात्र'...या वाक्याद्वारा अधिक दृढ करून सांगितला आहे व केवलशृंगारादिशब्दमात्रभाजि याचाच अर्थ 'विभावादिप्रतिपादनरहिते' याद्वारा अधिक स्पष्ट केला आहे. 'काव्ये' याचा अर्थ 'तुमच्या मताने काव्यरूपात प्रसक्त होणाऱ्या' असा होतो. मनागपि म्हणजे थोडीसुद्धा ! शृंगार, हास्य, करुण, वीर, रौद्र, भयानक, बीभत्स व अद्भुत या संज्ञा धारण करणारे आठ रस नाटचात मानलेले आहेत.

अशा रीतीने स्वशब्दासमवेत (रसवाचक शब्दावरोबर रसादिकांचा) व्यतिरेकाभाव व अन्वयाभावही उपपत्तीने म्हणजेच (युक्तिवादांनी–युक्तिपूर्वक) दाखवून आता त्याच विषयाचा उपसंहार करतात (आनंदवर्धन) 'यतश्च... पासून तर कथञ्चित्' पर्यंत.

(अभिधेयसामर्थ्याक्षिप्त यातील 'अभिधेयसामर्थ्य' या पदाचा अर्थ अभिनवगुप्त पुढील वाक्यात करतात.)

अभिधेय हेच सामर्थ्य असा हा समास सोडवून ते पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देतात :

काव्यातील शब्दापासून रसध्वनन होण्याच्या बाबतीत अभिधेय हेच सामर्थ्य असते म्हणजेच विभावादींच्या स्वरूपातील अभिधेयार्थ **हाच** शब्दांना सहकारीशक्तीच्या स्वरूपात (ध्वननाचे) सामर्थ्य देत असतो.

दुसरा विग्रह **अभिधेयाचे सामर्थ्य** असा केला आहे. अभिधेयाचे अर्थात काव्याच्या वाच्यार्थाचे सामर्थ्य म्हणजेच विशिष्ट शक्तीने युक्त असलेला समुचित असा वाचकांचा–शब्दांचा समुदाय होय.

अशा रीतीने शब्द व अर्थ या दोहोंचाही ध्वनन हा व्यापार असतो (ध्वननव्यापारात शब्दांचे सामर्थ्य अभिधेयात तर अभिधेयाचे सामर्थ्य शब्दात असे अभिनवांचे विश्लेषण आहे.) ध्वनन पुत्रजन्मापासून होणाऱ्या हर्षापेक्षा (हर्षनिर्मितीपेक्षा) भिन्न प्रकारची क्षमता धारण करीत असल्याने 'जनन' या प्रक्रियेपेक्षा भिन्न असते, तसेच दिवसा भोजनाचा अभाव असूनदेखील पीनत्वावरून रात्रीभोजनाचे जे अनुमान केले जाते त्या अनुमानाहूनही भिन्न असते.

अशा रीतीने दोन्ही पक्ष उपस्थित करून आद्यपक्ष (स्वशब्दनिवेदित्वाने रसाला वाच्यत्व येण्याचा) खोडून काढला आहे तर दुसरा काही प्रमाणात

खोडला आहे व काही प्रमाणात स्वीकारला आहे. (विभावादिप्रतिपादनमुखाने रसाला वाच्यत्व येण्याचा). जनन आणि अनुमान या दोन शब्दव्यापारांच्या अभिप्रायाने हा दुसरा पक्ष खोडला आहे तर ध्वननाच्या अभिप्रायाने स्वीकारला आहे. (विभावादिकांपासूनच रसाची प्रतीती येते हे मान्य असल्याकारणाने दुसरा पक्ष तत्त्वतः ग्रंथकाराला म्हणजेच आनंदवर्धनांना मान्य आहे असे अभिनवगुप्त म्हणतात. त्यामुळे विभावादी सामग्रीच्या वर्णनातूनच रसप्रतीती येते या वस्तुस्थितीला मान्यता देऊन उरलेला भाग म्हणजे विभावादींच्या प्रत्यक्ष वर्णनाने रसाला वाच्यत्व येते ही गोष्ट आनंदवर्धन अमान्य करतात. हे लोचनकारांनी स्पष्ट केले आहे. विभावादींपासून रस साक्षात् उत्पन्न होत नाही तसेच अनुमितही करावा लागत नाही. तर तो त्या विभावादींच्या प्रत्यक्ष प्रतिपादनातून ध्वनित होत असतो हा सिद्धांत येथे ग्रंथकारांना मांडावयाचा आहे.)

जो कोणी तात्पर्यशक्ती म्हणजेच ध्वनन होय असे मानतो तो मूलभूत तत्त्व समजून घेत नाही असेच म्हणावे लागते. विभावानुभावप्रतिपादक वाक्यात तात्पर्यशक्ती म्हणजेच अभिधेयसामर्थ्य असते व त्यामुळेच रस प्रतीत होतो असे म्हणणे असेल तर एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की तात्पर्यशक्ती ही एक तर 'भेदात' पर्यवसित होते किंवा 'संसर्गात' पर्यवसित होते. पण कधीही रस्य–मानता किंवा आस्वाद्यमानता हेच सार असलेल्या रसात पर्यवसित होऊ शकत नाही. एवढेच स्पष्टीकरण पुरेसे आहे.

या उताऱ्यातील 'इति' हा शब्द हेतुदर्शक आहे. अशा हेतूने तिसरा देखील प्रकार (प्रतीयमानाचा) वाच्याहून भिन्नच आहे असा संबंध आहे. 'सहेव' यातील इव शब्दाने असे दाखविले आहे की क्रम विद्यमान असला तरी लक्षात येत नाही, आणि ही गोष्ट पुढे दाखविणारच आहेत. पुढे म्हणजे द्वितीय उद्योतात.

कारिका ५

काव्यस्यात्मा स एवार्थस्तथा चादिकवेः पुरा ।
क्रौञ्चद्वन्द्ववियोगोत्थः शोकः श्लोकत्वमागतः ।।

अशा रीतीने 'प्रतीयमानं पुनरन्यदेव' या कारिकेद्वारा ध्वनीचे स्वरूप स्पष्ट केले. आता इतिहास सांगण्याच्या निमित्ताने म्हणजेच वाल्मीकीच्या संदर्भात रामायणाच्या निर्मितीपूर्वी जो क्रौंचवधाचा इतिहास घडला त्याविषयी कथन करून काव्याच्या आत्म्यासंबंधी ग्रंथकार दिग्दर्शन करीत आहेत. 'स एव' हे शब्द संपूर्ण प्रतीयमान अर्थाला लागू पडत असले तरी तिसरा रसध्वनी हाच प्रकार येथे काव्यात्मा म्हणून जाणावा–तो एकतर इतिहासबलाने (वाल्मी-

कीच्या उदाहरणावरून) आणि आतापर्यंतच्या वृत्तिग्रंथाच्या अर्थबलाने (म्हणजेच आतापर्यंत केल्या गेलेल्या ध्वनिविवेचनात रसरूप अर्थाला मिळालेल्या प्राधान्याला धरून). तेव्हा **रस हाच खरे पाहिले असता आत्मा असून वस्तू आणि अलंकार** हे दोन्ही **ध्वनिप्रकार पूर्णपणे रसातच पर्यवसित होतात** म्हणून ते देखील वाच्यार्थाहून उत्कृष्टच आहेत या अभिप्रायाने 'काव्याचा आत्मा ध्वनी' असे सर्वसामान्य विधान केले.

शोक या शब्दाचे रहस्य–क्रौंच पक्ष्यांची जोडी फुटल्यामुळे अर्थात क्रौंचाची **सहचरी** मारल्या गेल्यामुळे उत्पन्न झालेल्या त्या दोघांमधील साहचर्याच्या ध्वंसामुळे उत्पन्न जो **शोकरूपी स्थायिभाव** तो पुनर्मीलनाची अपेक्षा नसल्याकारणाने विप्रलंभ शृंगाराशी संबंधित 'रती' या स्थायिभावाहून निराळाच आहे. तोच (शोक) अनुरूप **विभावांमुळे** व त्यातून उत्पन्न झालेल्या आक्रंदनादी **अनुभावांच्या चर्वणेमुळे** हृदयसंवाद आणि त्यानंतर तन्मयीभवन या क्रमाने आस्वाद्यमानतेला प्राप्त होऊन लौकिक शोकाहून भिन्न अशी करुणरसरूपता धारण करतो जिचे सार स्वतःच्याच चित्तवृत्तीच्या द्रुत अवस्थेचा आस्वाद घेणे हे आहे. ज्याप्रमाणे जलाने परिपूर्ण भरलेला घट हिंदकळतो त्याप्रमाणे किंवा चित्तवृत्तीचे निष्यंदरूपी वाग्विलाप इत्यादी होतात त्याप्रमाणे कोणत्याही संकेताची अपेक्षा न करता सुद्धा चित्तवृत्तीचे व्यंजक असल्याकारणाने अकृत्रिम किंवा सहजस्वाभाविकतेने व **आवेशाच्या** सामर्थ्याने उचित शब्द, छंद, वृत्त इत्यादींनी नियंत्रित होऊन तो शोक (स्थायिभाव) श्लोकरूपतेला प्राप्त झाला.

" मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥"

या ठिकाणी मुनीचा (व्यक्तिगत) शोक आहे असे समजू नये. कारण असे असल्यास त्या क्रौंचपक्ष्याच्या दुःखाने तोदेखील दुःखित झाला असे होऊन रसाच्या काव्यात्मतेला अवकाशच उरणार नाही. (वाल्मीकी क्रौंचवधाने दुःखी झाला एवढ्यावरच त्या प्रसंगाचा परिणाम मर्यादित होऊन जाईल व त्याची चर्चाही समाप्त होईल. जी पुढे जाऊन संपूर्ण रामायण काव्याची प्रधान प्रेरणा बनली त्या करुण रसाची सिद्धी वरील प्रसंगातून कशी झाली या चर्चेला अवसरच उरणार नाही.) शिवाय दुःखसंतप्त व्यक्तीची दशा अशी (वाल्मीकीसारखी) होत नसते. (म्हणजेच सहजस्फूर्त का होईना परंतु असा श्लोक दुःखाने संतप्त झालेल्या व्यक्तीच्या तोंडून बाहेर पडू शकत नाही.)

तेव्हा निष्कर्ष हा की चर्वणेला म्हणजेच आस्वादनाला योग्य अशा शोकरूपी स्थायिभावाने युक्त असलेल्या करुण रसातून समुच्चलित होण्याचा स्वभाव ह्या शब्दांमध्ये म्हणजेच वाल्मीकीच्या तोंडून बाहेर पडलेल्या श्लोकबद्ध शापवाणीमध्ये

असल्याकारणाने तो करुण रसच त्या काव्याचा आत्मा किंवा सारभूत असे तत्त्व होय. असा हा रस अन्य शाब्दबोधांहून विलक्षण असतो.

हृदयदर्पणात हीच गोष्ट सांगितली आहे की 'जोपर्यंत याने (रसाने) तो परिपूर्ण होत नाही तोपर्यंत त्याचे वमन करीत नाही.'

अगमः यात छान्दस अट् आगम झाला आहे. 'स एव' यातील 'एव' या शब्दाने 'दुसरा कोणताच आत्मा नसतो' हे सांगावयाचे आहे. म्हणूनच **भट्ट-नायक** जे म्हणतात की 'शब्दप्राधान्याच्या आधाराने शास्त्राला (इतरांपासून) वेगळे काढले जाते. अर्थतत्त्वाने युक्त असलेले ते 'आख्यान'–असे म्हटले जाते, आणि शब्द व अर्थ या दोहोंना गौणत्व असून व्यापाराला जेथे प्राधान्य असते तेथेच 'काव्य' ही धारणा होत असते" हे त्यांचे म्हणणे खंडित होते.

हा व्यापार (भट्टनायकांना अभिप्रेत असलेला) जर आस्वादन हाच ज्याचा स्वभाव असा 'ध्वनन' नामक व्यापार असेल तर त्या म्हणण्यात काहीच अपूर्व नाही (म्हणजेच ही गोष्ट पूर्वीच ध्वनिकारांनी सांगितलेली आहे.) आणि जर भट्टनायकांना अभिधा हाच व्यापार येथे अभिप्रेत असेल तर तिचे प्राधान्य असू शकत नाही हेही यापूर्वीच सांगितले आहे.

आता श्लोकाचे स्पष्टीकरण देतात–विविधवाच्य...इत्यादी वाक्याने.

विविध म्हणजे त्या त्या अभिव्यंजनीय म्हणजेच अभिव्यक्तीला लायक अशा रसांना अनुकूल **वैचित्र्य** आणून, वाच्य, वाचक आणि रचना यांच्या प्रपंचाने (योजना) जे सुंदर बनते अर्थात शब्दालंकार, अर्थालंकार व गुण यांनी युक्त होते (...अशा काव्याचा...) असा अर्थ येथे घ्यावा. त्यामुळे ध्वनन असलेल्या सर्वच ठिकाणी 'काव्य' हा व्यवहार होणार नाही. आत्मा सर्वत्र असला तरी 'जीव' व्यवहार काहीच ठिकाणी होत असतो हे यापूर्वीच सांगितले आहे. (त्याचप्रमाणे काव्याच्याही बाबतीत समजावे. केवळ ध्वनिरूप अर्थाचे अस्तित्व आहे म्हणून कोणत्याही वाक्याला काव्य म्हणता येणार नाही.) त्यामुळे हृदय-दर्पणात जसे म्हटले आहे की ध्वनी हा आत्मा मानल्यास सर्वच ठिकाणी काव्य-व्यवहार होऊ लागेल. ते म्हणणे अनाठायी होय.

'निहतसहचरी' या शब्दाने विभाव सांगितला आहे. तर 'आक्रन्दित' या शब्दाने अनुभाव वर्णिला आहे. जनितः म्हणजे उत्पन्न झालेला याला 'चर्वणा-गोचर अशा स्वरूपात' असे शब्द जोडायला हवेत.

या ठिकाणी अशी शंका उपस्थित होऊ शकते की शोकचर्वणेतून जर श्लोक उत्पन्न झाला असेल तर प्रतीयमान वस्तू (अर्थ) काव्याचा आत्मा कसा बरे होईल ? शोकाचे चर्वणागोचररूप असलेल्या करुणाचा तो शोक हा स्थायिभाव

आहे. शोक स्थायिभाव असताना जे विभाव, अनुभाव इत्यादी असतात त्यांना समुचित अशी चित्तवृत्ती जेव्हा चर्व्यमाण (आस्वाद्यमान) स्वरूप प्राप्त करते तेव्हा रस म्हणविली जाते. या औचित्यामुळेच स्थायिभावाला रसत्वाची प्राप्ती होते (किंवा रसत्व प्राप्त होते) असे म्हटले जाते. कारण प्रथम स्वत:च्या ठिकाणी जी संवेदनागोचर झालेली असते व नंतर दुसऱ्याच्याही ठिकाणी तिचे अनुमान बाह्य लक्षणांवरून करता येते अशा चित्तवृत्तींचा समूह संस्कारांच्या परंपरेने (त्या प्रसंगाशी) हृदयसंवाद धारण करतो व चर्वणेला म्हणजेच आस्वादनाला उपयुक्त होतो.

या ठिकाणी आणखीही एक शंका घेतली जाऊ शकते ती अशी–(काव्यातील) प्रतीयमानरूपी आत्म्याच्या ठिकाणी तीन भेद संभवतात. तो केवळ रस–रूपच नाही. येथील इतिहासाने तर फक्त रसाचेच आत्मत्व सांगितल्यासारखे होते, ही शंका लक्षात घेऊनच उत्तर दिले आहे ते 'प्रतीयमानस्यच अन्यभेददर्शनेऽपि'...इत्यादी वाक्याने. अन्य भेद म्हणजे वस्तू व अलंकार हे होत.

'रसभावमुखेनैव' यातील भाव शब्दाचे ग्रहण यासाठी आहे की–चर्व्यमाणदशेला आलेला व्यभिचारीभाव देखील काव्याचा प्राण होऊ शकतो (केवळ स्थायिभावच नव्हे.) – जरी केवळ तेवढ्यात चर्वणेची समाप्ती होत नसली आणि स्थायीच्या चर्वणेचे पर्यवसान ज्यात होणे उचित असते अशा रसाची प्रतिष्ठा त्याला (म्हणजे चर्व्यमाण व्यभिचारीभावाला) प्राप्त होत नसली तरी.

नखं नखाग्रेण विघट्टयन्ती विवर्तयन्ती वलयं विलोलम् ।
आमन्द्रमाशिञ्जितनूपुरेण पादेन मन्दं भुवमालिखन्ती ॥

'नखाग्राने नखांना घाशीत, चंचल कंकणे फिरवीत, ज्यातील नूपुर मन्द्रध्वनीने किणकिणत आहेत अशा पायाने हळूवारपणे जमीन उकरणारी'

या वर्णनात 'लज्जा' हा व्यभिचारीभाव आस्वादगोचर झाला आहे. रस व भाव या शब्दांनी त्यांचे आभास व प्रशम हे दोन्ही अंतर्भूत होतात. कारण त्यांचे वैचित्र्य वेगवेगळे असले तरी त्यांच्यात एकरूपताच आहे. 'प्राधान्यामुळे' याचा अर्थ 'रसात पर्यवसित होत असल्यामुळे' असा आहे. वस्तू आणि अलंकार हे दोन्ही ध्वनिप्रकार केवळ स्वत:तच विश्रांत होत नसले तरी अन्य शाब्दबोधापेक्षा काव्यात वेगळेपणा उत्पन्न करण्याच्या त्यांच्या वैशिष्ट्यामुळे त्यांनाही काव्याचे जीवित म्हटले हे उचितच होय असा येथे भाव आहे.

कारिका ६

सरस्वती स्वादु तदर्थवस्तु निःष्यन्दमाना महतां कवीनाम् ।
अलोकसामान्यमभिव्यनक्ति परिस्फुरन्तं प्रतिभाविशेषम् ॥

अशा रीतीने वाल्मीकीचा इतिहास सांगून प्रतीयमान अर्थाची **काव्यात्मता दाखवून** शिवाय तो संवेदनासिद्ध आहे हे सरस्वती...इ. द्वारा दाखवीत आहेत. अर्थात सरस्वती म्हणजे वाग्रूप भगवती असा अर्थ आहे. वृत्तीतील 'वस्तु' या शब्दाने कारिकेतील 'अर्थ' या शब्दाचे, तर वृत्तीतील 'तत्त्व' या शब्दाने कारिकेतील 'वस्तु' या शब्दाचे स्पष्टीकरण केले आहे. निष्यन्दमाना म्हणजे दिव्य अशा आनन्दरसाला प्रसवित करणारी असा अर्थ होतो. जसे **भट्टनायकाने** म्हटलेच आहे – वाणीरूपी धेनू रसिकरूपी बालकांच्या (पाडसांच्या) तृष्णेमुळे (त्यांना तहान लागली हे जाणून) स्वतःच हा रस प्रवाहित करते. त्यामुळे योगीजनांकडून ज्याचे दोहन केले जाते त्या आनंदरसाची याच्याशी (काव्य-रसाशी) तुलना होऊ शकत नाही.

रसावेश नसताना केवळ जबरदस्तीने (प्रयासपूर्वक) योग्यांकडून जो दोहल्या जातो–म्हणूनच 'दोहण्यात कुशल असा मेरु पर्वत दोग्धा असताना, ज्याला वत्स कल्पून सर्व पर्वतांनी, पृथूने दाखविलेल्या धरित्रीपासून प्रकाशमान अशी रत्ने व महान औषधी यांचे दोहन केले.' या श्लोकाद्वारा हिमालयाच्या ठिकाणी सारभूत अशा अन्यवस्तू म्हणजेच महत्त्वपूर्ण अशी रत्ने व औषधी यांचे भाजनत्व सांगितले आहे. परिस्फुरित होणाऱ्या प्रतिभेला अभिव्यक्त करते. याचाच अर्थ काव्यवाचक–रसिकांसाठी ती प्रतिभा अनुमानगम्य नसते, तर रसावेशाने प्रकाशित होणारी असते असा अर्थ आहे.

आमचे उपाध्याय **भट्टतौत** यांनी म्हटलेच आहे की त्यामुळेच नायकाचा (पात्राचा), कवीचा आणि श्रोत्याचा समान अनुभव असतो.

अपूर्व वस्तूची निर्मिती करण्याची क्षमता असलेली प्रज्ञा म्हणजे प्रतिभा. तिची वैशिष्टये म्हणजे रसावेशाच्या (रसौघाच्या) निर्मलतेचे सौंदर्य आणि काव्य निर्माण करण्याचे सामर्थ्य. **भरतमुनींनी** जिच्याविषयी 'कवींच्या अंतर्गत भावाला जो भावित करतो तोच भाव' असे म्हटले आहे येनास्मिन्नतिविचित्र... यातील 'येन'चा अर्थ ज्या अभिव्यक्त होणाऱ्या आणि स्फुरित होणाऱ्या प्रतिभा-विशेषरूपी निमित्तामुळे महाकवींमध्ये गणना होत असते.

कारिका ७

शब्दार्थशासनज्ञानमात्रेणैव न वेद्यते ।
वेद्यते स तु काव्यार्थतत्त्वज्ञैरेव केवलम् ॥

इदं च अपरं...

'प्रतीयमानं पुनरन्यदेव' या कारिकेत सूचित केलेले स्वरूपभेद व विषय-भेद हेच केवळ नव्हेत, तर भिन्न सामुग्रीद्वारा जाणले जाणे ही गोष्ट देखील,

प्रतीयमानार्थ हा वाच्यातिरिक्त आहे म्हणजेच वाच्यार्थाहून भिन्न व स्वतंत्र आहे, याचे प्रमाण होय. (प्रतीयमान हा वाच्यार्थाहून निराळा असला तरी) सांगितला जात नाही असे नाही. ज्यामुळे त्याचे अस्तित्वच सिद्ध होणार नाही.

काव्याचा तत्त्वभूत असलेला जो अर्थ त्याची भावना म्हणजे वाच्यार्थाहून भिन्न रूपातील निरंतर चर्वणा. त्या चर्वणेपासून विमुख असलेल्यांच्या दृष्टीने.

षड्ज इत्यादी सात स्वर आहेत.

दोन नादांमधील वैलक्षण्य (भिन्नता) उत्पन्न करण्याइतपत जे त्या नाद-रूपात झालेले परिवर्तन, त्या परिवर्तनासाठी आवश्यक असलेले त्या दोन नादां-मधील परिमाण म्हणजे श्रुती. स्वर आणि दोन स्वरांमधील अंतराल या दोन भेदांमुळे ती बावीस प्रकारची मानली आहे. 'स्वर श्रुत्यादि' यातील 'आदि' या शब्दाने जाती आणि जातींच्या अंशांपासून उत्पन्न झालेले ग्रामराग, भाषा, विभाषा, अंतरभाषा इत्यादी देशी संगीताचे मार्ग ग्रहण केले जातात. प्रगीत शब्दाचा अर्थ आहे प्रकृष्ट आहे गान ज्यांचे असे, किंवा ज्यांनी गायनाला प्रारंभ केला आहे असे. या ठिकाणी 'आदि कर्मणि क्तः' या सूत्राने 'क्त' हा प्रत्यय झाला आहे. प्रारंभावरून येथे फलपर्यंतता लक्षित होते.

कारिका ८

सोऽर्थस्तद्व्यक्तिसामर्थ्ययोगी शब्दश्च कश्चन ।
यत्नतः प्रत्यभिज्ञेयौ तौ शब्दार्थौ महाकवेः ।।

'एवम्' याचा अर्थ स्वरूपभेदामुळे व भिन्न सामग्रीद्वारा ज्ञात होत असल्याकारणाने असा घ्यावा. प्रत्यभिज्ञेयौ याटिकाणी 'अर्ह' म्हणजे योग्य या अर्थी कृत्य प्रत्यय झाला आहे. सर्व लोक तसाच प्रयत्न करतात. अशा प्रकारे एवढ्याच कथनाने व्यंग्यार्थाच्या प्राधान्याच्या बाबतीत 'लोकसिद्धत्व' हे प्रमाण येथे सांगितले आहे. आणि नियोगार्थक कृत्य प्रत्ययाद्वारा कवीसाठी शिक्षा म्हणजे उपदेशही सांगितला आहे असे होते. 'प्रत्यभिज्ञेय' या शब्दाद्वारा ग्रंथकाराला असे सांगावयाचे आहे की–

'काव्य हे एखाद्याच प्रतिभावंताकडून उत्पन्न होत असते.' या न्यायाने जरी ते काव्य स्वयमेव त्याला स्फुरत असते हे खरे असले तरी, 'ते असे असते' अशा रीतीने विशेष स्वरूपात त्याचे निरूपण केले गेले असता, ते सहस्रशाखांमध्ये परिणत होते. जसे आमचे परमगुरु श्री उत्पलपादाचार्य यांनी म्हटलेच आहे की–

भिन्न भिन्न प्रकारांनी केलेल्या याचनांच्या द्वारा प्रियकर खेचल्या गेलेला असला तरी व त्या प्रेयसीच्या अगदी निकट स्थित असला तरी देखील, इतर सर्वसाधारण व्यक्तींप्रमाणेच मानून प्रेयसी जर त्याला ओळखू शकली नाही तर

त्याच्याशी रमणासाठी कधीच प्रवृत्त होऊ शकत नाही त्याचप्रमाणे ईश्वर हा स्वात्मरूपात स्वतःजवळ असला तरी जोपर्यंत त्याच्या गुणांचे दर्शन लोकांना होत नाही तोपर्यंत त्याच्या निजवैभवाचा प्रभाव कुणावरही पडू शकत नाही. म्हणून (ईश्वराची ही ओळख पटावी म्हणून) ही **प्रत्यभिज्ञा** मी सांगितली आहे.

त्यामुळे ज्ञात वस्तू असली तरीदेखील तिचे विशेषरूपाने अनुसंधानात्मक निरूपण म्हणजे प्रत्यभिज्ञान असे येथे अभिप्रेत आहे. केवळ 'तेच हे' अशा प्रकारची ओळख म्हणजे प्रत्यभिज्ञान नव्हे.

'महाकवेः' या शब्दाचे तात्पर्य असे की जो 'मी महाकवी होईन' अशी आशा करतो.

अशा रीतीने व्यंग्य अर्थाचे व व्यंजक शब्दाचे प्राधान्य सांगत असतानाच, व्यंग्यव्यंजकभावाचे देखील प्राधान्य सांगितले. त्यामुळे जे ध्वनित करते, जे ध्वनित केल्या जाते, आणि जे ध्वनन होते त्या तीन्हीसाठी 'ध्वनी' ही संज्ञा उपपन्न होते.

कारिका ९

आलोकार्थी यथा दीपशिखायां यत्नवाञ्जनः ।
तदुपायतया तद्वदर्थे वाच्ये तदादृतः ॥

वाच्य, वाचक आणि तद्भाव म्हणजे वाच्य–वाचकभाव यांचे प्रथम ग्रहण करण्यात येत असल्याने त्यांचेच प्राधान्य होय अशी शंका कोणी उपस्थित केल्यास त्यावर उत्तर असे देतात की नेहमी उपायांचेच प्रथम ग्रहण केले जाते, हे लक्षात घेतले म्हणजे 'वाच्यार्थाचे प्राधान्य' हे साध्य सिद्ध करण्याच्या बाबतीत प्रथम उपादान हा हेतू विरुद्ध ठरतो, हे 'इदानीम्...' इत्यादी वाक्यातून येथे दाखविले आहे. (उपायांचे प्रथम उपादान केले जाते याचा अर्थ उपायांचे प्राधान्य दाखविणे हा कधीच नसतो. उलट उपाय ज्याच्यासाठी केले जातात ते 'उपेय' हे केव्हाही प्रधान असते. याच न्यायाने वाच्य–वाचकांचे ग्रहण प्रथम केले जाते ही गोष्ट त्यांचे प्राधान्य सिद्ध करू शकत नाही.)

'आलोकार्थी' यातील आलोक शब्दाचा अर्थ 'आलोकन' असा घ्यावा लागतो. आलोकन म्हणजे वनितेचे वदनकमल इ. सारख्या गोष्टींचे अवलोकन असा अर्थ होय. त्यासाठी उपाय आहे दीपशिखा.

कारिका १०

यथा पदार्थद्वारेण वाक्यार्थः सम्प्रतीयते ।
वाच्यार्थपूर्विका तद्वत्प्रतिपत्तस्य वस्तुनः ॥

प्रतिपद् या शब्दात भावे क्विप् प्रत्यय लागतो. तस्य वस्तुनः याचा अर्थ व्यंग्यरूपी सारार्थाची. ह्या श्लोकानुसार जो अत्यंत सहृदय नसतो त्याच्याचसाठी हा क्रम स्फुटरूपात संवेद्यच असतो, ज्याप्रमाणे अत्यंत शब्दवृत्तज्ञ नसलेल्या व्यक्तीसाठी पदार्थ व वाक्यार्थ हा क्रम असावा त्याप्रमाणे. परंतु ज्याच्या ठिकाणी सहृदयत्वाचा भाव पराकाष्ठेला पोहचलेला असतो त्याच्या बाबतीत मात्र क्रम असला तरीदेखील जाणवणारा नसतो. ज्याप्रमाणे एखाद्या वाक्यवृत्तकुशल व्यक्तीला वारंवार अनुमानाचा अभ्यास झाला असल्याकारणाने त्याच्याशी अविनाभावाने संबद्ध असलेल्या व्याप्तिस्मृती इत्यादी क्रमाची जाणीव होत नाही त्याप्रमाणेच हे असते असे येथे दाखविले आहे.

कारिका ११–१२

स्वसामर्थ्यवशेनैव वाक्यार्थप्रतिपादनम् ।
यथा व्यापारनिष्पत्तौ पदार्थो न विभाव्यते ॥
तद्वत्सचेतसां सोऽर्थो वाच्यार्थविमुखात्मनाम् ।
बुद्धौ तत्त्वार्थदर्शिन्यां झटित्येवावभासते ॥

'न व्यालुप्यते' म्हणजे व्यंग्यार्थाचे प्राधान्य कोणत्याही प्रकारे नष्ट होत नाही. व्यंग्यार्थाचे प्राधान्य असते म्हणूनच त्या व्यंग्यार्थापर्यंत (त्याची प्रतीती येईपर्यंत) अनुसरण करणारे व औत्सुक्यामुळे अधिक त्वरा करणारे मधे विश्रांती घेत नाहीत. ही गोष्टच हे दाखविते की वाच्यार्थ व व्यंग्यार्थ या दोहोंमध्ये क्रम असला तरी तो लक्षात येत नाही आणि हीच गोष्ट त्या व्यंग्यार्थाचे प्राधान्य सिद्ध करणारा हेतू होय.

कारिकेत येणाऱ्या स्वसामर्थ्य शब्दाचा अर्थ आकांक्षा, योग्यता व सन्निधी हा होय. विभाव्यते यातील 'वि' या शब्दाने विभक्तता सांगितली आहे. विभक्त स्वरूपात जाणवत नाही हा त्याचा अर्थ होय. यातून हेच सांगावयाचे आहे की क्रम विद्यमान असला तरीदेखील जाणवत नाही. त्यामुळे **'स्फोटाच्या अभिप्रायाने विद्यमान नसणारा क्रम'** असे जे म्हणतात ते उलट विरुद्धच वाटते. वाच्यार्थापासून विमुख आहे आत्मा ज्यांचा म्हणजेच वाच्यार्थाच्या ठिकाणी विश्रांत होऊन ज्यांचा आत्मा परितोष प्राप्त करू शकत नाही असे. याद्वारा 'सचेतसाम्' याच शब्दाचा अर्थ अभिव्यक्त केलेला आहे.

यावर कोणी अशी शंका घेऊ शकेल की हा शेवटी सहृदयांचाच मोठेपणा झाला, यातून काव्याचा कोणताही अतिशय (वैशिष्ट्य) दिसत नाही. त्यासाठीच 'अवभासते' हे पद कारिकेत आले आहे. त्यामुळे येथे वाच्यार्थ विभक्त स्वरूपात

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे

जाणवत नाही. हे खरे असले तरी वाच्यार्थाचा पूर्णपणे अनवभास (जाणीवेचा पूर्ण अभाव) मात्र नसतो. म्हणूनच पुढे तृतीय उद्योतात घटप्रदीपाचा दृष्टांत देऊन त्यायोगे व्यंग्यार्थ्याच्या प्रतीतीकाळीदेखील वाच्यार्थाची प्रतीती विघटित होत नाही असे जे म्हणणार आहेत त्याच्याशी या ग्रंथाचा (पहिल्या उद्योताचा) कोणताही विरोध येत नाही.

कारिका १३

यत्रार्थः शब्दो वा तमर्थमुपसर्जनीकृतस्वार्थौ ।
व्यङ्क्तः काव्यविशेषः स ध्वनिरिति सूरिभिः कथितः ॥

वृत्तीतील सद्भाव या शब्दाचा अर्थ सत्ता किंवा उत्तम स्वरूपात अस्तित्व अथवा प्राधान्य असा घ्यावा. या दोन्हीचे (सत्ता व प्राधान्य) प्रतिपादन करण्याची इच्छा आहे. 'प्रकृते' म्हणजे या लक्षणग्रंथात म्हणजेच काव्यशास्त्रात. 'उपयोजयन्' या शब्दाचा अर्थ उपयोगास प्राप्त करून देत असा आहे. कारिकेतील तमर्थम् (व्यङ्क्तः) म्हणजे **त्या अर्थाला** उद्देशून (म्हणजेच त्या प्रतीयमान अर्थाला उद्देशून) हा उपयोग अभिप्रेत आहे. (त्या अर्थाच्या योगाने ध्वनिकाव्याचे लक्षण निश्चित होणार आहे हा त्या अर्थाचा उपयोग झाला.) स्व हा शब्द आत्मवाचक आहे. 'स्वार्थौ' म्हणजे स्व आणि अर्थ हे दोघेही. ते (स्व व अर्थ हे) ज्याच्याद्वारा गुणीकृत झाले आहेत म्हणजे गौणत्वाला आणल्या गेले आहेत असे अनुक्रमे अर्थ व शब्द येथे अभिप्रेत आहेत. म्हणजेच ज्याने स्वतःला गुणीकृत बनविले आहे असा अर्थ व ज्याने आपल्या अभिधेयाला म्हणजे अर्थाला गौण बनविले आहे असा शब्द हे येथे त्या अर्थाला अभिव्यक्त करतात.

'सरस्वती स्वादु तदर्थवस्तु...' या कारिकेत हेच सांगितले आहे. व्यङ्क्तः यातील द्विवचनाद्वारा असे दाखवावयाचे आहे की जरी अविवक्षितवाच्य-ध्वनीमध्ये शब्दच व्यंजक असला तरी त्याला असलेली अर्थाची (वाच्यार्थाची) सहकारिता नष्ट होत नाही, भंगत नाही. नाहीतर, ज्याचा अर्थ माहिती नाही असाही शब्द त्या प्रतीयमानार्थाचा व्यंजक होण्याची आपत्ती आली असती. (अविवक्षितवाच्य या नावावरूनच 'वाच्य' विवक्षित नाही असे प्रथमदर्शनी दिसत असले तरी वाच्यार्थ किंवा मुख्यार्थ ज्ञात असणे आवश्यक असते. म्हणजेच त्याची शब्दाला सहकारिता ही गृहीतच धरलेली असते–जरी तो अर्थ त्या ध्वनीच्या लक्षणामूलत्वामुळे त्याज्य असला तरी.) विवक्षितान्यपरवाच्यध्वनीमध्ये शब्दाचे देखील सहकारित्व असतेच. कारण विशिष्ट शब्दाद्वारा तो अर्थ अभिधेय असल्याशिवाय त्या अर्थाच्या ठिकाणी व्यंजकता येऊ शकत नाही (लक्षणामूल ध्वनीमध्ये वाच्यार्थ सोडावा लागतो याचा अर्थ तेथे फक्त शब्दालाच प्राधान्य

आहे असा होत नाही. त्याचप्रमाणे अभिधामूल ध्वनीत वाच्यार्थाला महत्त्व असते याचा अर्थ तेथे शब्दाला काहीच महत्त्व नाही असा होत नाही.)

निष्कर्ष असा की सर्वत्र शब्द आणि अर्थ या दोहोंचाही ध्वनन हा व्यापार असतो. त्यामुळे भट्टनायकाने येथील द्विवचनात जो दोष दाखविला आहे तो विचार न करता, असे वाटते.

'अर्थः शब्दो वा' यातील 'वा' हे विकल्पवाचक विधान प्राधान्याच्या अभिप्रायाने आहे.

काव्यविशेषः याचा विग्रह काव्य आणि त्याचे वैशिष्ट्य किंवा काव्याचे वैशिष्ट्य असा होऊ शकेल.

या ठिकाणी 'काव्य' हा शब्द योजिल्यामुळे गुण व अलंकार यांनी उपस्कृत (संस्कृत) केलेल्या शब्द व अर्थाच्या पाठोपाठ येणारा ध्वनिरूप आत्मा असे म्हटल्यासारखे होते. त्यामुळे श्रुतार्थापत्तीच्या ठिकाणी देखील ध्वनिव्यवहार होऊ लागेल या शंकेला जागा राहात नाही. "चारुत्वाची प्रतीती हाच काव्याचा आत्मा होय" असे जे म्हटले आहे ते सुद्धा आम्ही मान्यच करतो. कारण हा वाद केवळ नावापुरताच आहे. (ध्वनी म्हणावयाचे की चारुत्व म्हणावयाचे एवढ्यापुरताच सीमित आहे.) चारुत्वाची प्रतीती हा जर काव्याचा आत्मा असे ठरले तर प्रत्यक्षादी प्रमाणांनी सुद्धा ती चारुत्वप्रतीती येताना दिसते असे जे म्हटले आहे त्यावर उत्तर असे की शब्दार्थमय असलेल्या काव्याच्या आत्मविवेचनप्रसंगी (काव्याचा आत्मा कोण हे ठरवीत असता) या प्रमाणांना जागाच कुठे आहे? म्हणून हा उत्तर देण्यालायक आक्षेप नाही.

कारिकेतील 'स' या शब्दाचा अर्थ 'अर्थ' किंवा 'शब्द' किंवा 'व्यापार' हा होय. अर्थदेखील '**ध्वनित करतो तो ध्वनी**' या व्युत्पत्तीनुसार वाच्यार्थच समजावा. तसेच शब्द देखील. (ध्वनति या व्युत्पत्तीनुसार शब्दाला देखील 'ध्वनी' म्हटले जाऊ शकते.) **जो ध्वनित केला जातो** तो ध्वनी या व्युत्पत्तीनुसार व्यंग्यार्थ हा अर्थ घ्यावा व शब्द व अर्थ या दोहोंचे ध्वनन या व्युत्पत्तीनुसार व्यापार हा अर्थदेखील घेता येतो.

परंतु कारिकेच्याद्वारा प्राधान्याने वरील तीन्ही गोष्टींचा (वरील तीन्ही व्युत्पत्तींनुसार निघणाऱ्या अर्थ, शब्द व व्यापार या तीन्हींचा) **काव्यरूप समुदाय** म्हणजेच 'ध्वनी' असे प्रतिपादन केले आहे.

वृत्तीतील 'विभक्त' हा शब्द. (ध्वनी हा वाच्यवाचक–चारुत्वहेतूंहून विभक्त म्हणजे भिन्न असतो कारण) गुण व अलंकार यांचा प्राण म्हणजे वाच्य-वाचकभाव होय. आणि याचे (ध्वनीचे) त्याहून (वाच्यवाचकभावाहून) भिन्न

असे म्हणजेच 'व्यङ्ग्यव्यञ्जकभावरूप' सार असल्याकारणाने याचा (ध्वनीचा) त्यांच्या ठिकाणी (गुणालंकारांमध्ये) अंतर्भाव होऊ शकत नाही. (वृत्तीतील) विषय शब्दाचा अर्थ 'अन्यत्र नसणे' हा होय. अशारीतीने 'त्याहून व्यतिरिक्त असा कोण आहे हा ध्वनी' या आक्षेपाचे निराकरण केले. (अभाववाद्यांच्या पहिल्या पक्षाचे येथे निराकरण केले आहे.)

'लक्षणकृताम् एव स केवलं न प्रसिद्धः' यातील अभिप्राय असा की 'लक्षणकारांना माहिती नसणे' हा हेतू विरुद्ध हेतू होय. कारण त्यामुळेच ध्वनीचे प्रयत्नपूर्वक लक्षण करणे आवश्यक ठरते. (ध्वनीच्या विरोधकांनी 'ध्वनी नाही' हे सिद्ध करण्याकरिता जुन्या काव्यलक्षणकारांचा दाखला देऊन असा युक्तिवाद केला की प्रसिद्ध अशा काव्यलक्षणकारांनी केलेल्या लक्षणांमध्ये ध्वनीला कुठेही स्थान नसल्यामुळे त्याचे लक्षण करू नये कारण जुन्या लोकांना ज्या अर्थी तो माहिती नव्हता त्या अर्थी तो काव्यत्वाची हानी करणारा असला पाहिजे या युक्तिवादातील 'जुन्या काव्यलक्षणकारांच्या दृष्टीने ध्वनी अप्रसिद्ध असल्यामुळे' हा हेतू उलट ध्वनीचे लक्षण करण्याची आवश्यकता प्रतिपादन करीत असल्यामुळे साध्याच्या विरुद्ध गोष्ट सिद्ध करतो म्हणून तो विरुद्ध हेतू होय. आणि खरी गोष्ट तर अशी आहे की जुन्या लक्षणकारांना देखील ध्वनी माहिती नव्हता असे नाही.) लक्ष्याच्या ठिकाणी अप्रसिद्ध असणे हा असिद्ध हेतू होय (लक्ष्याच्या ठिकाणी म्हणजे प्रत्यक्ष काव्यांमध्ये ध्वनितत्त्व प्रतीतीला येत होते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे काव्यातच ध्वनी नव्हता हे म्हणणे खंडित होते. ध्वनीची तुलना या ध्वनिविरोधकांनी काव्याशी संबंध नसलेल्या म्हणजेच काव्याच्या प्रांताहून बाहेरच्या अशा नृत्य, गीत, अक्षिनिकोचन इ. गोष्टींशी करून ध्वनीला काव्याचे लक्षण लागू पडू शकत नाही असे म्हटले. "न च उक्तप्रस्थानव्यतिरेकिणो मार्गस्य तत् (काव्यलक्षणं) सम्भवति" असे ध्वनीचा अभाव प्रतिपादन करणाऱ्या दुसऱ्या पक्षाचे म्हणणे आहे. त्यांना उद्देशून पुढील उत्तर अभिनवगुप्तांनी दिले आहे.)

नृत्य, गीत इ. सारखे जे प्रकार त्यांचा काव्याशी काहीही संबंध नसतो. (परंतु ध्वनीचा संबंध मात्र काव्याशी आहे व काव्यलक्षणाशीही आहे. म्हणून ध्वनी हे काव्यबाह्य तत्त्व नव्हे.)

चित्रम् या शब्दाचा अर्थ वृत्त आदींमुळे (छंदाच्या वैचित्र्यामुळे) विस्मय उत्पन्न करणारे. सहृदयांना अभिलषणीय वाटणाऱ्या व चमत्कार हेच सार असलेल्या रसाच्या निष्यंदाने–प्रवाहाने युक्त असलेले ते 'चित्र' नव्हे.

एखाद्या काव्याचे ते अनुकरण असल्यामुळे 'चित्र' म्हणविले जाते किंवा केवळ चित्रासारखे असते (त्यात चैतन्य नसते) म्हणून चित्र म्हणविले जाते;

किंवा केवळ कला (कारागिरी) हेच स्वरूप असल्यामुळे चित्र म्हणविले जाते. म्हणजेच तृतीय उद्योतात–

"प्रधानगुणभावाभ्यां व्यङ्ग्यस्यैवं व्यवस्थितम् ।
द्विधा काव्यं ततोऽन्यद्यत्तचित्रमभिधीयते ॥"

व्यंग्यार्थाचे प्राधान्य व गौणत्व यामुळे अनुक्रमे काव्य दोन प्रकारचे होते. त्याहून भिन्न असलेले ते 'चित्र' म्हणविले जाते.

या कारिकेच्या प्रसंगी हे सांगणारच आहोत. (तिसऱ्या आक्षेपाचा परामर्श अभिनवगुप्तांनी घेतलेला नाही. परिकरासाठी म्हणजे कारिकेच्या अर्थाचा अधिक विस्तार किंवा प्रक्षेप करण्यासाठी असलेला श्लोक म्हणजे परिकरश्लोक.)

यत्र म्हणजे अलंकारात. वैशद्येन म्हणजे चारुत्वाने व स्पष्ट स्वरूपात– असा अर्थ होतो. 'अभिहितम्' असा भूतकालीन शब्दप्रयोग केला कारण 'व्यङ्क्तः' या (१३ व्या कारिकेतील) क्रियापदाचे स्पष्टीकरण आधीच केले गेले आहे.

अर्थो गुणीकृतात्मा...इ. विवेचनातील आत्मा या शब्दाने 'स्व' (कारिकेतील) या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे (आत्मा हा कारिकेतील 'स्व'चा अर्थ आहे व या अर्थाचा (स्पष्टीकरणाचा) संबंध कारिकेतील यत्रार्थः मधील अर्थाशी– वाच्यार्थाशी आहे. वाच्यार्थ कसा ? तर ज्याने स्वतःला 'गुणीकृत' बनविले आहे असा 'न चैतद्'मधील 'एतद्'चा अर्थ व्यंग्याचे प्राधान्य. ते समासोक्ती आदी अलंकारांमध्ये नसते.) आणि १२ व्या कारिकेत म्हटल्याप्रमाणे तत्त्वावभासिनी बुद्धीच्या ठिकाणी तो अर्थ अकस्मात्च प्रकाशित होतो...या न्यायाने अखंड अशा चर्वणेत त्याची विश्रांती होत असल्यामुळे प्रत्यक्ष रसप्रतीतीच्या वेळी त्याचे प्राधान्य प्रकाशित होत नाही हे खरे असले तरी विवेचकांच्याद्वारा काव्याच्या **जीविताचा** शोध घेतला जात असताना, जेव्हा व्यंग्यार्थ हा पुन्हा वाच्यार्थाचेच अनुप्राणन करताना आढळतो (त्याला सजीव करताना आढळतो) तेव्हा तो उपकरणस्वरूप झाल्यामुळेच त्याला अलंकारत्व प्राप्त होते. व्यंग्यार्थाद्वारा उपस्कृत झालेल्या त्या वाच्यार्थापासूनच चमत्काराचा लाभ होतो. जरी अन्ती रसध्वनीच असतो, तरीपण मध्यकक्ष्येमध्ये अंतर्भूत असलेला हा व्यंग्यार्थ स्वतंत्रपणे रसोन्मुख बनत नसतो उलट तो वाच्यार्थावरच संस्कार करण्यास धावत असतो म्हणून (या समासोक्त्यादी अलंकारांमध्ये) गुणीभूत–व्यंग्यता असते. समासोक्तीमध्ये–

यत्रोक्तौ गम्यतेऽन्योर्थस्तत्समानैर्विशेषणैः ।
सा समासोक्तिरुदिता संक्षिप्तार्थतमा बुधैः ।।

ज्या उक्तीमध्ये समान विशेषणांच्या आधाराने अन्यार्थ जाणवतो त्या उक्तीला संक्षिप्त स्वरूपात अर्थ जाणवून देण्याच्या गुणधर्मामुळे समासोक्ती असे नाव विद्वज्जनांनी दिले आहे.

वरील कारिकेत चार चरणांमधून अनुक्रमे समासोक्तीच्या लक्षणाचे स्वरूप, हेतू, नाव व त्याचे निर्वचन या गोष्टी क्रमाने चार पदांमध्ये सांगितल्या आहेत.

त्या पुढीलप्रमाणे–वृद्धिगत झालेला आहे, सायंकालीन रक्तिमा किंवा प्रेम ज्याचे. ज्यात तारका म्हणजे नक्षत्रे (तारे) किंवा नेत्रातील बाहुल्या किंवा अक्षिकनीनिका चंचल बनल्या आहेत. तथा म्हणजे तत्काळ आणि प्रेमाच्या आवेगाने. गृहीत म्हणजे प्रकाशित केले किंवा चुंबनासाठी आक्रांत केले–वर उचलले. निशेचे मुख म्हणजे निशेचा प्रारंभ. किंवा मुखकमल. यथा शब्दाचा अर्थ तत्काळ ग्रहणामुळे आणि प्रेमाच्या आवेगामुळे. तिमिर म्हणजे अंधकार आणि अंशुक म्हणजे सूक्ष्म किरण. म्हणजेच चंद्रकिरणांनी मिश्र बनल्यामुळे चित्रविचित्र दिसणारे तमःपटल–अंधःकाराचे वस्त्र. किंवा तिमिरांशुक म्हणजे नवविवाहित प्रौढ वधूसाठी योग्य असलेली नीलजालिका. 'रागात्' म्हणजे संध्याकालाने निर्माण केलेल्या रक्तिम्यामुळे किंवा प्रेमामुळे. पुरोऽपि म्हणजे पूर्वदिशेला व तसेच पुढचात हा अर्थ. गलित म्हणजे शांत झालेले किंवा पतित म्हणजे पडलेले.

तया म्हणजे तिच्यामुळे अर्थात करणस्वरूप अशा रात्रीमुळे सर्व मिश्रित झाल्याकारणाने किंवा **उपलक्षणत्वाने...**

न लक्षितम् याचा अर्थ हा रात्रीचा प्रारंभ झाला हे कळले नाही. अंधः-काराने मिश्रित अशा चंद्रकिरणांना पाहून रात्रीला प्रारंभ झाला हे लोकांच्या लक्षात येते. परंतु स्पष्ट प्रकाशात मात्र हे लक्षात येऊ शकत नाही. नायिकेच्या बाबतीत मात्र तया हे कर्तृवाचक पद समजावे (ती कर्तरी तृतीया समजावी.) रात्रीपक्षात मात्र अपि हा शब्द 'लक्षितम्' याच्या नंतर जोडावा. याठिकाणी मागून आलेल्या नायकाद्वारा घडलेल्या चुंबनोपक्रमात समोर नीलांशुक खाली पडले असा अर्थ (व्यंजित होतो) किंवा 'पुरः म्हणजेच समोरून नायकाने अशा रीतीने तिने (नायिकेचे) मुख धरले' असा संबंध घ्यावा. त्यामुळे येथे व्यंग्यार्थ प्रतीत होऊन सुद्धा त्याला प्राधान्य येत नाही. ते असे–**नायकाचा व्यवहार** (व्यंग्य) हा शृंगाररसाच्या विभावरूप अशा निशा आणि चंद्र या दोघांनाही

परिष्कृत करीत अलंकारत्व प्राप्त करतो व त्याच्यामुळे विभावस्वरूपाला प्राप्त झालेल्या अशा वाच्यार्थापासून रस प्रवाहित होतो. ज्यांनी असे स्पष्टीकरण केले आहे की–"उपोढरागेण या श्लोकातील 'तया' म्हणजेच 'निशया' हे कर्तृत्वाचक पद आहे पण अचेतन अशा निशेच्या ठिकाणी कर्तृत्व युक्तिसंगत ठरत नाही, त्यामुळे नायकव्यवहार येथे शब्दानेच उन्नीत होत असल्याकारणाने अभिधेयच (वाच्य) आहे, व्यंग्य नव्हे व म्हणूनच ही समासोक्ती होय" –त्यांनी व्यंग्येन अनुगतम् हा प्रस्तुत ग्रंथार्थच सोडून दिला आहे.

आनंदवर्धनांनी वृत्तीत 'समारोपित नायिकानायक–व्यवहारयोर्निशा-शशिनोः' असे शब्द वापरले आहेत. त्यातील 'समारोपित्' या शब्दामुळे निशारूपी नायिका व चंद्ररूपी नायक असे हे रूपक वाटण्याचा संभव आहे. त्यातही नायिका व नायक ही (उपमेये) प्रत्यक्ष शब्दोपात्त नसल्यामुळे हा एकदेशविवर्ती रूपकाचाच प्रकार वाटू शकतो. ही शंका जाणून अभिनवगुप्त एकदेशविवर्ती रूपकाचे उदाहरण देऊन त्याचा समासोक्तीहून भेद स्पष्ट करतात. तो पुढीलप्रमाणे–

एकदेशविवर्ती रूपक हे अशा प्रकारचे असेल. 'सरोवररूपी नृपांना, राजहंसाच्या द्वारा जणू काही शरदऋतूच वारा घालीत होता.' (या उदाहरणात सरोवरांवरील नृपतींचे रूपक प्रत्यक्ष शब्दांनी वर्णिले असले तरी राजहंसांवरील पंख्यांचे रूपक मात्र अध्याहृत ठेवले आहे त्यामुळे हे एकदेशविवर्तीरूपक होय.) याठिकाणी समासोक्ती होऊ शकणार नाही. कारण तुल्य विशेषणांचा म्हणजे उपमेय व उपमान या दोहोंनाही लागू पडणाऱ्या श्लिष्ट किंवा समान विशेषणांचा येथे अभाव आहे. शिवाय भामहकृत समासोक्तीच्या व्याख्येतील 'गम्यते' या उल्लेखामुळे अभिधाव्यापाराचे येथे निराकरण होते. तेव्हा या विषयावरील अधिक विस्तार आता आवरता घ्यावा.

नायिकेचा नायकाच्या बाबतीत जो व्यवहार आहे तो निशेवर आरोपित केला आहे, तर नायिकेच्या बाबतीत जो नायकाचा व्यवहार तो चंद्रावर आरोपित केला आहे असे व्याख्यान (स्पष्टीकरण) केल्यानंतर 'एकशेष द्वंद्वा'ला काही अवसरच उरत नाही. (दोघांचाही उल्लेख सारखाच महत्त्वाचा आहे.)

(संदर्भ : वैय्याकरण सिद्धांत कौमुदी–एकशेषप्रकरणम् । पुमान् स्त्रिया. १–२–३७.

स्त्रिया सहोक्तौ पुमाञ्छिष्यते तल्लक्षण एव विशेषश्चेत् । हंसी च हंसश्च हंसौ ।)

स्त्रीलिंगी आणि पुल्लिंगी शब्द यांमध्ये तल्लक्षणामुळेच वैरूप्य येत असल्यास त्यांच्या एकशेष समासात पुल्लिंगी शब्द शिल्लक रहातो. उदा. हंसश्च हंसी च हंसौ ! याठिकाणी स्त्रीत्वमात्राने दोन शब्दात वैरूप्य आहे. म्हणून 'सरूपाणाम्' या सूत्राची प्राप्ती नाही. ('गौरियं गौश्चायम्' येथे तल्लक्षण विशेषाचा अभाव असल्याने एकशेष होत नाही.)

आक्षेप—**प्रतिषेध इवेष्टस्य यो विशेषाभिधित्सया ।**
वक्ष्यमाणोक्तविषयः स आक्षेपो द्विधा मतः ॥

जी वस्तू इष्ट असते तिचाच जेव्हा प्रतिषेध केल्यासारखे दाखविले जाते व हे काही विशेष सांगण्याच्या इच्छेने केले जाते तेव्हा तो आक्षेप अलंकार होतो. त्याचे वक्ष्यमाण आणि उक्तविषय असे दोन प्रकार होतात.

त्यापैकी पहिला प्रकार–

अहं त्वां यदि नेक्षेयं क्षणमप्युत्सुका ततः ।
इयदेवास्त्वतोऽन्येन किमुक्तेनाप्रियेण ते ॥

अतिशय उत्सुक झालेल्या मला जर तू क्षणभरदेखील दिसला नाहीस तर...पण एवढेच पुरे. यापुढील तुला अप्रिय असलेली दुसरी गोष्ट सांगून काय फायदा ?

याठिकाणी असलेला निषेधरूप आक्षेप पुढे सांगितल्या जावयाच्या मरणाची सूचना देणारा आहे. म्हणजे (भावी मरणविषयक आहे.) येथे 'एवढेच पुरे' हे वचन 'मी मरून जाईन' या अर्थाचा आक्षेप करीत म्हणजे या अर्थाचे सूचन करीत चारुत्वाचे कारण बनते. अशा रीतीने जे आक्षेप्य (व्यंग्य) आहे (ते भावी मरण) त्याच्याद्वारा, जे आक्षेपक आहे ते म्हणजे (निषेधरूप) वाच्य, अलंकृत केले जाते म्हणून ते (वाच्य) प्रधान ठरते.

उक्तविषयक आक्षेपाचे उदाहरण माझेच आहे.

भो भोः किं किमकाण्ड एव पतितस्त्वं पान्थ कान्या
गतिस्तत्तादृक्तृषितस्य मे खलमतिः सोऽयं जलं गूहते ।
अस्थानोपनतामकालसुलभां तृष्णां प्रतिक्रुध्य भोः
त्रैलोक्यप्रथितप्रभावमहिमा मार्गः पुनर्मारवः ॥

हे पथिका ! तू अस्थानी का येऊन ठेपला आहेस ? मला एवढी काही तहान लागली आहे की मी तरी दुसरे काय करू ? हा दुष्टबुद्धी (वाळवंटी प्रदेश) जल लपवून ठेवतो.

अरे, माझ्या या अकालसुलभ (नको त्या वेळी लागणाऱ्या) आणि अस्थानोपनत (नको त्या ठिकाणी लागणाऱ्या) तृष्णेला तू नावे ठेव. अन्यथा या

मरुमार्गाच्या प्रभावाचा महिमा त्रैलोक्यात विख्यात आहे. (कुणाला ठाऊक नाही ?)

या ठिकाणी 'मला हवी असलेली गोष्ट या व्यक्तीपासून का बरे प्राप्त होऊ शकणार नाही ?' अशा प्रत्याशेने ज्याच्या हृदयात विश्वास उत्पन्न झाला आहे अशा एका सेवकाला कोणी एक वरील आक्षेपाच्या द्वारा जाग आणीत आहे. असत्पुरुषाची सेवा, तिची विफलता व त्यामुळे उत्पन्न होणारा उद्वेग, निषेध-रूपी आक्षेपाद्वारा वाच्य बनला असून तोच शांतरसाच्या निर्वेद या स्थायिभावाचा विभाव बनून चमत्कृती उत्पन्न करणारा ठरला आहे.

वामनाने मात्र 'उपमानाचा आक्षेप' असे आक्षेपाचे लक्षण केले आहे. चंद्रादी उपमानाचा आक्षेप व तो 'अमुक गोष्ट असताना तुझे काय काम ?' अशा उदाहरणात दिसून येतो. उदाहरणार्थ–

तस्यास्तन्मुखमस्ति सौम्यसुभगं किं पार्वणेनेन्दुना...

सौम्य व सुभग असे तिचे मुख असताना पर्वकालीन चंद्राचे काय काम ? सौंदर्याचे स्थानभूत असलेले ते नेत्र असताना नील कमलांचे काय काम ? आणि तिचे अधर असताना कोमलकांतीच्या पल्लवांचे काय काम ? त्या त्या वस्तूंची रचना करण्याच्या बाबतीत काय हा विधात्याचा आग्रह ?

येथे व्यंग्य असलेला 'उपमारूप अर्थ वाच्यालाच उपकारक ठरतो. त्याचा काय उपयोग ?' अशा स्वरूपाचा अपहस्तनारूपी म्हणजे निरासरूपी आक्षेप वाच्य होऊनच चमत्कृतीचे कारण बनतो. (वाच्याच्या दशेतच चमत्कृती उत्पन्न करतो.) उपमानाचा आक्षेप म्हणजे उपमानाचे सामर्थ्याने आकर्षण असा अर्थ घेतला जातो. त्याचे उदाहरण पुढे दिले आहे :

ऐन्द्र धनुः पाण्डुपयोधरेण शरद्दधानार्द्रनखक्षताभम्...

आपल्या पांढुरक्या रंगाच्या पयोधरांनी, आर्द्र नखक्षतांसमान दिसणारे इंद्रधनुष्य धारण करणारी शरदरूपी नायिका कलंकयुक्त चंद्राला प्रसन्न करते पण सूर्याचा ताप मात्र वाढविते.

याठिकाणी ईर्ष्याकलुषित असे अन्य नायकरूपी उपमान आक्षिप्त केले गेले असले तरी वाच्यार्थालाच अलंकृत करते. म्हणून ही समासोक्तीच होय. म्हणूनच 'चारुत्वोत्कर्षामुळे' असे म्हटले. 'म्हणूनच चारुत्वोत्कर्षनिबंधना हि वाच्यव्यङ्ग्ययोः प्राधान्याप्राधान्यविवक्षा' असे (आनंदवर्धनांनी) म्हटले आहे.

याच बाबतीत (चारुत्वोत्कर्षाच्या आधाराने प्राधान्य ठरविण्याबाबत) अनुरागवती संध्या...हा प्रसिद्ध दृष्टांत ग्रंथकार देतात. त्यावरून आक्षेपतत्त्वाचे

समर्थनच अजून पूर्ण झालेले नाही असे समजले पाहिजे. याटिकाणी उदाहरणे म्हणून समासोक्तीचा श्लोक दिला आहे. (आक्षेपाचा विषय पूर्णपणे सोदाहरण स्पष्ट करण्यापूर्वीच अलंकारांमधील वाच्य व व्यंग्य अर्थांच्या प्राधान्याचा विषय घेऊन त्यासाठी एक सार्वत्रिक नियम सांगितला आहे. या नियमाचा फक्त आक्षेप–विवेचनाशी संबंध आहे असे नव्हे तर तो सर्वच अलंकारांना लागू आहे. याच सार्वत्रिक नियमाचे उदाहरण म्हणून 'अनुरागवती'...हा श्लोक घेतला आहे. आक्षेपाचा विषय त्यामुळेच अपूर्ण राहिला असे भाष्य (युक्तिवाद) करून अभिनवगुप्तांनी आनंदवर्धनांचे समर्थन केले आहे. अन्यथा अनुरागवती हा श्लोक आक्षेपविवेचनाच्या ओघात आल्यामुळे आक्षेप अलंकाराचेच उदाहरण म्हणून दिला आहे असा समज होऊ शकतो आणि प्रत्यक्षात अनुरागवती...हा श्लोक समासोक्तीचे उदाहरण असल्यामुळे, आनंदवर्धनांच्या हातून अशी चूक कशी झाली याचेही आश्चर्य वाटू शकते. त्यासाठी हे स्पष्टीकरण अभिनवगुप्तांना द्यावे लागले.)

'अहो दैवगती' या पंक्तीचा अर्थ. वडिलधाऱ्या मंडळींच्या आज्ञेत असल्यामुळे समागम होऊ शकत नाही असा अर्थ आहे.

वृत्तीतील 'तस्यैव' या शब्दाचा अर्थ 'वाच्यस्यैव' असा घ्यावयाचा.

वामनाच्या मते हा आक्षेप अलंकार आहे तर भामहाच्या मते हा समासोक्ती अलंकार आहे असा आशय मनात ठेवून समासोक्ती व आक्षेप या दोन्ही अलंकारांचे एकच उदाहरण मोठ्या युक्तीने ग्रंथकाराने (आनंदवर्धनांनी) दिले आहे. ही समासोक्ती असो की आक्षेप असो, आम्हाला त्याचे काय? अलंकारांमध्ये नेहमीच व्यंग्य हे वाच्याच्या तुलनेच गौण बनत असते हे आमचे साध्य होय असा आशय या ग्रंथात आमच्या गुरूंनी स्पष्ट केला आहे.

अशा रीतीने प्राधान्यविवक्षेच्या बाबतीत दृष्टांत सांगून नाव देखील कसे प्राधान्यानुसारच ठरत असते याविषयी स्वतःसाठी व इतरांसाठीही प्रसिद्ध असलेला दृष्टांत ग्रंथकारांनी यथा च...या वाक्यात दिला आहे. या वाक्यातील उपमायाः या शब्दाचा अर्थ उपमानोपमेयभावाची असा घ्यावा. 'तया' शब्दाचा अर्थ उपमया म्हणजेच उपमेवरून. दीपक अलंकाराच्या बाबतीत आदिविषय, मध्यविषय व अंतविषय असा तीन प्रकारचा दीपक असतो असे लक्षण केले आहे (भामहाने).

कसोटीच्या पाषाणावर घासलेला मणी, शस्त्राने जखमी (घायाळ) झालेला विजयी वीर, ज्याची एकच कला शिल्लक राहिली आहे असा चंद्र, सुरतमृदित (पीडित) नवतरुणी, मदप्रवाह क्षीण झालेला हत्ती, शरद ऋतूत

जिचे वाळवंट सुकून गेले आहे अशी नदी आणि याचकांना देऊन टाकल्यामुळे ज्यांचे वैभव नष्ट झाले आहे असे लोक आपल्या कृशपणामुळे शोभून दिसतात.

याठिकाणी दीपनामुळेच सौंदर्य निर्माण होते. (व त्यावरूनच दीपक हे नाव या अलंकाराला पडले आहे.)

जिच्या अंतर्गत उपमा असते अशीच अपह्नुती अभीष्ट असते. या (भामहकृत) व्याख्येनुसार अपह्नुतीनेच म्हणजेच लपविण्याच्या क्रियेनेच शोभा येत असते. उदाहरणार्थ :

मदाने मुखरित झालेली (गुंजारव करणारी) ही भृंगपंक्ती वारंवार गुंजारव करीत नाही तर कामदेवाच्या ताणलेल्या (सज्ज केलेल्या) धनुष्याचा हा ध्वनी आहे.

अशा रीतीने आक्षेपाचा विचार केल्यानंतर उद्देश्य–क्रमाला अनुसरूनच आता दुसरे प्रमेय सांगताहेत–'अनुक्तनिमित्तायाम् अपि विशेषोक्तौ' या वाक्याद्वारा :

(एकदेशाचा विगम म्हणजेच विवक्षित कार्य सिद्ध करणारे उपायभूत असे जे गुण, त्यांच्यापैकी एखादा कमी झाला असता, (एखाद्याची अनुपस्थिती असता), जेव्हा अन्य एखाद्या गुणाची तो कार्यसिद्धीची क्षमता धारण करतो यासाठी स्तुती केली जाते आणि हे जेव्हा)

एकदेशाचा विगम झाला असता म्हणजेच विवक्षित कार्य सिद्ध करणाऱ्या उपायभूत गुणांपैकी एखादा कमी झाला असता, विशेष महिमा सांगण्याच्या हेतूने जेव्हा अन्य एखाद्या गुणाच्या कार्यसिद्धिक्षमतेची स्तुती केली जाते तेव्हा तिला विशेषोक्ती असे म्हणतात. उदाहरणार्थ :

"स एकस्त्रीणि जयति जगन्ति कुसुमायुधः ।
हरतापि तनुं यस्य शम्भुना न हृतं बलम् ॥"

तो एकटाच कुसुमायुध कामदेव तीन्ही जगांना जिंकून घेतो. शंकराने त्याची तनू हरण केली पण त्याचे बल मात्र तो हरण करू शकला नाही ही अचिंत्यनिमित्ता विशेषोक्ती असल्याकारणाने हिच्या ठिकाणी व्यंग्यार्थाचे अस्तित्वच नसते. उक्तनिमित्ता विशेषोक्तीत देखील वस्तूच्या स्वभावातच केवळ कथनाचे पर्यवसान होत असल्यामुळे तेथेदेखील व्यंग्यार्थाच्या अस्तित्वाची शंका घेऊ नये. उदाहरणार्थ :

कर्पूरइव दग्धोऽपि शक्तिमान्यो जने जने ।
नमोऽस्त्ववार्यवीर्याय तस्मै मकरकेतवे ॥

कापरासारखा जळूनदेखील जो प्रत्येक माणसाच्या ठिकाणी शक्तिमान असतो त्या अप्रतिहत पराक्रमशाली अशा कुसुमधन्वा कामदेवाला नमस्कार असो.

म्हणूनच वरील दोन्ही प्रकारांना बाजूला सारून अनुक्तनिमित्तायामपि... या वाक्याद्वारे तिसऱ्या प्रकाराविषयी शंका उपस्थित केली आहे.

व्यंग्यस्य प्रकरणसामर्थ्यात्...या वाक्याचा अर्थ. त्याच्या न जाण्यामागे थंडीची बाधा हे कारण आहे असे भट्टोद्भटाचे म्हणणे आहे. त्याच्या अभिप्रायाने ग्रंथकार असे म्हणतो की त्यात (म्हणजे थंडीचे निमित्त कळण्यात) कोणतीच चारुत्वनिष्पत्ती होत नाही. याशिवाय रसिकांनी ज्या निमित्ताची कल्पना केली आहे ते असे :

झोप सोडून सहप्रवाशांसोबत निघून जाण्यापेक्षा कान्तेशी मीलन होण्याच्या दृष्टीने झोप हा अधिक सोपा उपाय होय असे वाटल्यामुळे (कारण झोपेत ती स्वप्नात तरी दिसू शकेल असे वाटल्यामुळे) झोप यावी या हेतूने, तो संकोच सोडत नव्हता. हे निमित्त देखील अलंकारज्ञांनी चारुत्वहेतू या स्वरूपात मान्य केलेले नाही. उलट 'नैव शिथिलयति' हा त्या विशेषोक्तीचाच एक भाग असून, अभिव्यंजित होणाऱ्या निमित्ताद्वारा परिष्कृत होऊन तो चारुत्व हेतू ठरतो. असे नसते तर ती विशेषोक्तीच झाली नसती. अशा रीतीने ग्रंथकारांनी हे दोन्ही अभिप्राय एकाच सर्वसाधारण विधानाद्वारा निरूपित केले आहेत. केवळ उद्भटाच्या अभिप्रायानुसार ग्रंथातील मत व्यवस्थित झाले आहे असे नव्हे–असा आशय समजून घ्यावा.

जेव्हा (वेगळ्या) अन्य प्रकाराने कथन केले जाते म्हणजेच वाच्य–वाचक व्यापाराने रहित अशा अवगमन नामक व्यंजनाव्यापाराने कथन केले जाते तेव्हा पर्यायोक्त नावाचा अलंकार होतो, असे पर्यायोक्ताचे लक्षण आहे. उदा. :

शत्रूचा उच्छेद करण्याची तीव्र इच्छा असलेल्या, योग्य मार्गाचे अवलंबन न करता चुकीच्या मार्गाने जाऊ पाहणाऱ्या अशा रामाला–परशुरामाला या धनुष्याने (भीष्माच्या) धर्मपालनाचा धडा दिला.

येथे भार्गव परशुरामाच्या प्रभावापेक्षा वरचढ असा भीष्माचा प्रभाव होता हे जरी प्रतीत होत असले तरी त्या प्रतीयमान–अर्थाच्या साहाय्याने 'धर्म-पालनाचा धडा दिला' अशा शब्दांमध्ये प्रत्यक्षच केलेल्या कथनाद्वारे काव्यार्थ अलंकृत झालेला आहे.

म्हणूनच पर्यायाने म्हणजेच अन्यप्रकारे (प्रकारान्तराने) अवगमनरूपी व्यंग्याच्या द्वारा उपलक्षित होऊन जो अभिहित होत असतो (प्रत्यक्ष शब्दांमध्ये सांगितला जातो) तो अभिधीयमान म्हणजेच उक्त होत असल्याकारणाने

'पर्यायोक्त' या नावाने ओळखला जातो. अशा रीतीने पर्यायोक्त लक्षण–पद ठरते. त्याचप्रमाणे 'पर्यायोक्त' हे लक्ष्य–पद आहे.या पर्यायोक्ताला अर्थालंकारत्व व अलंकाराचे सामान्यलक्षण या सर्व गोष्टी लागू पडतात.

जर (भामहकृत) लक्षणातील 'अभिधीयते' या पदाचा अर्थ ओढूनताणून केलेल्या व्याख्यानाद्वारा 'प्राधान्याने प्रतीत होतो' (सुचविला जातो) असा केला आणि 'भ्रम धार्मिक' हे त्याचे उदाहरणही दिले तर मग पर्यायोक्ताचे अलंकारत्व नाहीसे होऊन आत्मत्वात त्याचे पर्यवसान होईल आणि अशा वेळी त्याची अलंकारांमध्ये गणना करता येणार नाही. त्याचे अन्य भेदही सांगावे लागतील. म्हणून ग्रंथकार म्हणतात :

'यदि प्राधान्येन व्यंग्यत्वं तद् भवतु नाम तस्य ध्वनौ अन्तर्भावः ।'

आत्म्याच्या ठायी अंतर्भाव झाल्यामुळे हा देखील आत्माच होईल, अलंकार राहणार नाही असा अर्थ समजावा.

'तत्र' या पदाचा अर्थ. ज्या स्वरूपात पर्यायोक्त अलंकार म्हणून विवक्षित आहे त्या स्वरूपात ध्वनी पर्यायोक्तात अंतर्भूत होऊ शकत नाही. आम्हाला तसा ध्वनी अभिप्रेतही नाही. कारण ध्वनी हा महाविषय असून, सर्वत्र असल्याकारणाने व्यापक असतो व अन्य सर्व काव्यतत्त्वांचा आधार असल्याने अंगी असतो. परंतु अलंकार तर अन्य (लौकिक कुंडलादी) अलंकारांप्रमाणे व्यापक नसतो. तसेच अंगीही नसतो कारण जे अलंकार्य असते त्याच्या तो आधीन असतो. पण जर व्यापकत्व व अंगित्व या दोहोंचा (पर्यायोक्त) अलंकाराच्या संबंधात स्वीकार केला आणि त्याच्या अलंकारत्वाचा त्याग केला तर मग ते आमच्याच मार्गाचे अवलंबन करतात असे होईल. (म्हणजेच ते ध्वनीलाच मान्यता देतात असे होईल.) फक्त 'पर्यायोक्त' हे नाव ते देतात ते असूयेपोटी. ही गोष्ट देखील (पर्यायोक्तातील व्यंग्यप्राधान्य) प्राचीन विद्वानांनी लक्षात घेतली नव्हती, ती आम्हीच प्रथम उघड केली हे दाखविण्यासाठी 'न पुनः पर्यायोक्ते...' हे वाक्य येते. भामहाला ज्या प्रकारचे पर्यायोक्ताचे स्वरूप संमत होते तेच स्वरूप उदाहरणाद्वारे दाखविले आहे. तेथे देखील व्यंग्याचे प्राधान्य नाही, कारण ते चारुत्वाचे कारण नाही. म्हणून त्याचे (भामहाचे) अनुसरण करून तत्सदृश दुसऱ्या उदाहरणाची कल्पना केली तरीदेखील तेथे व्यंग्याचे प्राधान्य सिद्ध होऊ शकत नाही अशी या विवेचनाची संगती जाणावी.

जर त्याचे (भामहाचे) उदाहरण बाजूला सारून 'भम धम्मिअ' हे उदाहरण दिले तर ते आमचेच शिष्य बनतात. अध्ययनाच्या रीतसर मार्गाचा अवलंब न करता, अपश्रवणाने म्हणजेच गुरूकडून प्रत्यक्ष श्रवण न करता, केवळ

स्वत:च्या मताने आत्मसंस्कार करणे हे अनार्यचेष्टित म्हणविले जाते. इतिहासकारांनी म्हटलेच आहे की–

गुरूची अवज्ञा करून शिष्य म्हणून गुरूसमीप न जाता–म्हणजेच एक प्रकारे लपून ऐकणारा (ज्ञान ग्रहण करणारा) नरकाला जातो.

भामहाने पर्यायोक्ताचे उदाहरण पुढीलप्रमाणे दिले आहे : स्वाध्याय केलेल्या विप्रांनी जे अन्न खाल्ले नाही ते आम्ही घरी किंवा प्रवासातही खात नसतो.

भगवान् वासुदेवाचे हे उद्‌गार पर्यायाने (एका वेगळ्या प्रकाराने) विषप्रयोगाचा निषेध (निराकरण) करणारे आहेत. कारण पुढे तेच असे म्हणतात की ही गोष्ट (आमचे असे करणे) विषप्रयोगनिवृत्तीसाठी आहे. याठिकाणी रसदाननिषेधरूपी व्यंग्यार्थाचे थोडेदेखील चारुत्व नाही ज्यामुळे त्याच्या प्राधान्याची शंका यावी. उलट या व्यंग्यार्थाने अधिक उपोद्‌बलित (प्रकृष्ट, पुष्ट) झालेले 'विप्रांनी भोजन केल्याशिवाय आम्ही अन्नग्रहण करीत नसतो' हे विधान उक्तप्रकाराने पर्यायोक्त होऊन प्रकरणप्राप्त अशा भोजनार्थाला अलंकृत करते. वक्त्याला या ठिकाणी, भोजन विषरहित असावे ही गोष्ट सांगावयाची नाही म्हणूनच व्यंग्य प्रधान न ठरता, हा पर्यायोक्त अलंकारच ठरतो असे प्राचीन विद्वानांना देखील मान्य होते असे या विवेचनाचे तात्पर्य जाणावे.

अपह्‌नुतिदीपकयो: म्हणजेच अपह्‌नुती व दीपक या दोन अलंकारांच्या बाबतीत. हा निर्णय पूर्वीच घेतलेला आहे. म्हणूनच 'प्रसिद्धम्' असे वाक्यात म्हटले आहे. प्रसिद्ध म्हणजे प्रतीत झालेले, किंवा साध्य केलेले किंवा प्रमाणाद्वारा सिद्ध केलेले असा अर्थ जाणावा. यापूर्वीच 'हे अलंकारद्वय उपमा आदी नामाभिधान धारण करण्यास ज्याप्रमाणे पात्रच होऊ शकत नाही' अशा तऱ्हेच्या दृष्टांताच्या स्वरूपात जरी सांगितले गेले असले तरी मूळ नामावलीतील क्रम (समासोक्ती, आक्षेप, अनुक्तनिमित्ता विशेषोक्ती, पर्यायोक्त, अपह्‌नुती, दीपक व संकर) पूर्ण व्हावा या हेतूने व ग्रंथशय्या–ग्रंथाचा आधार अधिक बळकट व्हावा या हेतूने पुन्हा एकदा 'व्यंग्यप्राधान्य नसल्याकारणाने ध्वनी होत नाही' असे म्हटले. प्रकार निराळा असला तरी विधान (वस्तु) मात्र एकच केले आहे. येथे व्यंग्य असल्याकारणाने उपमेच्याच ध्वनित्वाची (प्राधान्याची) शंका केली जाऊ शकते. **विवरणकारांनी 'दीपक अलंकाराचा** सर्वत्र उपमेशी संबंध नसतो' याची अनेक उदाहरणांनी चर्चा केली असली तरी निरुपयोगी, साररहित व सहज निराकरणीय आहे.

मदो जनयति प्रीतिं सानङ्गं मानभञ्जनम् ।
स प्रियासङ्गमोत्कण्ठां सासह्यां मनसः शुचिम् ॥

मद प्रीतीला उत्पन्न करतो, प्रीती मानभंग करणाऱ्या कामाला उत्पन्न करते, काम प्रियेच्या मीलनाच्या उत्कंठेला जन्म देतो व उत्कंठा असह्य अशी मानसिक पीडा उत्पन्न करते. येथे उत्तरोत्तर 'जन्यत्व' वर्णन केले असले तरी उपमानोपमेयभाव नसतो असे नव्हे. उदा.–

राम इव दशरथोऽभूद् दशरथ इव रघुरजोऽपि रघुसदृशः ।
अज इव दिलीपवंशश्चित्रं रामस्य कीर्तिरियम् ।।

रामासारखा दशरथ झाला, दशरथासारखा रघू, रघूसारखा अज, अजासारखा दिलीपाचा वंश, अशी रामाची कीर्ती आश्चर्यकारक आहे.

येथे उपमानोपमेयभाव नाही असे नाही. म्हणूनच क्रमिकत्व, किंवा समत्व किंवा प्राकरणिकत्व उपमेला बाध आणतात ही कोणती पीडा आहे ? म्हणूनच आता या गर्दभीदोहनाच्या पाठीमागे लागणे पुरे. संकर अलंकारात देखील

विरुद्धालंक्रियोल्लेखे समं तद्वृत्यसंभवे ।
एकस्य च ग्रहे न्यायदोषाभावे च सङ्करः ।।

विरुद्ध अलंकारांचा उल्लेख असताना व त्या अलंकारांचे एकत्र राहणे (समवस्थान) असंभव असताना तसेच एका कोणत्यातरी अलंकाराचे ग्रहण सांगणारा नियम (न्याय) किंवा एका कुणाचा त्याग सांगणारा दोष याविषयी कोणत्याही प्रमाणांचा अभाव असल्यामुळे 'संकर' अलंकार होतो.

या लक्षणानुसार संकराचा हा एक प्रकार. जसे माझ्याच काव्यकृतीचा उल्लेख–

चंद्रवदना, नीलोत्पलाप्रमाणे नेत्र असलेल्या व शुभ्र कुंदपुष्पाप्रमाणे दंतपंक्ती असलेल्या हिला ब्रह्मदेवाने आकाश, जल व पृथ्वीवरील सर्व संभवनीय हृद्य आकार एकत्र आणून बनविले आहे.

या पद्यात चंद्र आहे वदन जिचे किंवा चंद्राप्रमाणे आहे वदन जिचे असा रूपक व उपमा या दोहोंचा उल्लेख केलेला असल्याने आणि एकाचवेळी दोन्ही अलंकार असणे असंभव असल्याकारणाने, परंतु या दोहोंपैकी कोणत्यातरी एका पक्षाचा त्याग व ग्रहण याविषयी प्रमाण नसल्यामुळे, संकर होतो. अशा रीतीने व्यंग्य कोणते व वाच्य कोणते याचाच निश्चय होऊ शकत नसल्याने ध्वनीची शक्यताच कशी उद्भवू शकते ? (ध्वनी संभवतच नाही.)

शब्दालंकार व अर्थालंकार यांचे एकत्र अवस्थान सांगणारा जो दुसरा प्रकार आहे तेथेदेखील प्रतीयमान अर्थाची शंका कशी बरे येईल ? उदा. स्मर

स्मरमिव प्रियं रमयसे यमालिङ्गनात् या उदाहरणात यमक आहे आणि उपमाही आहे. (दोन्ही वाच्यच आहेत.)

आता तिसरा प्रकार – जेव्हा एका वाक्यांशात अनेक अर्थालंकार असतात तेव्हा तेथे देखील दोहोंच्या समानतेमुळे कोणाची व्यंग्यता राहणार ? उदाहरणार्थ–

सूर्य अस्ताला गेला असता दिवस देखील क्लांत होऊन राहण्याच्या उद्देशाने जणू काही अंधःकाररूपी गुहेत शिरतो आहे. बरोबरच आहे. दोघांचेही (सूर्य व दिवस) उदय व अस्त एकरूपच आहेत.

आपल्या स्वामीवर विपत्ती कोसळल्यामुळे त्या अवस्थेला अनुरूप असे व्रत ग्रहण करण्यास उद्युक्त झालेल्या कुलपुत्रकाचे (दिवसावरील) आरोपण या ठिकाणी एकदेशविवर्ती रूपक आहे हे दाखविते. उत्प्रेक्षा 'इव' या शब्दाने सांगितली आहे.

अशा रीतीने (संकराचे) दोन प्रकार सांगितले. ते पुढीलप्रमाणे–

शब्दवर्ती व अर्थवर्ती अलंकार जेव्हा एका वाक्यात राहतात, किंवा एका वाक्यांशात ज्यावेळी अनेक अलंकारांचा प्रवेश असतो तेव्हा तो अलंकार संकर या नावाने ओळखला जातो. (संकराचा) चौथा प्रकार म्हणजे जेथे अलंकारांमध्ये परस्पर अनुग्राह्य–अनुग्राहकभाव असतो. उदा.–

सोसाट्याच्या वाऱ्यात सापडलेल्या नीलकमलाहून मुळीही भिन्न नसलेले असे त्या विशालनेत्रांच्या पार्वतीचे–अधीर नेत्रकटाक्ष पाहिल्यानंतर असा प्रश्न पडला होता की ते कटाक्ष तिने मृगांगनांकडून घेतले की मृगांगनांनी ते तिच्याजवळून घेतले.

येथे तिच्या दृष्टिक्षेपांना मृगांगनांच्या दृष्टिक्षेपांची उपमा जरी व्यंग्य असली तरी वाच्य ससंदेह अलंकाराला ती उत्थान देणारी असल्यामुळे अनुग्राहक ठरते व त्यामुळे गुणीभूत म्हणावी लागते. त्यामुळे तिच्याद्वारा अनुग्राह्य असलेल्या संदेहातच पर्यवसान होते. म्हटलेच आहे की–

ज्याठिकाणी अलंकार हे परस्परांना उपकारक अशा स्वरूपात राहात असतात त्याठिकाणी त्यांना स्वतंत्ररूपात अस्तित्व नसते. त्यामुळे तेथेही संकरच होतो.

म्हणूनच 'यदा अलंकारो अलंकारान्तरच्छायाम्...' म्हटले आहे. अशा रीतीने संकराच्या चौथ्या प्रकारातदेखील ध्वनित्वाचे निराकरण झाले. मधल्या दोन प्रकारांमध्ये तर ध्वनीची शक्यताच नाही, हे सांगितले आहे. पहिल्या प्रकारात मात्र 'शशिवदना' या उदाहरणात कशीबशी ध्वनिसंभावना असू शकते अशी शंका आल्यामुळे ग्रंथकार त्याचे निराकरण करतात. समं प्राधान्यम्

या शब्दांच्या द्वारा. कारण दोन्हीही अलंकार आंदोल्यमान म्हणजे अस्थिर आहेत असा येथे भाव आहे.

येथे असा आक्षेप घेता येईल की ज्याठिकाणी व्यंग्यच प्राधान्याने प्रतीत होत असेल तेथे काय करावे ? उदा–

जे केवळ प्रसिद्धीलाच शरण जातात त्या दुष्टांना गुणांविषयी कोणतेच प्रेम नसते. चंद्रकांतमणी केवळ चंद्राला पाहूनच पाझरतो, प्रियतमेच्या मुखाला पाहून नव्हे.

या उदाहरणात अर्थान्तरन्यास वाच्यत्वाने शोभित होत आहे तर व्यतिरेक व अपह्नुती हे दोन अलंकार व्यंग्य स्वरूपात प्राधान्याने प्रकाशित होताहेत. या अभिप्रायाने आशंका प्रकट करताना ग्रंथकार म्हणतात–'अथ वाच्योपसर्जनीभावेन व्यङ्ग्यस्य तत्रावस्थानं...' आणि त्यावर असे उत्तर देतात की 'तदा सोऽपि ध्वनिविषयोऽस्तु...इत्यादी. हा संकरालंकारच नव्हे तर अलंकारध्वनी नामक ध्वनीचा द्वितीय प्रकार होतो. जे पर्यायोक्त अलंकाराच्या बाबतीत सांगितले ते सर्वत्र अनुसरावे. आता संकराच्या सर्वच प्रकारांमध्ये व्यंग्यार्थाच्या संभावनानिरासाचा सर्वसाधारण प्रकार सांगतात–'अपिच' या वाक्याने. 'सङ्करालङ्कारेऽपि क्वचिद्' या वाक्यात 'क्वचिदपि सङ्करालङ्कारे च' असा संबंध (अन्वय) जाणावा. संकराच्या सर्व भेदांनी भिन्न असलेला असा अर्थ घ्यावा. संकीर्णता म्हणजे मिश्रत्व म्हणजेच अनिश्चयाची अवस्था (लोलीभाव). अशावेळी त्याठिकाणी दूध व पाणी यांच्याप्रमाणे झालेल्या मिश्रणात एकाचेच प्राधान्य कसे बरे दाखविता येईल ?

(प्रस्तुत) प्रकरणाशी संबंधित नसलेल्या अशा अन्य वस्तूची जी स्तुती तिला अप्रस्तुतप्रशंसा असे म्हणतात. ती तीन प्रकारची सांगितली आहे. (भामह–३/२९).

प्रस्तुताचा आक्षेप करणारे अप्रस्तुताचे वर्णन असा (अप्रस्तुत-प्रशंसा या शब्दाचा) अर्थ आहे. हा आक्षेप सामान्यविशेषभाव निमित्त–निमित्तिभाव व सारूप्य या भेदांनी तीन प्रकारचा होतो. त्यापैकी पहिल्या दोन प्रकारांमध्ये प्रस्तुत व अप्रस्तुत या दोहोंचे प्राधान्य समानच असते अशी प्रतिज्ञा ग्रंथकार 'अप्रस्तुतप्रशंसायाम्'...पासून तर 'समभेव प्राधान्यम्' येथपर्यंतच्या भागात करतो. त्यापैकी सामान्यविशेषभावात देखील दोन प्रकार पडतात. अप्राकरणिक असे सामान्य जेव्हा प्रत्यक्ष शब्दांनी सांगितलेले असते व प्राकरणिक असा विशेष जेव्हा प्रतीयमान असतो तेव्हा तो एक प्रकार होतो. उदाहरणार्थ–'काय ही संसाराची निर्घृणता (क्रूरता), काय ही आपत्तींची दुष्टता, निसर्गतःच कुटिल

अशा दैवाच्या गतीचा खरोखरच अंत लागत नाही (ठाव लागणे कठीण असते.)

सर्वत्र सामान्यरूपाने आढळणाऱ्या दैवप्राधान्याचे केलेले वर्णन येथे अप्रस्तुत असून ते प्रस्तुत अशा कोणत्यातरी नष्ट झालेल्या विशेष वस्तूमध्ये पर्यवसित होते. तेथेदेखील विशेषांश हा सामान्याने व्याप्त असल्यामुळे त्या व्यंग्यविशेषाप्रमाणेच वाच्य अशा सामान्याचे देखील प्राधान्य सिद्ध होते, आणि सामान्य व विशेष यांचे एकावेळी प्राधान्य हे विरुद्ध समजले जात नाही. जेव्हा विशेष हा अप्राकरणिक असून सामान्य अशा प्राकरणिकाचा आक्षेप करतो तेव्हा दुसरा प्रकार होतो. उदाहरणार्थ–

कमलिनीच्या पत्रावर पडलेल्या जलकणाला तो मूर्ख मुळातच, किंवा सुरुवातीपासूनच (मुखत्) मुक्तामणी समजला यात काय मोठेसे ? यापेक्षाही अधिक ऐकून घे. अरे, (तो जलबिंदू) हातात घेत असताना, हळूच घडलेल्या अंगुलीच्या लहानशा हालचालीने विलीन झाला असता तेवढ्याने, 'अरेरे, कुठे उडून गेला ' असा अंतःकरणपूर्वक शोक करीत तो (मूर्ख) दररोज झोपत देखील नाही.

या श्लोकात अस्थानी महत्त्व देण्याची वृत्ती हे सामान्य प्रस्तुत आहे आणि जलबिंदूच्या ठिकाणी मण्याची (रत्नाची) संभावना हा विशेष अप्रस्तुत असून वाच्य आहे. तेथेदेखील सामान्य व विशेष यांच्या एकावेळी प्राधान्य असण्याला विरोध असू शकत नाही हे सांगितलेच आहे. अशा रीतीने 'यदा तावत्'...पासून तर 'विशेषस्यापि प्राधान्यम्' येथपर्यंत अप्रस्तुतप्रशंसेच्या एका प्रकाराचे दोन्हीही भेद विचारात घेतले आहेत.

हाच न्याय निमित्तनैमित्तिकभावाला लावून त्याचेदेखील दोन प्रकार दाखविले आहेत–निमित्तनिमित्तिभावे चायमेव न्यायः...इत्यादी वाक्यांनी.

काही ठिकाणी निमित्त हे अप्रस्तुत असून वाच्य असते व ते प्रस्तुत अशा नैमित्तिकांचा आक्षेप करते उदा–

ये यान्त्यभ्युदये प्रीतिं नोज्झन्ति व्यसनेषु च ।
ते बान्धवास्ते सुहृदो लोकः स्वार्थपरोऽपरः ॥

जे अभ्युदयाच्या काळात आनंदित होतात व विपत्काळी साथ सोडत नाहीत तेच खरे बांधव, तेच खरे मित्र. बाकीचे लोक केवळ स्वार्थापुरते (जवळ येतात) असतात.

येथे अप्रस्तुत असे सुहृद्बांधवरूपत्व हे निमित्त असून सज्जनांविषयी असलेल्या आसक्तीमुळे त्याचे प्रत्यक्ष वर्णन केले आहे. त्याचे प्रयोजन म्हणजे

'स्वतःला श्रद्धेय वाटणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे मान्य करणे' या प्रस्तुत अशा नैमित्तिकाची अभिव्यक्ती करणे हे होय.

येथे नैमित्तिकाच्या प्रतीतीनंतर सुद्धा (वाच्य) निमित्ताची प्रतीतीच अनुप्राणक असल्याने प्रधान ठरते म्हणून व्यंग्यव्यंजकांचे येथे प्राधान्य ठरत नाही.

काही वेळा अप्रस्तुत अशा नैमित्तिकाचे वर्णन केले जाते व त्यातून प्रस्तुत अशा निमित्ताची व्यंजना होते. उदाहरणार्थ सेतुबन्ध काव्यातील पुढील उदाहरण:

सग्गं अपारिजाअं कोत्थुअ लच्छिरहिअं महुमहस्स उरम् ।
सुमरामि महणपुरओ अमुद्धअन्दं च हरजढापब्भारम् ॥

'समुद्रमंथनाच्या पूर्वी असलेल्या पारिजातरहित स्वर्गाची, कौस्तुभ व लक्ष्मीरहित अशा मधुमथन विष्णूच्या उरःस्थलाची आणि मुग्धचंद्ररहित अशा शंकराच्या केशसंभाराची मला आठवण येते.' येथे जांबवान कौस्तुभ–लक्ष्मी-विरहित हरिवक्षःस्मरणादी अप्रस्तुत अशा नैमित्तिकांचे वर्णन करतो. (समुद्र-मंथनापूर्वीच्या स्थितीचे जांबवानाला स्मरण होते याचा अर्थ तेव्हापासून तो अमात्यपदी होता.) प्रयोजन म्हणजे त्याच्या मंत्री असण्यामागील उपादेय (संग्राह्य, अत्यावश्यक अशा) निमित्तभूत बनलेल्या दीर्घकालीन सेवा, चिरजीवित्व (दीर्घायुष्य), तसेच व्यवहारकौशल्य इत्यादी प्रस्तुताची अभिव्यक्ती करणे हे होय. येथे निमित्ताच्या प्रतीतीत देखील नैमित्तिक हे वाच्यभूत आहे. एवढेच नव्हे तर ते निमित्ताद्वारा अनुप्राणित असल्यामुळे स्वतःचा उद्धार करते म्हणून वाच्य आणि व्यंग्य या दोहोंचेही समप्राधान्य आहे.

अशा रीतीने प्रत्येकी द्विविध असलेल्या दोन्ही प्रकारांचे विवेचन करून 'सारूप्य' नामक तिसऱ्या प्रकाराचे आता परीक्षण करण्यात येत आहे. त्यात-देखील दोन प्रकार आहेत.

वाच्य अशा अप्रस्तुतामुळे चमत्कार उत्पन्न होतो व व्यंग्य मात्र वाच्योन्मुख असते. जसे आमचे उपाध्याय आचार्य भट्टेन्दुराज यांचे पुढील पद्य :

प्राणा येन समर्पितास्तव बलाद्येन त्वमुत्थापितः
स्कन्धे यस्य चिरे स्थितोऽसि विदधे यस्ते सपर्यामपि ।
तस्यास्य स्मितमात्रकेण जनयन्–प्राणापहारक्रियाम्
भ्रातः प्रत्युपकारिणां धुरि परं वेताल लीलायसे ॥

ज्याने तुझ्यासाठी प्राण समर्पित केले, ज्याने बलपूर्वक तुला वर उचलले, ज्याच्या खांद्यावर तू चिरकाल राहिला आहेस, व ज्याने तुझी पूजा देखील केली त्याच्या प्राणांचे अपहरण करण्याचे कार्य तू केवळ एका स्मिताच्याद्वारा केलेस

अशा हे बन्धो वेताळा ! प्रत्युपकार करणाऱ्यांच्या खांद्यावर आरूढ होऊन तू आनंदात लीला करतोस.

याठिकाणी जरी सारूप्याच्या आधाराने प्रस्तुत अशा एका दुसऱ्याच कृतघ्न व्यक्तीचा आक्षेप केला जातो तरीपण अप्रस्तुत अशा वेतालवृत्ताचेच येथे चमत्कारकारित्व आहे. चेतन सृष्टीच्या वाहेरच्या वस्तूच्या उपालंभाप्रमाणे हा उपालंभरूप अर्थ देखील अशक्य कोटीतील असल्याकारणाने हृद्य नाही असे नाही. म्हणून येथे वाच्यार्थाचे प्राधान्य सिद्ध होते. जर अत्यंत असंभाव्य अशा अचेतनादिकांच्या व तदर्थ प्रयुक्त केलेल्या विशेषणांच्या अप्रस्तुत अशा वर्णनातून प्रस्तुताचा आक्षेप केला जाऊन तोच चमत्कृतिजनक ठरला असता तर हा वस्तुध्वनी होय असे म्हणता आले असते. जसे माझेच हे पद्य पहा :

भावव्रात हठाज्जनस्य हृदयान्याक्रम्य यन्नर्तयन्
भङ्गीभिर्विविधाभिरात्महृदयं प्रच्छाद्य सङ्क्रीडसे ।
स त्वामाह जडं ततः सहृदयम्मन्यत्वदुश्शिक्षितो
मन्येऽमुष्य जडात्मतास्तुतिपदं त्वत्साम्यसम्भावनात् ॥

हे भावभावनांच्या समुदाया ! तू आग्रहाने लोकांच्या हृदयांवर आक्रमण करून त्यांना नाचवितोस. विविध तऱ्हांनी स्वतःचे हृदय झाकून क्रीडा करतोस. जो तुला जड म्हणतो तो स्वतः स्वतःला सहृदय समजतो. तो दुःशिक्षितच म्हणावा लागेल. मला असे वाटते की अशा या माणसाला 'जडात्म' म्हणणे म्हणजे त्याची स्तुतीच करणे होय. कारण त्याने पूर्वी तुला जड म्हटलेले असल्यामुळे त्याच 'जड' पदाचा प्रयोग त्याच्या बाबतीत करणे म्हणजे तुझ्या व त्या व्यक्तीच्या साम्याची संभावना (कल्पना) करणे होय, आणि ही त्या व्यक्तीची स्तुतीच केल्यासारखी आहे.

कोणी एक महापुरुष जरी वीतराग (विरक्त) असला आणि आपल्या गाढ अशा विवेकरूपी प्रकाशाने त्याने मोहरूपी तिमिरविस्ताराला (निष्कासित) नाहीसे केले असले तरीदेखील लोकांमध्ये (सामान्यजनांमध्ये वावरताना) मात्र स्वतःचे खरे स्वरूप लपवून एखाद्या संसारासक्त माणसाप्रमाणे वागतो व त्याद्वारा लोकांना टीकेस उद्युक्त करून स्वतःच्या ठायी अज्ञानाचा अंगीकार करतो आणि (ज्या लोकांसाठी तो हे सारे नाटक रचतो, सोंग घेतो) त्याच लोकांकडून 'मूर्ख' म्हणून त्याची अवज्ञा केली जाते. अशा त्या महापुरुषाचे लोकोत्तर चरित्र प्रस्तुत पद्यातून व्यंग्यरूपाने प्राधान्याने प्रकाशित केलेले आहे.

भावव्रात या संबोधनातील भाव म्हणजे उद्यान, चन्द्रोदय इत्यादी भाव (वस्तू किंवा घटना) 'जड' म्हणून लोकांकडून अपमानित केले जातात. खरे

तर या चंद्रोदयादी गोष्टी एखाद्या विरही व्यक्तीला उत्कंठा व चिंता यांनी अधिक व्यथित अंतःकरणाच्या बनवितात तर दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला त्याच गोष्टी आत्यंतिक हर्षाच्या आधीन बनवितात, याचाच अर्थ हा भावसमूह लोकांच्या मनात विकार उत्पन्न करून स्वतःच्या सामर्थ्याने त्यांना वाटेल तसे नाचवितो. परंतु तो कसा आहे या दृष्टीने त्याचे हृदय कोणीच समजून घेत नाही, उलट अत्यंत गंभीर, अत्यंत विदग्ध, गर्वहीन व अत्यंत क्रीडाचतुर अशा त्याची लोकांकडून त्याच कारणांमुळे जड म्हणून संभावना केली जाते. वास्तविक ती सारी त्याच्या विदग्धतेच्या संभावनेची निमित्त होऊ शकतात. ज्या कारणांमुळे स्वतःला जड समजावयास पाहिजे त्याच कारणांमुळे लोक स्वतःला सहृदे समजतात. तेव्हा अशा लोकांसाठी जर तो जड म्हणविला जात असेल तर मग 'अशा प्रकारच्या अतिविदग्ध भावसमूहाचे जाड्य प्रसिद्धच होय' अशी उक्ती उलट त्याची स्तुतीच ठरेल (निंदा नव्हे).

हा लोक (या संसारातील लोक) हे जडाहूनही अधिक पापी असतात असा अर्थ येथे ध्वनित केला जातो. (म्हणून हा अप्रस्तुतप्रशंसा अलंकार नसून वस्तुध्वनी होय.) म्हणूनच (वृत्तीत) 'यदा तु सारूप्यमात्रवशेनाप्रस्तुतप्रशंसायाम् अप्रकृतप्रकृतयोः सम्बन्धस्तदाप्यप्रस्तुतस्य स्वरूपस्य अभिधीयमानस्य प्राधान्ये-नाविवक्षायां ध्वनावेवान्तःपातः।' असे (आनंदवर्धनांनी) म्हटले. 'इतरथा तु अलङ्कारान्तरमेव।' या वाक्याचा अर्थ असा की उलट परिस्थितीत मात्र अलंकारान्तरत्व म्हणजे कोणतातरी विशेष अलंकार होईल, व्यंग्यार्थाचे प्राधान्य कोणत्याही परिस्थितीत राहणार नाही. अलंकारांचा नामनिर्देश करणाऱ्या वाक्यात (१३ व्या कारिकेवरील वृत्तीत) समासोक्त्याक्षेप...इत्यादी द्वंद्व समासात जे 'आदि' पदाचे ग्रहण केले आहे त्यामुळे ज्यात व्यंग्याशांचा प्रवेश संभवनीय आहे अशा व्याजस्तुती वगैरे अलंकारवर्गाची कल्पना केली गेली आहे. या सर्व अलंकारांच्या बाबतीत एकच सर्वसाधारण उत्तर दिले आहे– 'तदयमत्र संक्षेपः' – याद्वारा. हे एकच उत्तर देण्यामागील भाव हा आहे की श्लोकातील प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे कुठे कुठे लिहित बसणार? प्रतिपदसमालोचन केल्यास अंतच राहणार नाही.

त्यापैकी व्याजस्तुती पुढीलप्रमाणे–

दुसऱ्यांच्या घरात काय घडते याविषयी बातम्या काढून काय फायदा? पण मी गप्प बसणे शक्य नाही कारण दाक्षिणात्य मंडळींचा स्वभावच निसर्गतः बडबडा असतो. घराघरातून, बाजारातून, चौकांमधून व मद्यपानाच्या गोष्ठींमधून तुमची प्रिया कीर्ती ही जणू काही उन्मत्त झाल्याप्रमाणे फिरत असते.

या ठिकाणी व्यङ्ग्यार्थ स्तुतिपर असून त्याच्याद्वारा वाच्यार्थ उपकृत केल्या जात आहे.

कोणीतरी जे उदाहरण दिले आहे की–

हे स्वामी, ही पृथ्वी आधी तुझी पितामही झाली त्यानंतर ती तुझी माता बनली, आणि आता समुद्र आहे मेखला जिची अशी ती तुझ्या कुलाच्या वर्धनासाठी तुझी पत्नी बनली आहे, आणि जेव्हा शंभर वर्षे पूर्ण होतील तेव्हा तीच तुझी अनिंद्य अशी स्नुषा बनेल. समग्र नीतीच्या जाणकार समजल्या जाणाऱ्या नृपतींच्या कुळाला हे शोभून दिसते काय ?

ते अत्यंत असभ्य स्मृती उत्पन्न करण्यास कारणीभूत ठरत असल्याने आमच्या दृष्टीने ग्राम्य होय. यात स्तुती तरी अशी काय मोठी केली आहे ? तू वंशपरंपरेने राज्य करीत आहेस ही काय स्तुती झाली ? अशा तऱ्हेच्या व्याज-स्तुतीवर **सहृदयांच्या बैठकींमध्ये** टीका झाली असल्यामुळे तिच्याकडे दुर्लक्षच केले पाहिजे.

ज्याचा विकार स्वत: प्रतिबंधरहित असून देखील ज्या हेतूने त्या अभिप्रायाला तसेच त्याच्या प्रतिबंधाला व्यंजित करतो त्याला भाव असे म्हणतात, असे **रुद्रटाने** म्हटले आहे.

येथे देखील वाच्यप्राधान्य असताना भावालंकार होतो. ज्या विशिष्ट चित्तवृत्तीशी संबंधित असलेला वाग्व्यापारादी विकार प्रतिबंधरहित म्हणजेच नियत होऊन, त्या विशिष्ट चित्तवृत्तिरूपी अभिप्रायाला ज्या हेतूने ध्वनित करतो, तो हेतू म्हणजेच यथेष्टउपभोगयोग्यतारूपी अर्थ हा भावालंकार होय. उदाहरणार्थ–

एकाकिनी यदबला तरुणी तथाहमस्मिन् गृहे गृहपतिश्च गतो विदेशम् ।
कं याचसे तदिह वासमियं वराकी श्वश्रूर्ममान्धबधिरा ननु मूढ पान्थ ।।

या घरात मी एकाकी अबला अशी तरुणी राहते. माझा गृहपती विदेशी गेला आहे. हे मूढ पांथा ! तू आसरा कोणाला मागतोस ? ही माझी बिचारी सासू आंधळी व बहिरी आहे.

येथे व्यंग्यार्थ हा प्रत्येक पदाच्या अर्थाला उपकारक ठरत असल्यामुळे वाच्यार्थच प्रधान ठरतो. व्यंग्यार्थाचे प्राधान्य असल्यास मात्र कोणत्याही अलंकाराची शक्यता नसते हे अनेकदा सांगून झाले आहे. तेव्हा आता विस्तार पुरे.

संक्षेप श्लोकातील 'यत्र' या शब्दाचा अर्थ 'काव्यात' असा घ्यावा. अलंकृतय: या शब्दाविषयी असे म्हणता येईल की अलंकार असल्यामुळेच वाच्यार्थाला उपकारक ठरण्याचा धर्म त्यांच्या ठिकाणी येतो. प्रतिभामात्रे या

शब्दाचा अर्थ ज्या उपमा इत्यादींमध्ये म्लान किंवा अस्फुट व्यंग्यार्थाचीप्रतीती येते. वाच्यार्थानुगमे याचा अर्थ वाच्यार्थाशी **अनुगम** म्हणजेच **समप्राधान्य** – जसे अप्रस्तुत–प्रशंसा अलंकारात दिसते तसे. न प्रतीयते याचा अर्थ प्राधान्य स्फुटपणे प्रकाशित होत नाही (उठून दिसत नाही), तर ओढून–ताणून कल्पावे लागते. आणि तरीही ते हृदयाला भिडत नाही. जसे 'प्रार्थये तावत् प्रसीद' या श्लोकावरील दुसऱ्यांनी केलेल्या व्याख्यांमध्ये ही गोष्ट जाणवते.

म्हणून व्यंग्यार्थ असला तरीदेखील पुढील चार प्रकारांमध्ये 'ध्वनि-व्यवहार' संभवत नाही. (१) व्यंग्यार्थ अप्रधान असता. (२) व्यंग्यार्थाची प्रतीती म्लिष्ट (म्लान) असता. (३) व्यंग्यार्थाचे वाच्याशी समप्राधान्य असता. (४) व्यंग्यार्थाचे अस्फुटप्राधान्य असता.

मग हा ध्वनिव्यवहार कोठे संभवतो याचे उत्तर 'तत्परावेव' याद्वारा दिले आहे. संकरोज्झित: म्हणजेच संकराची अर्थात अन्य अलंकारात अनुप्रवेश होण्याची संभावना ज्यात त्याज्य मानली जाते तो ध्वनीचा विषय होय. येथे संकरअलंकाराद्वारा असा अर्थ घेणे चूक होईल. (कारण येथे संकर शब्दाचा अर्थ अन्य अलंकारांशी ध्वनीची सरमिसळ असा अभिप्रेत आहे.) संकर हा अन्य अलंकारांचे उपलक्षण मानल्यास अर्थ मात्र क्लिष्ट होईल – लवकर लक्षात येणे कठीण होईल.

ध्वनीचा अंतर्भाव अन्यत्र कुठेही होऊ शकत नाही. कारण परस्परांच्या विरुद्ध अशा अनुक्रमे वाच्यवाचकभावाचा व व्यंग्यव्यंजकभावाचा आश्रय घेत असल्याकारणाने अलंकार व ध्वनी यांचे तादात्म्य संभवत नाही, एवढेच नाही तर अंगिरूप ध्वनी व अंगरूप अलंकार या दोहोंमध्ये स्वामी–सेवकांप्रमाणेही विरोध असतो असाही अर्थ आहे. 'अवयव' या शब्दाचा अर्थ प्रत्येक असा घ्यावा. हीच गोष्ट 'पृथग्भूत' ह्या शब्दाने सांगितली आहे. पृथग्भूत असल्यास तादात्म्य (अंतर्भाव) होऊ नये (हे आम्हालाही पटते) पण समुदायामध्ये समाविष्ट झालेल्याचे तादात्म्य का होऊ नये अशी शंका कुणी काढल्यास त्याला उद्देशूनच 'अपृथग्भावे तु तदङ्गत्वं तस्य' हे वाक्य ग्रंथकार उच्चारतात.

तरीपण (समुदायाचा विचार केला असता) तो एकच समुदाय नसतो. इतरही 'समुदायी' तत्त्वे तेथे असतात आणि त्या समुदायींमध्ये प्रतीयमानदेखील असते. ते प्रधान असल्याकारणाने अलंकाररूप नसते. जे अलंकाररूप असते ते अप्रधान (तत्त्व) असल्याकारणाने 'ध्वनी' नसते. म्हणूनच 'न तु तत्त्वमेव' असे ग्रंथकार म्हणतात. 'ध्वनी' आणि 'आत्मा' ह्या दोन संज्ञा एखाद्या अलंकारालाच प्रधानतेचा अभिषेक करून तुम्ही योजल्या असाव्यात असा आक्षेप घेतला जाऊ शकतो हे जाणून ग्रंथकार (वृत्तीत) म्हणतात–जेथे कोठे ध्वनी व अलंकार ह्यांचे

'तादात्म्य' (तत्त्व) असेल तेथे देखील ध्वनी हा महाविषय असल्याकारणाने तो अलंकारनिष्ठ–म्हणजेच अलंकारांमध्ये अंतर्भूत होऊ शकत नाही. (यत्रापि वा तत्त्वं तत्रापि ध्वनेर्महाविषयत्वान्न, तन्निष्ठत्वमेव)

समासोक्ती आदी अलंकारांमधीलच एक अलंकार या नात्याने अशा स्वरूपात काही हा ध्वनी आम्ही मानलेला नाही. कारण समासोक्तिविरहित ठिकाणी देखील त्याचे (ध्वनीचे) अस्तित्व असते. समासोक्ती आदी अलंकारांच्या स्वरूपाचा संपूर्ण अभाव असतानादेखील ध्वनी दाखविला आहे–अत्ता एत्थ, किंवा कस्य वा ण–इत्यादी ठिकाणी. म्हणून 'न तन्निष्ठत्वमेव' असे म्हटले.

'विद्वदुपज्ञा' या शब्दाचा अर्थ. विद्वज्जनांकडून प्रथम उपक्रम जिचा झाला अशी उक्ती असा येथे बहुव्रीही समास होतो. त्यामुळे 'उपज्ञोपक्रमं तद् आद्याचिख्यासायाम्' (पा. सू. २–४–२१) या सूत्रानुसार तत्पुरुष समासात होणारे नपुंसकलिंग या ठिकाणी निरवकाश–अनावश्यक ठरते.

श्रूयमाणेषु या शब्दाचा अर्थ–श्रोत्रशष्कुलीवर एकसारख्या येऊन पडणाऱ्या शब्दांपैकी अंत्य शब्द ऐकू येतात या प्रक्रियेत शब्दातून उत्पन्न झालेले शब्द म्हणजेच नाद (शब्दज शब्द) 'श्रूयमाण' या शब्दाने सांगितले आहेत. त्यांचे स्वरूप घंटानादाच्या अनुरणनासारखे असते. तेच 'ध्वनी' या शब्दाने ओळखले जातात. जसे भगवान भर्तृहरी म्हणतात–

जो संयोग आणि वियोग यांच्याद्वारा आणि जिह्वा आदी (करणांच्या) इंद्रियांच्याद्वारा उत्पन्न होतो तो स्फोट होय, व शब्दज शब्द म्हणजे ध्वनी होत, असे काहींनी म्हटले आहे.

अशा रीतीने घंटा आदींच्या प्रतिध्वनींप्रमाणे अनुरणनस्वरूपात ज्याचे स्वरूप उपलक्षित होतो तो **व्यंग्यार्थदेखील 'ध्वनि'** शब्दाने सांगितला जातो. आणि त्याचप्रमाणे 'नाद' शब्दाने ओळखले जाणारे व शब्दातील अंत्य वर्णाच्या श्रवणानंतर उत्पन्न होणाऱ्या बुद्धीने निर्धारित केल्या जाणाऱ्या स्फोटाचे **अभिव्यंजक** असलेले जे श्रूयमाण **वर्ण** ते देखील 'ध्वनि' शब्दाने सांगितले जातात. जसे तेच भगवान् भर्तृहरी म्हणतातच–"ज्यांचे स्वरूप सांगणे अशक्य असते व जे स्फोटाचे ग्रहण करण्यास अनुकूल (आवश्यक) असतात अशा प्रत्ययांच्या द्वारा, ध्वनिद्वारा प्रकाशित केल्या जाणाऱ्या शब्दांच्या ठिकाणी स्फोटाचे स्वरूप समजून घेतले जाते."

(अव्यक्त असे स्फोटरूप व व्यक्त असे ध्वनी (मानवी कंठातून उत्पन्न होणारे वर्णरूप ध्वनी) या दोहोंमध्ये भर्तृहरीच्या मते 'प्रत्यय' असतात. त्या प्रत्ययांचे स्वरूप सांगता येत नाही परंतु स्फोट–ग्रहणासाठी ते अत्यंत आवश्यक

असतात. त्यांचे **व्यक्तीकरण वर्णरूप** ध्वनींच्या द्वारा होते. त्या ध्वनींच्या द्वारा प्रकाशित शब्दांमध्ये आपण स्फोटाचे अवधारण करीत असतो. म्हणजेच हे वर्णध्वनी स्फोटाचे व्यंजक होत.) यामुळे येथे (या संदर्भात) शब्द आणि अर्थ हे दोन्हीही **व्यंजक** असून ते ध्वनी या शब्दाने सांगितले जातात. किंबहुना वर्णांच्या बाबतीत तितकीच परिमाणे दिसून येत असताना देखील (म्हणजेच वर्ण ज्या स्वरूपात किंवा ज्या प्रमाणात–ज्या यत्नांनी उच्चारले जातात त्या प्रमाणांमध्ये किंवा यत्नांमध्ये उच्चारणाप्रमाणे फरक पडत असला तरी त्यांचे स्फोटाभिव्यंजकत्व नाहीसे होत नाही. जसे म्हटलेच आहे की–

थोड्यादेखील प्रयत्नांनी उच्चारण केल्या गेलेल्या ध्वनीचे ग्रहण बुद्धी एकतर मुळीच करीत नाही किंवा संपूर्ण स्पष्ट रूपात करते.

प्रत्यक्ष श्रूयमाण स्वरूपाचे वर्ण तेवढेच असले तरी वक्त्याचा जो अन्य असा द्रुत–विलम्बित इत्यादी भिन्न वृत्तींनी युक्त असलेला, नेहमीच्या उच्चारणव्यापाराहून अतिरिक्त किंवा अधिक असा जो व्यापार घडतो त्याला ध्वनी असे म्हणतात. जसे त्यांनीच (भर्तृहरीनेच) म्हटले आहे–

शब्दाची अभिव्यक्ती झाल्यानंतर वृत्तिभेदामुळे वैकृत ध्वनी अधिक स्पष्ट होतात, पण त्यामुळे स्फोटरूपी आत्म्याच्या ठिकाणी कोणताही फरक पडत नाही.

आम्हीदेखील प्रसिद्ध अशा अभिधा, तात्पर्य व लक्षणा या व्यापारांहून अतिरिक्त असलेला व्यापार म्हणजे ध्वनी होय असे म्हटले. अशा रीतीने व्यंग्यार्थ, व्यंजक शब्द, व्यंजक अर्थ (वाच्यार्थ) आणि व्यंजनाव्यापार हे चारही '**ध्वनी**' ठरतात. या चारीच्या योगाने समस्त काव्यदेखील 'ध्वनी' ठरते. त्यामुळे भेद व अभेद दोहोंचा व्यपदेश (उच्चारण) योग्य नव्हे असे नाही. (काव्यस्यात्मा ध्वनिः हा भेदव्यपदेश व काव्यं ध्वनिः हा अभेदव्यपदेश हे दोन्ही उल्लेख होणे शास्त्रदृष्टचा आवश्यक आहे.) 'वाच्यवाचक–संमिश्रः' हा 'वाच्यवाचकसहितः संमिश्रः' असा मध्यमपदलोपी समास समजावा. 'गाम् अश्वं पुरुषं पशुम्' या वाक्याप्रमाणेच चकाराच्या अभावी देखील येथे (ध्वनीत) समुच्चय (चार तत्त्वांचा) झाला आहे. त्यामुळे वाच्यही ध्वनी, वाचक शब्दही ध्वनी, या दोहोंचे व्यंजकत्व 'ध्वनतीति ध्वनिः' ही व्युत्पत्ती लक्षात घेऊन सिद्ध करता येते, आणि ध्वन्यते इति ध्वनिः ही व्युत्पत्ती लक्षात घेऊन विभाव–अनुभावांच्या **संवलनेने** (संमेलनाने) संमिश्रित केला जाणारा व्यंग्यार्थ देखील ध्वनी म्हणविला जातो.

शब्द म्हणजेच **शब्दन** म्हणजेच शब्द व्यापार. हा अभिधा आदिरूप नसतो तर आत्मस्थानीय असा व्यापार असतो. तो देखील ध्वनन या अर्थी ध्वनी म्हणविला

जातो. काव्य या नावाने ओळखला जाणारा जो अर्थ तो देखील ध्वनीच होय. कारण वर सांगितलेल्या ध्वनिचतुष्टयानेच काव्य होत असते. म्हणूनच (वृत्तीत) 'व्यंजकत्वसाम्यामुळे' असा साधारण हेतू (व्याकरण व काव्य या दोहोंना लागू पडणारा) दिला आहे.

व्यंग्यव्यंजकभाव हा सर्वच पक्षांमध्ये सामान्यरूपाने साधारण असतो असा अर्थ आहे.

'वाग्विकल्पानाम् आनन्त्यात्' असे जे अभाववाद्यांच्या तिसऱ्या विकल्पात म्हटले आहे त्याचा येथे पुढीलप्रमाणे परिहार करतात, 'न च एवंविधस्येति...'या वाक्याद्वारा. (एवंविध म्हणजेच आतापर्यंत विवेचिलेल्या व पुढे येऊ घातलेल्या ध्वनिप्रकारांच्या विवेचनाचा विचार करता, ध्वनी हा काही वाग्विकल्पाच्या म्हणजेच अलंकाराच्या पातळीचा नाही हेच येथे ग्रंथकर्त्यांना प्रतिपादन करावयाचे आहे.) ध्वनीचे पुढे सांगितले जावयाचे भेद म्हणजेच ध्वनीची मुख्य दोन रूपे. त्यांचे भेद म्हणजे–अर्थान्तरसंक्रमितवाच्य व अत्यंततिरस्कृतवाच्य हे अविवक्षित-वाच्याचे तर असंलक्ष्यक्रमव्यंग्य व संलक्ष्यक्रमव्यंग्य हे विवक्षितान्यपरवाच्याचे.

त्यातही अवान्तर–भेद आहेत. 'महाविषय' या शब्दाचा अर्थ संपूर्ण लक्ष्याला व्यापणारा असा होतो. 'अलंकारविशेष' यातील 'विशेष' ग्रहणाद्वारा अलंकारांची अव्यापकता दाखवावयाची आहे. 'मात्र' या शब्दाने अंगित्वाचा अभाव दाखविला आहे. ध्वनिस्वरूपाच्या ठिकाणी भावित–म्हणजेच प्रकर्षाने विहित झालेले आहे चित्त ज्यांचे अथवा चमत्कारस्वरूप अशा ध्वनीने भावित (तद्भावित–तत्र किंवा तेन) म्हणजेच प्रभावित झालेले आहे आणि म्हणूनच मुकुलितलोचनत्वादीसारख्या विकारांचे कारण बनलेले आहे चित्त ज्यांचे. 'अभाववादी' म्हणजेच अवान्तर तीन प्रकारांमध्ये ज्यांचे विभाजन झाले आहे असे असले तरीदेखील (खंडित केले गेले.).

त्यांचे म्हणजेच अभाववाद्यांचे खंडन करण्याचे फळ काय? ते आता सांगतात. 'अस्ति ध्वनिः'...या वाक्याद्वारा. उदाहरणे (उक्त ध्वनिप्रकारांची अर्थात अविवक्षितवाच्य व विवक्षितान्यपरवाच्य यांची) दिल्यानंतर ध्वनी हा भाक्त होय असे म्हणणाऱ्या पक्षाच्या शंका आणि त्या पक्षाचा परिहार सहजतेने होऊ शकतो या अभिप्रायाने त्यांची उदाहरणे देण्यास अवकाश मिळावा म्हणून, भाक्तत्व व अलक्षणीयत्व (अनिर्वचनीयता) हे दोन्ही पक्ष प्रथम परिहार करण्यायोग्य असले तरी त्यांचे प्रतिसमाधान न करता पुढे येणाऱ्या उद्योताचा अनुवाद म्हणून, अनुवादरूपाने पुढील उद्योतात पुनरुच्चार व्हावा म्हणून वृत्तिकार स्वतःच ध्वनिप्रभेदनिरूपण करतात.

येन, यत्र, यतो, यस्य व **यस्मै** या अशा पाचही प्रकारच्या बहुव्रीही समासाच्या अर्थाच्या आश्रयाने ध्वनी या शब्दाचा पाच प्रकारचा अर्थ करण्यासाठी म्हणून त्याचे (समासविग्रहाचे) ध्वनिः या प्रथमान्त शब्दाशी (ध्वनी या विशेष्याशी) सामानाधिकरण्य सहज योजता येईल.

ध्वनी हा शब्द वाच्यार्थ या अर्थी मानल्यास वाच्य शब्द स्वात्मा या अर्थी घेतला जातो. त्यामुळे ज्याने अविवक्षित म्हणजेच अप्रधान केले आहे स्वात्म्याला म्हणजेच स्वतःला, तो अविवक्षितवाच्यार्थ म्हणजेच **व्यंजक असा अर्थ.** (म्हणजेच ध्वनतीति ध्वनिः). अशाच रीतीने विवक्षितान्यपरवाच्याचा देखील अर्थ करता येईल, किंवा जर कर्मधारयाच्या द्वारा अर्थ करावयाचा असेल तर अविवक्षित असून जो वाच्यही आहे आणि विवक्षितान्यपर असून जो वाच्यही आहे असे विग्रह होतील. येथे अर्थ हा काही सुसंगत किंवा उपपन्न न होणे इत्यादी निमित्ताने अविवक्षित होत असतो तर काही वेळा वाच्यार्थ हा उपपन्न असल्याकारणाने विवक्षितच (वक्त्याला अभिप्रेत) असतो. परंतु व्यंग्यापर्यंत प्रतीती आपल्या सौभाग्यमहिम्याने करीत असतो. म्हणूनच या प्रकारात म्हणजेच विवक्षितान्यपरवाच्यध्वनीत वाच्यार्थच प्राधान्याने व्यंजक असतो (कारण तो विवक्षित असतो.). तर पूर्वीच्या प्रकारात म्हणजे अविवक्षितवाच्यध्वनीत शब्द प्राधान्याने व्यंजक असतो (कारण अर्थ (म्हणजेच वाच्यार्थ) हा तेथे विवक्षित नसतो). या ठिकाणी असा आक्षेप घेण्यात येतो की वाच्यार्थाची विवक्षा असणे आणि त्याचवेळी त्याचे अन्यपरत्व असणे या दोन गोष्टी परस्पर विरुद्ध वाटतात. यावर अभिनवगुप्त प्रश्नरूपानेच उत्तर देतात की अन्यपर म्हणूनच जर वाच्यार्थ विवक्षित असेल तर विरोध कसा काय उत्पन्न होईल ? म्हणजेच वाच्यार्थासमवेत अन्यार्थाचीही प्रतीती एखाद्या शब्दापासून आली तर त्यात विरोध कसा काय येऊ शकेल ? वृत्तीतील 'सामान्येन' हा शब्द घेऊ या. वस्तू, अलंकार व रस या तीन स्वरूपांमुळे ध्वनी हा तीन प्रकारचा असला तरी वरील दोन प्रकारांद्वारा म्हणजेच अविवक्षितवाच्य व विवक्षितान्यपरवाच्य यांच्याद्वारा तो संगृहित केला जातो. यावर पुन्हा असा आक्षेप घेतला जाऊ शकतो की जुनी नावे (वस्तू, अलंकार व रस) असताना त्यांच्या पाठीवर नव्या नावांचा समावेश करण्याचा उद्देश काय ? यावर उत्तर देतात—या दोन नावांमुळे ध्वनन नामक व्यापारात पूर्वप्रसिद्ध अशा अभिधा, तात्पर्य व लक्षणा या तीन व्यापारांच्या द्वारा अवगत झालेल्या अर्थप्रतीतीचे 'प्रतिपत्तृ'च्या (म्हणजेच श्रोत्याच्या) ठिकाणी राहणाऱ्या व 'प्रयोक्ता' म्हणजे वक्त्याच्या ठिकाणी अभिप्रायरूप असलेल्या विवक्षेशी सहकारित्व (अतिरिक्त रूपाने) सांगितले आहे. अशारीतीने या दोन नावांनी ध्वनीचे स्वरूपच प्रत्युज्जीवित केले आहे.

त्यातील पहिल्या प्रकाराचे उदाहरण 'सुवर्णपुष्पाम्' हा श्लोक 'जिला सुवर्णाची फुले लागतात ती सुवर्णपुष्पा. या वाक्याचा वाच्यार्थ हाच मुळी असंभवनीय असल्याकारणाने हा प्रकार अविवक्षितवाच्य हा होय. ह्या वाक्यापासून पदार्थ (स्वतंत्र पदांचे अर्थ अभिधेने) सांगून, तात्पर्यशक्तीने त्यातील अन्वयाचा बोध करून देऊन, नंतर त्या अर्थाच्या ठिकाणी बाधा उत्पन्न होत असल्याकारणाने त्याचा त्याग करून, तद्सादृश्यावरून सुलभतेने समृद्धीच्या संभाराला पात्र होणे हा अर्थ लक्षित केला आहे. शूर व कृतविद्य अशा सेवकांची प्रशंसा हे या लक्षणेचे प्रयोजन असून ते शब्दवाच्य नाही. त्यामुळे आवृत (आच्छादित, लपलेले) अशा स्वरूपाचे असून नायिकाकुचकलशयुगलाप्रमाणे अतिशय मौल्यवान (महत्त्वाचे प्रयोजन) असून ध्वनित होते. याठिकाणी शब्द हा प्राधान्याने व्यंजक असून अर्थ मात्र त्याचा सहकारी म्हणून व्यंजक ठरतो. अशा रीतीने येथे एकूण चार व्यापार संभवतात.

'शिखरिणि क्व नु नाम' हा श्लोक. श्रीपर्वतादींसारखी स्थाने निर्विघ्न व उत्तम सिद्धीसाठी प्रसिद्ध असली तरी ही सिद्धी (विवक्षितफलप्राप्तीची) देऊ शकत नाहीत, असे सांगतो. दिव्य अशी सहस्रकल्पे हा याठिकाणी अभिप्रेत असलेला परिमित काल आहे. अशा तऱ्हेचे उत्तमफल निर्माण करण्यासाठी पंचाग्नी प्रभृती तपे समर्थ झालीत हे अजूनपर्यंत ऐकिवात नाही. 'तवाधरपाटलम्' यात 'तव' हे भिन्न पद म्हणजेच (विगृहित पद) वापरले आहे. ते जर समासात आले असते तर त्याची विगलित प्रतीती आली असती. म्हणजेच सामासिक पदात विरून गेल्यामुळे (समर्पित झाल्यामुळे) प्राधान्याने प्रतीती आली असती. येथे 'तव दशति' हा मुख्य अभिप्राय आहे. म्हणजेच 'तव' या पदाचा प्रत्यक्ष संबंध 'दशति' या पदाशी यावा अर्थात दशन-क्रियेशी यावा हा कवीच्या मनातील अभिप्राय आहे. त्यामुळे वृत्तानुरोधाने म्हणजेच वृत्ताच्या सोयीसाठी 'त्वदधरपाटलम्' असे केले नाही असे जे म्हटले जाते ते योग्य नव्हे. 'दशति' या पदाचा अर्थ 'अविच्छिन्नप्रबन्धतया आस्वादयति' असा आहे. म्हणजेच अखंड रूपाने आस्वाद घेतो असा आहे. खादाड माणसाप्रमाणे खूप खात नाही तर तो रसज्ञ आहे हे येथे दाखवावयाचे आहे. त्यामुळे त्या फलप्राप्तीप्रमाणेच प्राप्त करण्याची रसज्ञता देखील तपःप्रभावानेच आहे असा अर्थ होतो. 'शुकशावक' याचा अर्थ– तारुण्यामुळे उचित फललाभ हा देखील तपश्चर्येमुळेच आहे. अनुरागी व्यक्तीच्या प्रच्छन्न (गूढ) अशा स्वाभिप्रायाचे कथन हे विदग्धता (चातुर्य) आणि अनुनयाची विशिष्ट पद्धती (चाटुविरचना) यांनी युक्त असल्यामुळे होणारे विभावांचे उद्दीपन हे येथे व्यंग्य आहे.

या उदाहरणात (या ध्वनीत) तीनच व्यापार आहेत. अभिधा, तात्पर्य व ध्वनन. मुख्यार्थबाधादिकांचा अभाव असल्यामुळे मध्यम कक्ष्येतील तिसऱ्या वृत्तीचा म्हणजेच लक्षणेचा अभाव आहे. किंवा जर त्या तरुणाने त्या सुंदर तरुणीला अकस्मात विचारलेल्या या विशिष्ट प्रश्नाच्या अर्थाची संगती न लागल्यामुळे मुख्यार्थबाधाची कल्पना केल्यावर सादृश्याने मधे लक्षणा होऊ शकते. परंतु तिचे प्रयोजन व्यंग्यच राहील व ते चतुर्थकक्ष्यानिविष्ट राहील. केवळ पूर्वीच्या 'सुवर्णपुष्पाम्' या उदाहरणात लक्षणा हीच ध्वननव्यापाराची प्राधान्याने सहकारी आहे. या उदाहरणात मात्र अभिधा व तात्पर्यशक्ती ह्या ध्वनीला प्राधान्याने सहकारी आहेत. खरे तर वाक्यसौंदर्याच्या द्वारा म्हणजे वाच्यार्थाच्या सौंदर्यामुळेच व्यंग्यार्थाची प्रतिपत्ती या उदाहरणात येत असल्यामुळे केवल अल्पमात्रेत लक्षणा व्यापाराचा देखील उपयोग होतो असे म्हटले आहे. परंतु असंलक्ष्यक्रमव्यंग्यध्वनीत मात्र लक्षणा उन्मेषमात्राने देखील नसते. त्या प्रकारात क्रमच लक्षात येत नाही हे कारण आम्ही पुढे सांगणारच आहोत. त्यामुळे द्वितीय भेदात म्हणजेच विवक्षितान्यपरवाच्यात देखील चारच व्यापार आहेत असे ठरते.

कारिका १४

भक्त्या बिभर्ति नैकत्वं रूपभेदादयं ध्वनिः ।
अतिव्याप्तेरथाव्याप्तेर्न चासौ लक्ष्यते तया ॥

म्हणूनच दोन्हीही ध्वनींची उदाहरणे दिल्यानंतर 'भाक्तमाहुः' याद्वारा ध्वनिविरोधी पक्षाचे (भाक्तवाद्यांचे) खंडन करतात. त्यातील भाव असा– भक्ती आणि ध्वनी या दोन गोष्टी परस्पर पर्यायांप्रमाणे अभिन्न समजावयाच्या का ? किंवा अन्य सर्व पदार्थांहून आणि द्रव्यांहून व्यावर्तन करणारा पृथिवित्व हा धर्म ज्याप्रमाणे पृथिवीचे लक्षण असते त्याप्रमाणे भक्ती हे ध्वनीचे लक्षण मानावयाचे काय ? की देवदत्ताच्या घरावर बसलेला कावळा हा ज्याप्रमाणे तेथे असतो म्हणून म्हणजे संभवमात्राने उपलक्षण ठरतो तशी भक्ती ही ध्वनीचे उपलक्षण मानावयाचे काय ? यापैकी 'भक्त्या बिभर्ति...' याद्वारा पहिल्या पक्षाचे निराकरण करतात.

या कारिकेच्या वृत्तीत आलेला 'उक्तप्रकारः ध्वनिः' हा शब्द पाच अर्थांसाठी योजावा– (१) शब्द (२) अर्थ (३) व्यापार (४) व्यंग्य व (५) या साऱ्यांचा समुदाय. रूपभेद दाखविण्यासाठी आधी ध्वनीचे रूप सांगतात. ते 'वाच्यव्यतिरिक्तस्य अर्थस्य वाच्यवाचकाभ्यां तात्पर्येण प्रकाशनम्' या

वाक्यांशाने. 'तात्पर्याने' याचा अर्थ असा की कवीच्या अभिप्रायाची विश्रांती ज्याच्या ठिकाणी होते असा व्यंग्यार्थ असल्याकारणाने त्याची अभिव्यक्ती हेच **प्रयोजन** म्हणजे तात्पर्य असते. प्रकाशन म्हणजे द्योतन. 'उपचारमात्रम्' यातील उपचार शब्दाचा अर्थ गुणवृत्ती म्हणजेच लक्षणा. उपचरण म्हणजे अतिशयित व्यवहार.

'उपचारमात्रम्' यातील मात्र शब्दाने ग्रंथकारांना हे सांगावयाचे आहे की तृतीय स्थानी असलेल्या लक्षणा व्यापाराहून अन्य असा प्रयोजन–द्योतनरूपी चतुर्थ व्यापार वस्तुस्थितीने संभवत असला तरी उपचारात त्या व्यापाराचा काही उपयोग नसल्यामुळे 'आद्रियमाण' म्हणजेच महत्त्वाचा नसतो आणि म्हणूनच असूनही नसल्यासारखाच असतो. 'यमर्थमधिकृत्य प्रवर्तते तत्प्रयोजनम्' हे प्रयोजनाचे लक्षण होय. ध्वनी जेथे आवश्यक नसतो, अशाही ठिकाणी लक्षणा राहाते त्यामुळे ध्वनन व लक्षणा ही दोन्ही एकच तत्त्वे होत हे कसे बरे शक्य होईल ?

आता दुसऱ्या म्हणजे लक्षण–पक्षाचे खंडन करतात. अतिव्याप्तेरथाव्याप्तेर्न चासौ लक्ष्यते तया या द्वारा. 'असौ' म्हणजे ध्वनी. 'तया' म्हणजे भक्तीच्या म्हणजेच लक्षणेच्या द्वारा. परंतु लक्षणेत जर ध्वनन आवश्यक असेल तर लक्षणेचा विषय ध्वनिव्यतिरिक्त राहू शकतो हे कसे ? यावर उत्तर देतात की व्यंग्यार्थाने निर्माण केलेले असे फार मोठे सौंदर्य तेथे नसते त्यामुळेच व्यंग्य प्रयोजन हे विशेष आदरार्ह ठरत नाही, व व्यंजकत्वाने कोणतेही कार्य सिद्ध होत नाही– असा भाव आहे. 'महत्' या शब्दाच्या ग्रहणामुळे लक्षणेतील व्यंजकत्व हे गौण ठरते. जसे–अन्य धर्मांचा अन्य कुठे तरी आरोप 'समाधि' नामक अलंकार म्हणविला जातो असे म्हटले आहेच. मग प्रयोजन नसताना तसा (लाक्षणिक) प्रयोग करतातच का ? असे कोणी विचारल्यास 'प्रसिद्धीच्या अनुरोधाने' असे म्हटले आहे. म्हणजेच परंपरेने तसा प्रयोग होत असल्यामुळे. आम्ही तर असे म्हणतो की प्रसिद्धी म्हणजे प्रयोजनाची अनिगूढता. (म्हणजेच प्रयोजन हे अतिशय स्पष्ट किंवा उघड असणे, (आणि 'ध्वनिरूपतेसाठी तर निगूढता आवश्यक असते). उत्तान म्हणजेच अतिशय उघड स्वरूपात प्रयोजन प्रकाशित होत असले तरी ते एखाद्या गुप्तधनाच्या खजिन्याप्रमाणे निगूढतेची अपेक्षा करीत असते. 'वदति बिसिनीपत्रशयनम्' या उदाहरणातील उपचारात म्हणजेच वदति या लाक्षणिक प्रयोगात स्फुटीकरण (तिचा संताप स्पष्ट करणे) हा अर्थ जाणवावा हे प्रयोजन आहे. गूढ नसलेला अर्थ स्वशब्दाच्या द्वारा सांगितला जात असेल तर त्यात चारुत्वाचा अभाव कसा ? की गूढरूपाने वर्णन करण्यातच अधिक चारुत्व उत्पन्न होते ? याच आशयाने पुढे 'उक्त्यन्तरेणाशक्यं यत् तच्चा-

रुत्वं प्रकाशयन्।' इत्यादी कारिकेत सांगणारच आहेत. 'अवरुन्धिज्जइ' याचा अर्थ आलिंगन दिले जाते. 'पुनरुक्तम्' यातून अनुपादेयता म्हणजेच अस्वीकार्यता लक्षित होते कारण त्यात (प्रियकर प्रेयसीच्या व्यवहारात) उक्तार्थ संभवतच नाही.

कुपिताः प्रसन्ना अवरुदितवदना विहसन्त्यः।
यथागृहीतास्तथा हृदयं हरन्ति स्वैरिण्यो महिलाः॥

येथील 'ग्रहणाद्वारा उपादेयता लक्षित होते तसेच 'हरणा'ने त्या स्त्रियांना वश होण्याची आपत्ती लक्षित होते.

तसेच 'अज्जाए पहारो' या श्लोकात कनिष्ट भार्येच्या स्तनपृष्ठावर पतीने उचित अशा क्रीडेमध्ये केवळ कुतूहलाने केलेला प्रहार मृदू असला तरी-देखील, ज्यांना सौभाग्यसूचक अशा त्या क्रीडेचे भाग्य प्राप्त झालेले नव्हते अशा तिच्या सपत्नींच्या हृदयांना मात्र दुःसह वाटला तो त्याच्या मृदुलत्वामुळेच. एकीवर केलेला मृदू प्रहार दुसरीलाच अतिशय लागतो. मृदू असूनही दुःसह होतो हे आश्चर्यकारक वाटते. येथील 'दत्तः' (दान) या शब्दाने फलवत्त्व लक्षित केले जाते. (भार्यायाः प्रहारो नवलतया **दत्तः** प्रियेण स्तनपृष्ठे).

तसेच 'परार्थे यः पीडामनुभवति' या श्लोकात, प्रस्तुत अशा महापुरुषाच्या अपेक्षेने अनुभवति हा शब्द मुख्यच होय. तरी पण अप्रस्तुत अशा इक्षूची प्रशंसा करावयाची असताना पीडेचा प्रत्यक्ष अनुभव अशक्य असल्यामुळे पीडेने युक्त असणे लक्षित होते आणि ते 'पीड्यमानत्व' म्हणजे पिळले जाणे या अर्थी पर्यवसित होते.

याठिकाणी काही प्रयोजन तर आहे. मग ते का बरे ध्वनित होत नाही ही शंका घेऊन ग्रंथकार म्हणतात–'न चैवंविधः कदाचिदपि ध्वनेर्विषयः।' म्हणजेच असा विषय कधीही ध्वनीत अंतर्भूत होणार नाही.

कारिका १५

उक्त्यन्तरेणाशक्यं यत्तच्चारुत्वं प्रकाशयन्।
शब्दो व्यञ्जकतां बिभ्रद्ध्वन्युक्तेर्विषयीभवेत्॥

'यतः उक्त्यन्तरेण' या कारिकेचा अर्थ. उक्त्यन्तरेण याचा अर्थ ध्वनि-व्यतिरिक्त स्फुट अशा विशेष शब्दार्थ–व्यापाराने. शब्द हा देखील पाचही अर्थामध्ये जोडावा. ध्वन्युक्तीचा विषय होईल याचा अर्थ 'ध्वनि' शब्दाद्वारा वर्णिल्या जाऊ शकतो असा आहे. वृत्तीतील 'उदाहृते विषये' याचा अर्थ 'वदति बिसिनीपत्रशयनम्' आदी उदाहरणांमध्ये.

अशारीतीने ज्याठिकाणी प्रयोजन असले तरी आदरास्पद नसते तेथे ध्वननव्यापार कोठून होणार हे सांगितल्यानंतर ग्रंथकार पुढे किञ्च इ. द्वारा असे सांगतात की जेथे मूलतःच प्रयोजन नाही आणि उपचार (गुणवृत्तीने व्यवहार) मात्र आहे तेथेदेखील कोठला आला आहे ध्वनन व्यापार ?

कारिका १६

रूढा ये विषयेऽन्यत्र शब्दाः स्वविषयादपि ।
लावण्याद्याः प्रयुक्तास्ते न भवन्ति पदं ध्वनेः ॥

लावण्य आदी जे शब्द लवणरसयुक्तवादी स्वविषयरूप स्वतःच्या अर्थाहून अन्यत्र म्हणजेच हृद्यत्वादि अर्थांमध्ये रूढ झालेले असतात आणि रूढ होण्यामुळेच लक्षणेच्या तीन्ही (मुख्यार्थबाधादी) अटी किंवा कारणे यांच्या सन्निधीच्या (उपलब्धी) अपेक्षारूपी व्यवधानाने रहित असतात.

त्यामुळेच म्हटलेच आहे की काही निरूढ लक्षणा या सामर्थ्यामुळे म्हणजेच वारंवार केलेल्या प्रयोगामुळे अभिधेसारख्या होऊन जातात. असे शब्द (अभिधानवत् ज्यांचा प्रयोग रूढ झालेला आहे) स्वतःच्या विषयाहून अन्यत्र अशा त्या अर्थात (लक्ष्यार्थात) जरी प्रयुक्त झाले तरी ध्वनीचे स्थान कधीच धारण करू शकत नाहीत. तेथे ध्वनिव्यवहार होऊ शकत नाही. शब्दाची उपचरित वृत्ती म्हणजे **गौण आणि लाक्षणिकवृत्ती** असा अर्थ आहे. कारिकेतील 'लावण्याद्याः' यातील 'आदि' पदाच्या ग्रहणाने **आनुलोम्य, प्रातिकूल्य, सब्रह्मचारी** इत्यादी लाक्षणिक शब्दांचे ग्रहण केले जाते. 'लोम्नामनुगतमनुलोमम् ।' हा प्रयोग मुळात 'मर्दन' या अर्थी केलेला आहे (केशांच्या दिशेला अनुसरून केलेले मर्दन.) 'कूलस्य प्रतिपक्षतया स्थितं प्रतिकूलम्' हा प्रयोग मुळात स्रोत म्हणजे प्रवाह याअर्थी केला आहे (तटाच्या विरुद्ध वाहाणारे प्रवाह. कूल म्हणजे तट) ज्यांचे गुरू एकच आहेत ते सब्रह्मचारी. हा सब्रह्मचारी पदप्रयोगाचा मुख्य विषय. याचा दुसरा अर्थ मात्र उपचरितच आहे, आणि याठिकाणी कोणत्याही प्रयोजनाच्या अनुरोधाने लक्षणा प्रवृत्त झालेली नाही म्हणून प्रयोजन विषयक ध्वनिव्यवहार देखील तेथे घडत नाही.

यावर अशी शंका घेतली जाऊ शकते की 'देवडिति लुणाहि...लवणुज्ज्वलं' इत्यादी ठिकाणी लावण्यादी शब्द सन्निध असता प्रतीयमान अर्थाची अभिव्यक्ती होते हे खरे आहे परंतु ती प्रतीती लावण्य शब्दामुळे आलेली नाही तर समग्र वाक्यार्थाची प्रतीती आल्यानंतर ध्वनन व्यापारानेच ती येते. याठिकाणी समस्त दिशांना प्रकाशित करण्याचा गुणधर्म प्रियतमेच्या मुखाच्याच ठिकाणी आहे हे

ध्वनित केले जाते यापेक्षा जास्त विवेचनाची आता गरज नाही. म्हणूनच वृत्तीत 'प्रकारान्तरेण' हा शब्द वापरला आहे. निराळ्या प्रकाराने ध्वनिव्यापार होतो याचा अर्थ व्यंजकत्वानेच ध्वनिव्यवहार होतो. उपचरितवृत्तीच्या लावण्यादी शब्दांच्या प्रयोगाने होत नसतो.

कारिका १७

मुख्यां वृत्तिं परित्यज्य गुणवृत्त्यार्थदर्शनम् ।
यदुद्दिश्य फलं तत्र शब्दो नैव स्खलद्गतिः ॥

अशा रीतीने जेथे जेथे लक्षणा (भक्ती) तेथे तेथे ध्वनी असे नसते (हे सिद्ध झाले) याबाबतीत दुमत नाही. त्यामुळे जर हे ध्वनीचे लक्षण असेल तर लक्षणेच्या सन्निध सर्वत्र ध्वनिव्यवहार होईल व त्यामुळे अतिव्याप्तीचा दोष येईल. जेथे लक्षणा तेथे ध्वनी या पक्षाचा थोडा काळ स्वीकार करून देखील आम्ही असे म्हणतो की जेथे जेथे लक्षणा तेथे तेथे ध्वनी असे असेलही. तथापी ज्या विषयाला उद्देशून लक्षणा व्यापार असतो त्या विषयाला उद्देशून ध्वनन व्यापार नसतो. ज्यांचे विषय भिन्न आहेत अशा दोन वस्तूंमध्ये धर्म–धर्मी–भाव कधीच राहू शकत नाही. धर्म हेच लक्षण होय असे म्हणतात. प्रस्तुत विषयात लक्षणा ही अमुख्यार्थाला उद्देशून घडणारा व्यापार असतो तर ध्वनन हे प्रयोजनाला उद्देशून असते आणि प्रयोजन विषयक दुसरा लक्षणाव्यापार मानता येत नाही कारण तेथे लक्षणेच्या सामुग्रीचा अभाव असतो. याच अभिप्रायाने 'अपि च मुख्या वृत्तिं...' ही कारिका येते.

मुख्य वृत्तीचा म्हणजेच अभिधाव्यापाराचा परित्याग करून म्हणजेच ती समाप्त करून गुणवृत्तीने म्हणजेच लक्षणावृत्तीने अमुख्य अर्थाचे दर्शन म्हणजेच प्रत्यायन, ते ज्या फलाला म्हणजे कर्मभूत अशा प्रयोजनाला उद्देशून केले जाते, त्या प्रयोजनाच्या बाबतीत निश्चितपणे द्वितीय व्यापार संभवतो. ती लक्षणा तर नसतेच कारण लक्षणा हा त्याच शब्दाचा व्यापार होय ज्याची गती म्हणजेच अवबोधन–शक्ती स्खलित होत असते म्हणजेच बाधकव्यापाराने विधुर केली जाणारी अशी असते आणि प्रयोजनाची प्रतीती आणून देणाऱ्या शब्दाशी तर बाधकतेचा योग येत नाही. तसे झाल्यास (प्रयोजनप्रतीती आणून देणारा शब्द देखील बाधित होऊ लागल्यास) तेथेदेखील अन्य एखाद्या निमित्ताचे किंवा अन्य एखाद्या प्रयोजनाचे अन्वेषण करण्याचा अनवस्था प्रसंग येईल. (त्याचा कधीच अंत होणार नाही.) म्हणून हा लक्षणेचा विषय नाही असा भाव आहे. (१७ व्या कारिकेतील '**दर्शनम्**' हा **णिच् प्रत्ययान्त** निर्देश आहे. वृत्तीतील 'कर्तव्ये' ह्या शब्दाचा अर्थ, अवगमन करून द्यावयाचे असताना असा आहे. 'अमुख्यता' याचा

अर्थ बाधकद्वारा विधुरीकरण. 'तस्य' म्हणजे शब्दाच्या (प्रयोगात). 'दुष्टतैव' याचा अर्थ प्रयोजनप्रतीतीची सहजतेने निष्पत्ती व्हावी यासाठीच तो शब्द त्या अमुख्य अर्थी प्रयुक्त केल्या जातो. जर 'सिंहो वटुः' या वाक्यात शौर्याचा अतिशय (आधिक्य) जाणवून द्यावयाचा असताना शब्दाची गती स्खलित होत असेल तर तो प्रतीती आणून देऊ शकणार नाही. मग त्याचा प्रयोग कशासाठी केला ? प्रयोजनाची प्रतीतीदेखील तो शब्द उपचारानेच करून देईल असे म्हटले तर तेथेदेखील दुसरे प्रयोजन शोधून काढावे लागेल व पुन्हा त्यासाठी दुसरा उपचार अशातऱ्हेने अनवस्था प्रसंग ओढवेल.

जर तेथे स्खलदगतित्व नसेल तर प्रयोजनाच्या प्रतीतीसाठी लक्षणेची सामग्री नसल्यामुळे लक्षणाव्यापार संभवणार नाही. पण व्यापारच नाही असे नाही. ही अभिधाही नाही. कारण येथे समयाचा–संकेताचा अभाव आहे. म्हणून अभिधा आणि लक्षणा याहून अतिरिक्त असलेला असा म्हणजे तिसरा व्यापार– त्याचेच नाव ध्वनन व्यापार होय.

वृत्तीतील 'न चैवम्' हा भाग स्पष्ट करतात. अशा प्रयोगात कोणताच दोष नाही. कारण प्रयोजनाची प्रतीती निर्विघ्नपणे होते. त्यामुळे मुख्य अर्थामध्ये प्रविष्ट होऊ इच्छिणारी अभिधाच बाधकाद्वारा अडविली जाते व चरितार्थ न झाल्याकारणाने अन्यत्र वळते. म्हणूनच हा 'त्याचा' (लाक्षणिक शब्दाचा) अमुख्य अर्थ होय असा व्यवहार होतो. तसेच अमुख्यरूपाने संकेतग्रहण देखील तेथे होते. म्हणूनच लक्षणा ही अभिधेची पुच्छभूत असते असे म्हणतात.

कारिका १८

वाचकत्वाश्रयेणैव गुणवृत्तिर्व्यवस्थिता ।
व्यञ्जकत्वैकमूलस्य ध्वनेः स्याल्लक्षणं कथम् ॥

'तस्मात्'...येथून उपसंहाराला सुरुवात करतात. ज्याअर्थी लक्षणा ही अभिधेची पुच्छभूत असते त्याअर्थी त्याचकारणाने ती वाचकत्वाच्या म्हणजेच अभिधा व्यापाराच्या आश्रयाने राहाते. कारण तिच्याच (अभिधेच्या) बाधित होण्याने तिचे उत्थान होते व तिच्याच पाठोपाठ ही येते, म्हणूनच तिला गुणवृत्ती किंवा गौणलाक्षणिक प्रकार म्हणून ओळखतात. ती व्यंजनात्मक अशा ध्वनीचे लक्षण कशी बरे होईल ? कारण दोघींचेही विषय भिन्न आहेत.

आता 'तस्मात् अन्यो ध्वनिः'...असा उपसंहार ग्रंथकार करतात. अतिव्याप्ती कशी संभवते ते सांगितले आणि अतिव्याप्तीच्याच प्रसंगाने भिन्नविषयत्व देखील सांगितले. अशारीतीने १४ व्या कारिकेतील 'अतिव्याप्तीमुळे, तिच्याद्वारा

म्हणजेच लक्षणेद्वारा हा (ध्वनी) लक्षित होत नाही' या विधानानुरूप अतिव्याप्ती स्पष्ट केली. आता येथेच अव्याप्तीही कशी होते हे दाखविण्यासाठी 'अव्याप्तिरप्यस्य' असे म्हणतात. त्यातील 'अस्य' म्हणजे गुणवृत्तिरूप असलेल्या. जेथे जेथे ध्वनी तेथे तेथे भक्ती असे असते तर अव्याप्ती झाली नसती. पण तसे होत नाही.

'सुवर्णपुष्पाम्' इत्यादी अविवक्षितवाच्याच्या उदाहरणात भक्ती आहे परंतु 'शिखरिणी' इत्यादी विवक्षितान्यपरवाच्याच्या उदाहरणात ती कशी बरे असू शकते ? यावर एक शंका अशी घेतली जाऊ शकते की लक्षणा तर गौणालाही व्याप्त करते. गौणीवृत्तीत केवळ शब्द त्या अर्थाला लक्षित करून त्याच्याच बरोबर सामानाधिकरण्य प्राप्त करतो जसे 'सिंहो बटुः' या उदाहरणात. किंवा अर्थ दुसऱ्या अर्थाला लक्षित करून स्वतःच्या वाचकासमवेत त्या वाचकाला समानाधिकरणत्वाने युक्त करतो किंवा शब्द आणि अर्थ हे दोन्हीही एकाच वेळी त्या अर्थाला लक्षित करून दुसऱ्याच शब्दार्थासमवेत मिश्रित होतात. अशारीतीने **लाक्षणिक हा गौणशब्दाहून भिन्न ठरतो.** जसे म्हटलेच आहे की – 'गौणात शब्दप्रयोग होतो, लक्षणेत नव्हे.' परंतु तेथेदेखील लक्षणा असतेच. अशारीतीने सर्व ठिकाणी म्हणजे सर्व क्षेत्राला तीच व्यापून असते. (म्हणजेच ती गौणीवृत्तीलाही व्यापते.)

तिचे पाच प्रकार आहेत ते असे– (१) अभिधेयाशी म्हणजेच वाच्यार्थाशी **संयोग संबंधाने** लक्षणेचा पहिला प्रकार होतो. उदा. (द्विरेफ) 'द्विरेफ' या शब्दाचा वाच्यार्थ 'भ्रमर' हा होतो. कारण भ्रमर शब्दात दोन 'रेफ' आहेत. त्या भ्रमर शब्दाशी ज्या अर्थाचा संयोग संबंध तो षट्पदलक्षण अर्थ द्विरेफ या शब्दाने लक्षित केला जातो. अशारीतीने ज्याचे स्वरूप आधीच स्पष्ट केले आहे त्या अभिधेयसंबंधाच्या निमित्ताने हा अर्थ 'द्विरेफ' शब्दाद्वारा लक्षित केला जातो. (२) अभिधेयाशी **सामीप्य संबंधाने**, दुसरा प्रकार होतो. उदा. गङ्गायां घोषः (३) अभिधेयाशी **समवाय संबंधाने** तिसरा प्रकार होतो. उदा. 'यष्टीः प्रवेशय' (४) अभिधेयाशी **वैपरीत्य संबंधाने** होणारा प्रकार पुढीलप्रमाणे, शत्रूला उद्देशून एकजण म्हणतो 'किमिवोपकृतं न तेन मम' आणि (५) अभिधेयाशी **क्रियायोगाने** म्हणजेच **कार्यकारणभावसंबंधाने** होणारा प्रकार उदा. अन्नाचे अपहरण करणाऱ्याच्या बाबतीत हा प्राणांचे हरण करतो असा होणारा व्यवहार म्हणजे शब्दप्रयोग हा पाचवा प्रकार. अशारीतीने ह्या पाच प्रकारच्या लक्षणेने संपूर्ण विश्वच व्यापले आहे.

(त्यामुळे ध्वनीचा दुसरा प्रकार म्हणजे विवक्षितान्यपरवाच्य किंवा अभिधामूल ध्वनी देखील लक्षणा व्यापाराने युक्त आहे असे होईल. 'शिखरिणि' या

उदाहरणाचा लक्षणेशी संबंध येतो किंवा नाही याची चर्चा या टिकाणी अभिनव-गुप्त करतात.)

'शिखरिणि क्व नु...' या श्लोकात (नायकाने) विचारलेल्या आकस्मिक अशा विशेष प्रश्नांच्या रूपात मुख्यार्थबाधकांचा प्रवेश होतो व त्यानंतर सादृश्या-वरून लक्षणा उत्पन्न होतेच. यावर असे म्हटले जाऊ शकते की–(स्वत: अभिनव-गुप्तांकडून असे म्हटले जाऊ शकते) पूर्वीच्या विवेचनात लक्षणेचा अंतर्भाव मध्ये–म्हणजे तृतीय कक्षेत केलेलाच आहे. त्यावर पूर्वपक्ष म्हणू शकतात की मग या प्रकाराला विवक्षितान्यपर असे कां म्हटले ? (म्हणजेच याचाही अंतर्भाव अविवक्षितवाच्यातच का केला नाही ?) त्यावर उत्तर असे की या प्रकारात म्हणजे विवक्षितान्यपरवाच्यात त्याचा मुख्य प्रकार जो असंलक्ष्यक्रम–तो विवक्षित अभिप्रेत आहे. तद्भेद या शब्दाने रस, भाव, रसाभास, भावाभास, भावप्रशम इत्यादी भेद व त्यांचे अवांतरभेद समाविष्ट केले जातात आणि त्या सर्व प्रकारां-मध्ये लक्षणा उपपन्न होत नाही. उदा. विभाव–अनुभावांचे प्रतिपादन करणाऱ्या काव्यात मुख्यार्थामध्ये बाधकाचा प्रवेश होणेच मुळी असंभव आहे. तेव्हा तेथे लक्षणेला जागाच कोठे उरली ?

यावर पुन्हा आक्षेपक असे म्हणू शकतात की बाधा असली काय आणि नसली काय ? त्याने फरक पडत नाही. लक्षणेचे स्वरूप एवढेच मानावे की अभिधेयाशी नित्य साहचर्याने संबंधित असलेली प्रतीती म्हणजे लक्षणा आणि येथे (असंलक्ष्यक्रमात) विभावअनुभावादिरूप अभिधेयाशी रसादी हे नित्य साहचर्याने संबंधित असतात म्हणून ते लक्षित होतात असे म्हणता येते. कारण विभाव, अनुभाव हे कार्य–कारण–रूप असतात व व्यभिचारीभाव हे सहकारी असतात म्हणून ते रसाशी नित्य संबंधित असतात व नित्य संबंधित अर्थ तो लक्ष्यार्थ म्हणून रस हा लक्ष्यार्थ. त्यावर उत्तर असे की हे बरोबर नाही. कारण असे मानल्यास धूम शब्दावरून धूम प्रतिपन्न झाला असता अग्नीचे स्मरण हे लक्षणेद्वाराच होते, असे म्हणावे लागेल, त्यानंतर अग्निस्मरणावरून अग्नीद्वारा होणाऱ्या शीतापनोदनाची देखील स्मृती (थंडीपासून निवारणाची स्मृती) गृहीत धरल्या जाऊ लागेल. शब्दाच्या अर्थाचे कधीच पर्यवसान म्हणजेच विश्रांती होणार नाही. पण धूम हा शब्द स्वत:च्या अर्थाच्या ठिकाणी विश्रांत होत असल्या-कारणाने (म्हणजेच तेथे अर्थाची पूर्ती होत असल्याकारणाने) शीतापनोदनादिरूप अर्थापर्यंत लक्षणाव्यापार लांबू शकत नाही. आक्षेपकांनी असे म्हटल्यास त्यांनी आमचेच म्हणणे मान्य केल्यासारखे हाईल व ते म्हणजे मुख्यार्थबाध हेच लक्षणेचे जीवित आहे. कारण मुख्यार्थबाध असल्यास शब्दाच्या स्वत:च्या अर्थाची विश्रांती

म्हणजेच पूर्ती होत नसते, आणि विभावादिकांच्या प्रतिपादनात कोणतेच बाधक तत्त्व नसते.

यावर आक्षेपक म्हणजेच मीमांसक असे म्हणू शकतात की धूमाचे ज्ञान झाल्यानंतर (अवगमनानंतर) अग्नीचे स्मरण व्हावे त्याप्रमाणे विभावादिकांच्या प्रतिपत्तीनंतर रत्यादी चित्तवृत्तींची देखील प्रतिपत्ती आपोआप होते. म्हणून येथे कोणताही शब्दव्यापारच नाही. तर या प्रतीतीचे स्वरूप जाणणाऱ्या विद्वान मीमांसकाला असे विचारले पाहिजे की दुसऱ्याच्या चित्तवृत्तीची जाणीव (प्रतिपत्ती) हीच रसप्रतीती असा अर्थ आपल्याला अभिप्रेत आहे काय ? असा भ्रम होऊ देऊ नये. कारण असे मानल्यास लोकांच्या ठिकाणी (दुसऱ्यांच्या ठिकाणी) असलेल्या चित्तवृत्तीचे केवळ अनुमान करणे यात रसत्व ते कोणते राहील ?

रसस्वरूप : ज्याचे स्वरूप अलौकिक चमत्कार हे आहे व काव्यगत **विभावादिकांची चर्वणा** हेच ज्याचे प्राणतत्त्व आहे अशा रसास्वादाला स्मरण, अनुमान आदींच्या बरोबरीला आणून त्याचा अवमान कोणीही करू नये.

लौकिक स्वरूपाच्या कार्यकारणांच्या अनुमानादींनी जिचे हृदय संस्कारित झाले आहे अशी व्यक्ती विभावादींच्या ज्ञानानंतर तटस्थ राहून रसप्रतीती प्राप्त करू शकत नाही. तर हृदयसंवाद या दुसऱ्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सहृदयत्वाच्या आधीन होऊन पुढे पूर्णत्वाला जाणार असलेल्या रसास्वादाच्या अंकुरित होण्यामुळे अनुमान किंवा स्मरण या पायऱ्यांवर आरूढ न होताच, तन्मयीभवन होण्यास सर्वस्वी उचित अशा चर्वणारूपी प्राण धारण करणाऱ्या रसप्रतीतीला प्राप्त करते. ही चर्वणा पूर्वी कधी अन्य कोणत्या प्रमाणाने उत्पन्न झालेली नव्हती की ज्यामुळे आता तिची स्मृती व्हावी तसेच आजही ती अन्य कोणत्या प्रमाणाने उत्पन्न झालेली नाही कारण अलौकिक वस्तूला प्रत्यक्ष आदी प्रमाणे लागू पडू शकत नाहीत. म्हणूनच विभावादिव्यवहार हा अलौकिक व्यवहारच होय.

जसे म्हटलेच आहे की विभाव हा विज्ञानार्थक होय म्हणजेच विज्ञान हा त्याचा अर्थ होय (भरत नाट्यशास्त्र–अध्याय ७–१,२,३ श्लोकानंतरचे येणारे भाष्य. अथ विभाव इति कस्मात् ? उच्यते । विभावो विज्ञानार्थः । विभावः कारणं निमित्तं हेतुरिति पर्यायाः । विभाव्यन्ते तेन वागङ्गसत्त्वाभिनया इत्यतो विभावः । यथा विभावितं विज्ञानमित्यनर्थान्तरम् ।)लोकात मात्र 'कारण' हीच संज्ञा वापरतात. विभाव ही संज्ञा वापरत नाहीत. अनुभावदेखील अलौकिकच होय. कारण भरताने म्हटलेच आहे की वाचिक, आङ्गिक व सात्त्विक हा तीन प्रकारचा अभिनय अनुभवाप्रत आणतो. त्यामुळे त्याला(अभिनयाला)अनुभाव असे म्हणतात (नाट्यशास्त्र ७–४, ५ श्लोक). तेव्हा चित्तवृत्तीशी तन्मयीभवन

होणे म्हणजेच अनुभवन होणे. लोकात (व्यवहारात) मात्र कार्य याच शब्दाचा प्रयोग होतो. अनुभाव या शब्दाचा प्रयोग होत नाही. म्हणूनच दुसऱ्याच्या चित्त-वृत्तीची प्रतीती येते असा येथील (भरताचा) अभिप्राय नसल्याने 'विभावानु-भावव्यभिचारिसंयोगात् रसनिष्पत्तिः ।' या सूत्रात 'स्थायी' चे ग्रहण केलेले नाही. तसे केले असते तर उलट ते शल्यभूत झाले असते. स्थायीलाच रसत्व प्राप्त होते हे जे म्हटले जाते ते उचितच होय कारण त्या विभाव आणि अनुभावांना उचित अशा स्वगत चित्तवृत्तीच्या उदयानंतरच सुंदर अशा चर्वणेचा प्रादुर्भाव होत असल्यामुळे, हृदयसंवादाला उपयुक्त अशा लोकांच्या (नट–पात्र) चित्तवृत्तीच्या परिज्ञानाच्या अवस्थेतच उद्यान (उद्दीपन विभाव), पुलक (अनुभाव) आदीं-मुळे परगतस्थायी स्वरूपाच्या अशा 'रती' इत्यादी भावांच्या अवगमाने स्थायीला रसत्व प्राप्त होत असते.

व्यभिचारीभाव हा देखील चित्तवृत्त्यात्मकच असला तरी (तोही चित्तवृत्ती याच स्वरूपाचा असला तरी) मुख्य चित्तवृत्तीच्या आधीन अशाच स्वरूपात त्याची चर्वणा होत असते. म्हणूनच त्याची गणना विभाव, अनुभाव यांच्यात केली. म्हणूनच प्रबंधात म्हणजेच त्या काव्यकृतीत आलेल्या बंधुसमागमादी कारणांनी उत्पन्न झालेल्या हर्ष, निर्वेद आदी चित्तवृत्तींना गौणत्व प्राप्त होऊन चर्वणेचे स्वरूप प्राप्त होते, म्हणजेच चर्वणेला महत्त्व येते. आणि हीच (स्थायीच्या) रस्यमानतेची निष्पत्ती होय. म्हणूनच चर्वणा म्हणजेच अभिव्यंजनच होय. ज्ञापन नव्हे, कारण त्यात कोणताही प्रमाण व्यापार (प्रत्यक्ष किंवा अनुमान इ.) नसतो तसेच चर्वणा म्हणजे उत्पादनही नव्हे, कारण तेथे कोणताच हेतुव्यापार म्हणजे कारण व्यापार नसतो.

या ठिकाणी आक्षेपक असे विचारू शकतात की हे जर 'ज्ञापन' ही नसेल व 'निष्पत्ति' ही नसेल तर मग त्याला काय म्हणावे? त्यावर उत्तर असे की म्हणूनच हाच तो अलौकिक असा रस होय. (म्हणजेच ही रसाची अलौकिकता होय.) यावर पुन्हा अशी शंका घेतली जाऊ शकते की विभाव इत्यादी या रसाचे ज्ञापक हेतू समजावे की कारक? त्यावर उत्तर असे की ज्ञापकही नव्हेत व कारकही नव्हेत. तर चर्वणेला उपयोगी असे हेतू समजावेत. यापूर्वी हे अन्य कोणत्या ठिकाणी निदर्शनास आले? यावर उत्तर असे की असे हेतू यापूर्वी निदर्शनास आले नाहीत म्हणूनच ते अलौकिक होत. पुन्हा आक्षेपक असे म्हणू शकतात की असे जर असेल तर रस म्हणजेच रस–प्रतीतीही अप्रमाण ठरू लागेल. यावर सिद्धांतपक्ष उलट प्रश्न विचारतो की रस अप्रमाण (प्रमाणसिद्ध) ठरला तरी त्यामुळे काय बिघडते? त्याच्या (रसाच्या) चर्वणेपासूनच प्रीती (आनंद) व व्युत्पत्ती (ज्ञान) सिद्ध होत असल्याने दुसऱ्या प्रमाणांची गरजच काय? तरीपण

ह्याला प्रमाण नाही हे खरेच आहे, असे म्हटल्यास उत्तर असे की रस हा स्वसंवेदनाने सिद्ध होत असल्याने अप्रमाण आहे हा आरोप बरोबर नव्हे. कारण चर्वणा म्हणजे देखील विशिष्ट ज्ञानाचेच स्वरूप आहे (म्हणजेच ती प्रमा होय व अर्थात् त्याला प्रमाण हे आहेच म्हणून रस हा अप्रमाण आहे हे सिद्ध होत नाही.) एवढे विवेचन पुरे. अधिक विस्तार करण्यात काय फायदा ? अशारीतीने रस हा अलौकिक होय. ज्याअर्थी कोणत्याही अर्थाचे अभिधान करण्यास मुळीही उपयुक्त नसलेल्या ललित आणि परुष (मृदू व कठोर) अशा दोन्ही प्रकारच्या अनुप्रासांच्या ठिकाणी रसाच्या दृष्टीने अभिव्यंजकत्व असते (रसाभिव्यंजनाचे सामर्थ्य असते) त्याअर्थी रसाच्या बाबतीत लक्षणेची शंकादेखील कशी घेता येईल ? काव्यात्मक शब्दांच्या निष्पीडनानेच केवळ त्याची चर्वणा होताना दिसते. व्यवहारात असे दिसून येते की सहृदय लोक तेच काव्य पुन्हा पुन्हा वाचत चर्वणा करतात. ते काव्याची (म्हणजेच शब्द व वाच्यार्थ यांची) चर्वणा करीत नाहीत.

याठिकाणी 'एकवार ग्रहण करून ज्यांचा त्याग केला जातो ते उपाय.' या न्यायानुसार ज्यांनी एकवार अर्थाची म्हणजेच वाच्यार्थाची प्रतीती करून दिली आहे असे कृतप्रतीतिक शब्द आता (चर्वणेसाठी) उपयुक्त राहात नसल्याकारणाने (म्हणजेच अभिधेचा उपयोग आता उरत नसल्यामुळे) त्यांचा म्हणजेच शब्दांचादेखील येथे (रसाच्या बाबतीत) ध्वनन व्यापारच संभवतो. म्हणूनच या अर्थाच्या बाबतीत 'अलक्ष्यक्रमता' मानली जाते.

याबाबतीत अभिधा व ध्वनन या दोन व्यापारांनुसार वाक्यभेद होईल असे जे विधान कोणीतरी केले ते अनभिज्ञतेमुळे केले. एकदा उच्चारल्या गेलेले शास्त्र संकेताच्या सामर्थ्याने अर्थाचे प्रतिपादन करून एकाच वेळी विरुद्ध अशा अनेक अर्थांच्या संकेताचे स्मरण करून देण्यास असमर्थ असल्याने दोन अर्थांची प्रतीती कशी बरे आणून देऊ शकेल ? जर ते अर्थ परस्पर विरुद्ध नसतील तर तो तेवढा (दोन्ही अर्थ मिळून) एकच वाक्यार्थ होईल. क्रमाक्रमाने थांबून व्यापाराचा संभव होऊ शकत नाही. आणि समजा वाक्य पुन्हा उच्चारिले तरी तोच अर्थ निघेल कारण संकेत व प्रकरण ही तीच (पूर्वीचीच) असतात. प्रकरण व संकेत यांच्याद्वारा प्राप्य (प्राप्त करून घ्यावयाच्या) अर्थाचा तिरस्कार करून अन्य अर्थाची प्रतीती आणून देण्याच्या बाबतीत कोणताच नियम नाही. म्हणूनच 'अग्निहोत्रं जुहुयात्स्वर्गकामः।' या श्रुतीपासून 'खादेच्छ्वमांसम्' हा अर्थ निघू शकत नाही, याला काय प्रमाण ? हा दोष येऊ लागेल. (म्हणजेच अर्थाच्या विश्वसनीयतेला तडा जाईल) व मग अशा अर्थाची संख्या एवढीच राहील यावर काहीही नियंत्रण राहणार नाही. त्यामुळे वाक्याची विश्वासार्हता नष्ट होईल.

त्यामुळे अशा रीतीने वाक्यभेद हे दूषण होय. येथे तर (रसचर्वणेच्या बाबतीत) प्रतिपादन (प्रत्यक्ष शब्दांमध्ये) केले जाणारे विभावादीच चर्वणा–विषयत्वाकडे उन्मुख होत असतात त्यामुळेच संकेत आदींचा उपयोग येथे होत नाही. 'या कार्यात माझी नियुक्ती झाली आहे. ते मी करीन' किंवा (कार्य सफल केल्यानंतर) 'मी कृतार्थ झालो' अशा शास्त्रीय प्रतीतीसारखा प्रकार काव्यात संभवत नाही. कारण शास्त्रीय अध्ययनात कर्तव्याच्या प्रती (संबंधातील) उन्मुखता ही उत्तरकाळी संभवते म्हणजेच शास्त्राध्ययनानंतर संभवते कारण ते लौकिक असते, काव्यात मात्र विभावादींची चर्वणा ही एखाद्या अद्‌भुत पुष्पाप्रमाणे त्याचवेळी (म्हणजेच विभावादींचे वर्णन करणारी वाक्ये एकीकडे वाचत असतानाच, वाक्यार्थबोधसमकलीच) उदित होत असते. जादूचे पुष्प ज्याप्रमाणे क्रमाक्रमाने न उमलता एकाच वेळी उमलावे त्याप्रमाणे ही चर्वणा देखील वाच्यार्थसमकालच उदित होते. या चर्वणेला पूर्वापरकालाचे बंधन नसते. (ती तत्काकालसार असते.) अशा रीतीने लौकिक आस्वाद व योगीजनांचा विषय याहून रसास्वाद सर्वस्वी भिन्न होय हे सिद्ध होते.

म्हणूनच 'शिखरिणि' या उदाहरणात देखील मुख्यार्थबाध इत्यादी स्वरूपाच्या क्रमाची अपेक्षा न ठेवताच सहृदय वाचक वक्त्याचा अनुनय व प्रीतिरूप अभिप्राय समजून घेतात. म्हणूनच ग्रंथकाराने (आनंदवर्धनाने) विवक्षितान्यपरवाच्यध्वनीत सामान्यरूपाने भक्तीचा म्हणजे लक्षणेचा अभाव असतो असे सांगितले. आम्ही (अभिनवगुप्त) मात्र विरोधकांची कटकट शांत करण्यासाठी असे म्हटले होते की ठीक आहे, असेल त्यातही लक्षणा. अलक्ष्यक्रमध्वनीच्या बाबतीत मात्र कितीही रागावलात तरी तुम्ही काय करून घेणार आहात ? जर तुमचा राग नसेल तर 'सुवर्णपुष्पाम्' या अविवक्षितवाच्यध्वनीच्या उदाहरणात देखील मुख्यार्थबाधा ही लक्षणेच्या सामुग्रीची अपेक्षा न ठेवता व्यंग्यार्थातच विश्रांती होते, (अर्थाची परिपूर्ती होते) हे तुम्ही मान्य करावयास हवे. याहून अधिक विस्ताराची काय आवश्यकता ? म्हणूनच वृत्तीमध्ये 'तस्माद्‌भक्तिरलक्षणम्' असा उपसंहार केला आहे.

कारिका १९

कस्यचिद्‌ध्वनिभेदस्य सा तु स्यादुपलक्षणम् ।
लक्षणेऽन्यैः कृते चास्य पक्षसंसिद्धिरेव नः ॥

आक्षेपक पुन्हा म्हणतील की ध्वनी आणि भक्ती ही एकरूप नसतीलही. तसेच भक्ती हे ध्वनीचे लक्षण नसेलही. परंतु उपलक्षण मात्र होऊ शकते. जेथे ध्वनी असतो तेथे भक्ती देखील असते. अशा रीतीने भक्तीद्वारा ध्वनी उपलक्षित

होऊ शकतो. हे सर्वत्र दिसून येत नाही हे खरे. पण तेवढ्याने काय प्रतिपक्ष यशस्वी सिद्ध होतो ? की लगेच आमच्यातील उणीव (दोष) सिद्ध होते ? म्हणून हा आक्षेप लक्षात घेऊन ग्रंथकार म्हणतात–कस्यचिद्ध्वनिभेदस्य सा (लक्षणा) तु स्यात् उपलक्षणम् ।

येथे आणखी अशी शंका घेतली जाऊ शकते की लक्षणा किंवा भक्ती ही तर प्राचीन शास्त्रकारांनी सांगितली आहेच. तिला उपलक्षण मानून तिच्याद्वारा समग्रभेदांनी सहित ध्वनीचे देखील लोक लक्षण करू शकतील व त्याचे स्वरूप जाणून घेऊ शकतील. तेव्हा ध्वनीचे लक्षण करून काय फायदा ? यावर उत्तर देण्यासाठी म्हणून 'यदि च गुणवृत्त्यैव ध्वनिर्लक्ष्येत .....' हा वृत्तीतील भाग येतो.


अभिधानाभिधेय–व्यापार (शब्दार्थ व्यापार) हा सर्वच अलंकारांचा व्यापार असतो, आणि ही अभिधावृत्ती (व्यापार) वैय्याकरण व मीमांसक यांनी एकदा निरूपित केल्यानंतर आता अलंकारशास्त्रज्ञांना व्यापाराचे क्षेत्रच कुठे उरले ? तसेच हेतूच्या बलाने कार्य उत्पन्न होते असे नैय्यायिकांनी सांगितल्यावर ईश्वर प्रभृती कर्ते व ज्ञाते यांच्यासाठी करण्यालायक असे अपूर्व कृत्य ते कोणते राहिले ? अशा रीतीने (उक्त युक्तिवाद मानल्यास) या जगातील सर्वच उद्योग निरर्थक मानण्याची वेळ येईल. म्हणूनच ग्रंथकार 'लक्षणकरणवैयर्थ्यप्रसंग' येईल असे म्हणतात. आम्ही काही अपूर्व उन्मीलित केले म्हणजे पहिल्या प्रथम प्रगट केले असे नसेलही. पूर्व प्रकटित गोष्टीचेच आम्ही चांगल्या तऱ्हेने निरूपण केले असले तरी काय चुकले ? या अभिप्रायाने 'किं च–लक्षणेऽन्यैः कृते–' इत्यादी कारिकेचा अंश येतो. 'प्रागेव' याला 'आमच्या प्रयत्नांच्या आधी' हे शब्द जोडावे. अशारीतीने ग्रंथकाराने तीन प्रकारचा अभाववाद, भक्तीतील अंतर्भाववाद या दोहोंचे खंडन करून अनिर्वचनीयतावादाचे देखील त्यातच निराकरण केले आहे. म्हणूनच अनिर्वचनीयतावादाच्या निराकरणासाठी मुळातली वेगळी कारिका दिसून येत नाही. वृत्तिकाराने तो पक्ष निराकृत केलेला असला तरी स्वतःच्या प्रमेयशय्येची परिपूर्ती करण्यासाठी स्पष्टपणाने त्या पक्षाचा अनुवाद करून त्याचे निराकरण केले आहे. 'ये ऽ पि ...' या वाक्याने. उक्त नीतीने 'यत्रार्थः शब्दो वा' ह्या ध्वनीच्या सामान्यलक्षणाचे प्रतिपादन केले. (पहिल्या उद्योतात ध्वनीचे सामान्य लक्षण सांगून झाले.) पुढे सांगितल्या जावयाच्या नीतीने म्हणजेच 'अर्थान्तरे सङ्क्रमितम्' इत्यादिद्वारा (द्वितीय उद्द्योताच्या आरंभापासून) ध्वनीचे विशेष लक्षण सांगितले जाईल. यापैकी प्रथम उद्योतात कारिकाकारांनी ध्वनीचे अवान्तर भेद (विभाजन) व त्याचे विशेष लक्षण करीत असताना मूलतः ध्वनी दोन प्रकारचा असतो हे सुचविले

आहे. त्यांचा (कारिकाकारांचा) हा आशय जाणून वृत्तिकाराने याच उद्योतात मूलविभाग म्हणजेच ध्वनीचे मूल विभाजन 'स च द्विविधः' या शब्दांनी (अशा रीतीने) सांगितले आहे. (स चासावविवक्षितवाच्यो विवक्षितान्य परवाच्यश्चेति द्विविधः सामान्येन– १३ व्या कारिकेवरील वृत्ती.)

'सर्वेषाम्' म्हणजे लौकिक व शास्त्रीय अशा वस्तूंच्या किंवा विषयांच्या. 'अतिशयोक्त्या' या शब्दाचा अर्थ 'ती अक्षरे हृदयात काही स्फुरित करतात' ह्या वाक्याप्रमाणे अतिशयोक्तीद्वारा ध्वनीची साररूपता प्रतिपादन करण्याच्या हेतूने त्याची अनाख्येयता म्हणजेच अवर्णनीयता सांगितली आहे, असे ग्रंथकारांनी दाखविले आहे.

कितीही सुंदर चांदणे असले तरी लोचनाशिवाय तो (प्रकाश) आलोक कधी शोभिवंत दिसतो का ? म्हणूनच अभिनवगुप्तांनी येथे लोचनाचे उन्मीलन केले. (आपला टीकारूपी नेत्र उघडला.) जिच्या उन्मीलन–शक्तीमुळे संपूर्ण विश्व क्षणात उन्मीलित होते त्या आत्मरूपी आयतनाच्या (निवासाच्या) ठिकाणी विश्रांत होणाऱ्या त्या शिवेला म्हणजे कल्याणकारी प्रतिभेला मी वंदन करतो.

अशा रीतीने महामाहेश्वराचार्यवर्य श्रीअभिनवगुप्तांच्या द्वारा उन्मीलित अशा या 'सहृदयालोकलोचन' टीकेतील ध्वनिसंकेत नामक प्रथम उद्योत समाप्त झाला.


REFBK-0025199

शुद्धिपत्रक

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	खालून २ री	स्वच्छायासितेन्दव:	स्वच्छायायासितेन्दव:
३	वरून ७ वी	अथात	अर्थात्
४	शेवटची	काव्यतत्त्ववेत्वांनी	काव्यतत्त्ववेत्त्यांनी
५	व. ९ वी	तिचा वाच्यार्थासकट घेतल्यानंतर	ती वाच्यार्थासकट घेतल्यानंतर
१६	व. ६ वी	यद्यापि च	यद्यपि च
१७	खा. ६ वी	निवृत्ती	निर्वृती
२०	व. १५ वी	काव्यत्मेति	काव्यात्मेति
२७	खा. २ री	भ्रमाणात	भ्रमणात
३५	खा. १३ वी	शृंगारसाचाच	शृंगाररसाचाच
३७	व. ११ वी	दक्षिण्यहतस्य	दाक्षिण्यहतस्य
४०	व. ८ वी	असंलक्ष्यक्रमव्यङ्गय:	असंलक्ष्यक्रमव्यङ्ग्य:
४३	खा. २ री	स्वशब्दनिवेदित्वाने	स्वशब्दनिवेदितत्वाने
५५	व. ४ थी	यत्तचित्रम्	यत्तच्चित्रम्
५७	व. ९ वी	समारोपित्	समारोपित
६८	न. ११ वी	मुखत्	मुखात्
७१	व. ८ वी	कराणांमुळे	कारणांमुळे
७१	खा. ११ वी	व्यंग्याशांचा	व्यंग्यांशाचा
८४	व. ९ वी	स्खलदगतित्व	स्खलद्गतित्व

अभिनव-लोचन

डॉ. रूपा कुळकर्णी

स्वादयन्तु रसं सर्वे यथाकामं कथञ्चन ।
सर्वस्वं तु रसस्यात्र गुप्तपादा हि जानते ।।

म्हणजे ' सर्व रसिक रसाचा आस्वाद आपल्या इच्छेनुसार कसाही घेवोत, रसाचे सर्वस्व मात्र या शास्त्रात एक अभिनव-गुप्ताचार्यच जाणतात, ' असे माणिक्यचंद्र हा काव्यप्रकाशाचा टीकाकार म्हणतो. अभिनवगुप्तांची रसविषयक उपपत्ती जशी अभिनवभारतीत येते तशीच ध्वन्यालोकलोचनातही येते. ह्या दोन्ही टीकाग्रंथांचे स्थान भारतीय साहित्यशास्त्रात अजोड मानले जाते. किंबहुना स्वतंत्र ग्रंथाचीच प्रतिष्ठा अभिनवभारती व लोचन या टीकांना प्राप्त झालेली आहे.

' अभिनवलोचन ' हा यापैकी लोचनाचा मराठी अनुवाद. त्यातुन ध्वनीची 'प्रत्यभिज्ञा' म्हणजेच ओळख जिज्ञासू वाचकांना चांगल्या रीतीने पटावी हा हेतू. ' प्रत्यभिज्ञा ' हा अभिनवांच्या तात्त्विक विवेचनातील आणि म्हणूनच त्यांच्या साहित्यशास्त्रा-तीलही परवलीचा शब्द.

वस्तु ज्ञात असली तरीदेखील तिचे विशेषरूपाने अनुसंधानात्मक निरूपण म्हणजे ' प्रत्यभिज्ञान ' असे स्वत: अभिनवगुप्तच लोचनात म्हणतात. व्यंग्यार्थ, व्यंजक शब्द व व्यंग्यव्यंजक-भाव या तीन्ही अंगांनी ध्वनीची ओळख सहृदयांना व्हावी हा लोचन लिहिण्यामागील अभिनवांचा उद्देश. तो सर्वार्थाने सफल व्हावा म्हणूनच त्यांचा ' संस्कृत लोचन ' मराठीत आणला आहे.